सुस्वागतम् 2026

# जनमाध्यम

बाय-बाय 2025

नुतन वर्षाभिनंदन!

एक प्रतिष्ठित सवय

paper www.janmadhyam.com ■ अमरावती, गुरुवार १ जानेवारी २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०


## नववर्षाच्या काही तासांपूर्वी राजस्थानात
# १५० किलो स्फोटके जप्त

### युरिया खताच्या गोण्यांत होते अमोनियम नायट्रेट



**टोंक /वृत्तसंस्था-** राजस्थानच्या टोंकमध्ये कारमधून १५० किलो स्फोटके (अमोनियम नायट्रेट) घेउन जाणा-या २ लोकांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत समोर आले की हे अमोनियम नायट्रेट टोंकमध्येच पुरवले जाणार होते. हे प्रकरण बरौनी पोलिस स्टेशन हद्दीतील राष्ट्रीय महामार्ग-५२ वरील चिरौंज गावातील आहे. कारमधील लोकांनी युरिया खताच्या गोण्यांमध्ये हे स्फोटक लपवून ठेवले होते, जेणेकरून ते पकडले जाउ नयेत. डीएसपी मृत्युंजय मिश्रा यांनी सांगितले की हे अमोनियम नायट्रेट कोणत्याही स्फोटाची घटना घडवून आणण्यासाठी पुरेसे आहे. या लोकांनी स्फोटके कोठून, कोणाकडून खरेदी केली होती आणि कोणाला पुरवणार होते, याची चौकशी सुरू आहे.

दोन्ही आरोपींनी कारमध्ये खताच्या गोण्यांमध्ये स्फोटके लपवली होती, जेणेकरून कोणालाही संशय येउ नये. बूंदीच्या दिशेने येत होते, पाठलाग केल्यावर पळून जाउ लागले डीएसटी प्रभारी ओमप्रकाश चौधरी यांनी सांगितले की (पान २ वर)

# आता सर्वसामान्यांना मध्यरात्रीही न्याय मिळणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** भारतीय न्यायव्यवस्थेच्या इतिहासात आज एक सुवर्णक्षण नोंदवला गेला असून न्याय मिळण्यास विलंब होणे म्हणजे न्याय नाकारणे हे ब्रीदवाक्य प्रत्यक्षात उतरवण्यासाठी देशाचे सरन्यायाधीश (सीजेआय) सूर्यकांत यांनी एक अत्यंत क्रांतिकारी आणि ऐतिहासिक निर्णय घेत सर्वसामान्यांच्या मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी चोवीस तास न्याय म्हणजेच मध्यरात्रीही न्यायालयाचे दरवाजे उघडे ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

आता सर्वसामान्य नागरिकांना न्यायासाठी केवळ न्यायालयाच्या कार्यालयीन वेळेची वाट पाहावी लागणार नाही, तर तातडीच्या परिस्थितीत मध्यरात्रीही न्यायालयाचे दरवाजे उघडे राहणार आहेत. या ऐतिहासिक निर्णयामुळे सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. कायदेशीर आपत्कालीन परिस्थितीत कोणालाही आता वेळेच्या बंधनामुळे न्यायापासून वंचित राहावे लागणार नाही. सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी स्पष्ट केले की, अनेकदा नागरिकांना अचानक कायदेशीर संकटाचा सामना करावा लागतो. विशेषतः तपास यंत्रणांकडून विचित्र वेळेत होणारी अटक किंवा मानवी हक्कांचे उल्लंघन होण्याच्या भीतीपोटी नागरिकांमध्ये अस्वस्थता असते. अशा आपत्कालीन परिस्थितीत, कोणाचेही मूलभूत हक्क हिरावले जाउ नयेत, यासाठी सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांमध्ये मध्यरात्रीही सुनावणीची मागणी करता येईल.



न्यायालये ही ख-या अर्थाने लोकांची न्यायालये व्हावीत, हाच आमचा मुख्य उद्देश आहे असे ते यावेळी म्हणाले.

**प्रलंबित खटल्यांसाठी घटनापीठांवर भर-** केवळ तातडीच्या सुनावण्याच नव्हे, तर वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या महत्त्वाच्या घटनात्मक प्रश्नांचा निपटारा करण्यासाठीही सरन्यायाधीशांनी विशेष पावले उचलली आहेत. यासाठी अधिकाधिक घटनापीठे स्थापन करण्यात येणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने बिहारपासून सुरू होउन देशभरात चर्चेत असलेल्या निवडणूक याद्यांच्या विशेष पुनरिक्षणाशी संबंधित प्रकरणांचा प्राधान्याने समावेश असेल. यामुळे राजकीय आणि सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाच्या असलेल्या खटल्यांना गती मिळणार आहे.

■ सर्वोच्च आणि उच्च न्यायालयात मध्यरात्रीही दाद मागता येणार
■ सर्वोच्च न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय
■ मूलभूत हक्कांच्या रक्षणासाठी चोवीस तास न्यायदान

**वकिलांसाठी नवीन एसओपी लागू**

न्यायप्रक्रिया अधिक शिस्तबद्ध आणि वेगवान करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने नवीन मानक कार्यपद्धती जारी केली आहे.

**या नवीन नियमांनुसार-** वेळेचे नियोजनः वकिलांना त्यांचा मौखिक युक्तिवाद आणि लेखी निवेदनासाठी ठरावीक वेळमर्यादा पाळावी लागेल.

**ऑनलाइन माहिती :** सुनावणीच्या किमान एक दिवस आधी वकिलांना त्यांचा संभाव्य वेळ अडव्होकेट ऑन रेकॉर्डच्या पोर्टलवर ऑनलाइन कळवावा लागेल.

**लेखी निवेदन :** सुनावणीच्या तीन दिवस आधी दुस-या पक्षाला प्रत देउन, केवळ पाच पानांचे संक्षिप्त लेखी निवेदन सादर करणे बंधनकारक असेल.

**न्यायव्यवस्थेवरील विश्वास दृढ होणार-** या नवीन प्रणालीमुळे न्यायालयाचा मौल्यवान वेळ वाचणार असून खटल्यांचा निकाल लवकर लागण्यास मदत होईल. वकिलांनी वेळेच्या मर्यादेचे काटेकोर पालन करावे, असे निर्देशही देण्यात आले आहेत. मध्यरात्रीच्या सुनावणीचा निर्णय आणि कामकाजातील ही पारदर्शकता यामुळे सर्वसामान्य जनतेचा न्यायदेवतेवरील विश्वास अधिक दृढ होईल, अशी भावना कायदेतज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे. भारताच्या न्यायदानाच्या पद्धतीत हा बदल एक मैलाचा दगड ठरणार आहे.

# 29 महापालिकांमध्ये 33 हजार 606 उमेदवारी अर्ज

## पुणे महापालिकेत सार्वधिक 3 हजार 179 अर्ज मुंबईत 2 हजार 516 अर्ज दाखल

**मुंबई/प्रतिनिधी-** मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीत २ हजार ८६९ जागांसाठी विक्रमी ३३ हजार ६०६ उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. पुणे महापालिकेत सर्वाधिक म्हणजे १६५ जागांसाठी ३ हजार १७९ तर प्रतिष्ठेच्या असलेल्या मुंबईत महापालिकेच्या २२७ जागांसाठी २ हजार ५१६ उमेदवारी अर्ज प्राप्त झाले आहेत. महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची मुदत मंगळवार दि. ३० डिसेंबरला संपली. या मुदतीत २९ महापालिकांमध्ये विक्रमी संख्येने अर्ज आले आहेत. इचलकरंजी महापालिकेत सर्वात कमी म्हणजे ६५ जागांसाठी ४५६ अर्ज आले आहेत. या ३३ हजार ६०६ अर्जांची बुधवारी छाननी करण्यात आली. छाननीत किती उमेदवारी अर्ज बाद झाले याची माहिती उशीरापर्यंत मिळू शकली नाही. २ जानेवारी २०२६ ही




उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम मुदत आहे. या मुदतीनंतर महापालिका निवडणुकीतील लढतींचे प्रभागनिहाय चित्र स्पष्ट होउ होईल.

**महापालिका उमेदवारी अर्ज जागांची संख्या-** छत्रपती संभाजीनगर : १ हजार ८७० (११५) (पान २ वर)

## अखेर आठवलेंच्या रिपब्लिकन पक्षाला मुंबईत १२ जागा

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखालील रिपब्लिकन पक्षाला भाजप आणि शिवसेना शिंदे गटाच्या कोट्यातून १२ जागा सोडण्याचा निर्णय बुधवारी घेण्यात आला. मुंबईतील २२७ पैकी १२ जागा वाट्याला आल्याने आठवलेंच्या पक्षाने ज्या प्रभागात रिपब्लिकन पक्षाचा उमेदवार नाही तेथे भाजप-शिंदे गटाला पाठिंबा जाहीर केला आहे. मुंबई महापालिका निवडणुकीतील (पान २ वर)

# सहा नगरसेवक बिनविरोध विजयी

**मुंबई/प्रतिनिधी-** राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होणार असले तरी भाजपने आत्ताच आपले खाते उघडले आहे. कल्याण-डोंबिवली, धुळे, पनवेल येथील भाजपचे सहा नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत.



कल्याण डोंबिवली महापालिका निवडणुकीत भाजपने आपले खाते उघडले आहे. प्रभाग अ मधून रेखा राजन चौधरी निवडून आल्या आहेत. शिवसेना ठाकरे गट आणि मनसेने याठिकाणी उमेदवार दिला नव्हता. रेखा चौधरी यांच्या विरोधात एकही उमेदवारी अर्ज न आल्याने त्या बिनविरोध निवडून आल्या आहेत. डोंबिवलीतील प्रभाग क्रमांक २६ क मधून आसावरी नवरे आणि २६ ब मधून रंजना पेणकर असे तीन नगरसेवक बिनविरोध विजयी झाले आहेत. धुळे महापालिकेतही दोन नगरसेविकांची बिनविरोध निवड झाली आहे. प्रभाग क्रमांक १ मधील भाजपच्या उमेदवार उज्ज्वला रणजीत राजे भोसले यांची बिनविरोध निवड झाली. प्रतिस्पर्धी विरोधातले उमेदवारांचे अर्ज बाद झाल्याने उज्ज्वला भोसले या बिनविरोध निवडून आल्या. धुळे महापालिकेच्या प्रभाग क्रमांक सहा ब मधून भाजपच्या (पान २ वर)

# हजारो रुग्णांना मृत्यूच्या दारातून परत आणणारे विख्यात न्युरोसर्जन डॉ.चंद्रशेखर पाखमोडे यांचे हृदयविकाराने निधन

**नागपूर/प्रतिनिधी-** आपल्या कौशल्याने हजारो रुग्णांना मृत्यूच्या दारातून परत आणणारे आणि नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रातील एक आधारस्तंभ, न्युरान हास्पिटलचे संचालक डॉ. चंद्रशेखर पाखमोडे (५५) यांचे बुधवार, ३१ डिसेंबर रोजी सकाळी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने केवळ वैद्यकीय क्षेत्राचीच नव्हे, तर समाजाची कधीही न भरून निघणारी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात आई, पत्नी डॉ. मनीषा, मुलगा डॉ. अद्वैत, मुलगी अनन्या आणि मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या पार्थिवावर



आज सायंकाळी ६ वाजता मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.मूळचे लाखनी (सलोटी) व सध्या रामदासपेठ येथील 'हॅपी हाईट्स' येथील रहिवासी असलेले डॉ. पाखमोडे बुधवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घरीच हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यांना तातडीने धंतोली येथील त्यांच्या 'न्युरॉन हॉस्पिटल'मध्ये दाखल करण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टरांच्या पथकाने त्यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले, मात्र सकाळी ८ वाजता उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. (पान २ वर)

## डॉ.चंद्रशेखर पाखमोडे यांना देवेंद्र फडणवीस यांची श्रद्धांजली

नागपूर-नागपूर येथील सुप्रसिद्ध मेंदू व मज्जा रज्जू शस्त्रक्रिया तज्ञ (न्यूरो सर्जन) डॉ. चंद्रशेखर पाखमोडे यांचे निधन अत्यंत धक्कादायक आणि दुःखद असल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली आहे. मध्य भारतातील वैद्यकीय क्षेत्रात त्यांनी आपल्या अचूक निदान पद्धती, शस्त्रक्रियेतील कौशल्य आणि रुग्णांसोबत जपलेल्या संवेदनशीलतेने वेगळा विश्वास निर्माण केला आहे. नागपूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मागील २५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी सेवा दिली असून, अत्यंत कठीण अशा हजारो शस्त्रक्रिया अत्यंत यशस्वी करून त्यांनी रुग्णांना नवजीवन दिले. गरीब व सर्वसामान्य रुग्णांसाठी ते एकप्रकारे देवदूतच होते. एक कुशल शल्य विशारद, अत्यंत सुस्वभावी आणि रुग्णांच्या वेदनंशी आपुलकीने नाते जोडणारा एक समर्पित भावनेने सेवा देणारा तज्ञ व कौटुंबिक मित्र गमावल्याची भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या शोकसंदेशात व्यक्त केली आहे.

# नाशिक-सोलापूर-अक्कलकोट कॉरिडोरला मंजुरी मिळताच पंतप्रधान मोदींचे मराठीतून ट्वीट!

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आर्थिक व्यवहारांवरील कॅबिनेट समितीने नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहा पदरी ग्रीनफिल्ड कारिडारला अधिकृत मंजुरी दिली. हा प्रकल्प राज्याच्या आर्थिक आणि औद्योगिक विकासासाठी गेम चेंजर ठरणार आहे. नाशिक-सोलापूर-अक्कलकोट कारिडोरला मंत्रिमंडळाकडून मंजुरी मिळताच देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी चक्क मराठीतून ट्वीट केले.हा रस्ता पूर्णपणे नवीन मार्गावरून विकसित केला जाणार असल्याने याला ग्रीनफिल्ड कारिडार म्हटले जात आहे. नाशिक ते सोलापूर आणि पुढे अक्कलकोटपर्यंतचा प्रवासाचा कालावधी या कारिडारमुळे लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. उत्तर महाराष्ट्र आणि दक्षिण महाराष्ट्राला जोडणारा हा एक महत्त्वाचा दुवा ठरेल.



**पंतप्रधान नरेंद्र मोदींचे मराठीतून ट्वीट-** 'मंत्रिमंडळाने महाराष्ट्रातील नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहा पदरी ग्रीनफिल्ड कारिडारला मंजुरी दिली आहे. पीएम गतिशक्तीशी सुसंगत असलेला हा परिवर्तनकारी प्रकल्प प्रवासाचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करेल, पश्चिम-पूर्व संपर्क अधिक मजबूत करेल, लाजिस्टिक्सला चालना देईल आणि मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती करेल. त्यामुळे आर्थिक विकासाला चालना मिळेल', असे मोदी म्हणाले.

**आर्थिक आणि औद्योगिक फायदेः** शेतीमाल आणि औद्योगिक उत्पादनांची वाहतूक जलद होणार असल्याने लाजिस्टिक्स क्षेत्राला मोठी चालना मिळेल. या महामार्गाच्या बांधकामादरम्यान आणि त्यानंतर महामार्गालगत विकसित होणा-या उद्योगांमुळे मोठ्या प्रमाणावर स्थानिक रोजगार उपलब्ध होतील. सोलापूर आणि स्वामी समर्थांच्या दर्शनासाठी अक्कलकोटला जाणा-या भाविकांसाठी हा मार्ग अत्यंत सोयीचा ठरणार आहे.

# अमरावतीच्या अंबादेवी संस्थानास चिखलदरा येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची तीन एकर जमीन

**मुंबई/प्रतिनिधी-** अमरावती जिल्ह्यातील मौजे चिखलदरा येथील श्री. अंबादेवी संस्थान, अमरावती यांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची ३ एकर ८ आर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते. चिखलदरा येथील सुमारे साडे सात एकर जमीन १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देण्यात आली होती. पण ही जमीन वापराविना पडून होती. दरम्यान, अमरावतीच्या श्री अंबादेवी संस्थान यांनी चिखलदरा येथील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थान यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या संस्थानाने या दोन्ही देवस्थानच्या विकासासाठी शासनाकडे जमिनीची मागणी केली आहे. त्यानुसार पर्यटन विकास महामंडळाकडील सुमारे तीन एकर ८ आर जमीन शासन जमा करून घेउन, ती श्री. अंबादेवी संस्थानास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही जमीन मंदिर संस्थानाला भोगवटादार वर्ग - २ म्हणून मिळणार असून, जमीन केवळ धार्मिक प्रयोजनासाठी वापरता येणार आहे.



मंत्रिमंडळ निर्णय

# ED च्या हाती लागले 'घबाड'

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था-** दिल्लीत अंमलबजावणी संचालनालयाने(ED) एका मोठ्या कारवाईत कोट्यवधीची रोकड, सोने, हि-याचे दागिने आणि बेनामी संपत्तीचे कागदपत्रे जप्त केली आहेत. कर्ज फसवणूक प्रकरणातील आरोपी इंद्रजित सिंग यादव आणि त्याच्या सहका-यांविरुद्ध ३० डिसेंबर रोजी टाकलेल्या छाप्यांमध्ये ईडीने 'काळा खजिना' जप्त केला आहे. दिल्लीतील सर्वप्रिय विहार येथे ईडीच्या पथकाने इंद्रजितचा सहकारी अमन कुमारच्या घरी छापा टाकला. त्यावेळी सोन्याचे दागिने आणि कोट्यवधी रोकड पाहून अधिकारी हैराण झाले. ईडीने एकूण ५.१२ कोटींची रोकड जप्त केली. त्याशिवाय सोने आणि हि-याने भरलेली बॅगही ईडीच्या हाती लागली आहे. या सोने हि-याच्या दागिन्याची किंमत जवळपास ८.८० कोटी असल्याचे बोलले जाते. एक बॅग भरून चेक बुक आणि ३५ कोटी संपत्तीचे कागदपत्रेही जप्त करण्यात आले आहेत. सध्या ईडीकडून ही छापेमारी अजूनही सुरू आहे त्यामुळे हा आकडा आणखी वाढण्याचीही शक्यता आहे. ईडीने इंद्रजित सिंग यादव, त्याचे सहकारी आणि (पान २ वर)



**सापडली कोट्यवधीची रोकड, सोने हि-यांनी भरलेली बॅग**

## विजयी मिरवणुकीत नोटा उधळणे भोवले;
# मलकापूरचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिक जवारीवाले यांच्यावर गुन्हा दाखल


**बुलढाणा/प्रतिनिधी-** मलकापूर नगरपालिकेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीत विजयी झाल्याने काँग्रेसचे कार्यकर्ते अतिकभाई जवारीवाले शहराचे प्रथम नागरिक ठरले. विदर्भाचे प्रवेशद्वार असलेल्या मलकापूर च्या राजकीय क्षेत्रात कुणाच्या खिजगणंतितही नसलेले अतिकभाई आता मोठे नेते झाले. ज्येष्ठ भाजपा नेते आमदार चैनसूख संचेती आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजितदादा गटाच्या दोन उमेदवारांना पराभूत करून निवडून आल्याने त्यांचा बोलबाला (पान २ वर)












# ‘फक्त अभ्यास नव्हे, अनुभवही गरजेचा’ ‘विंग्स-२६’मध्ये स्पृहा जोशींचे मत

## कलाकारांशी संवादातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना चालना




**यवतमाळ/प्रतिनिधीः-** जगदंबा अभियांत्रिकी कॉलेज, यवतमाळ येथे आयोजित वार्षिक स्नेहसंमेलन ‘विंग्स-२६’ चा समारोप सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या बक्षीस वितरण समारंभासाठी सुप्रसिद्ध मराठी चित्रपट व दूरदर्शन अभिनेत्री स्पृहा जोशी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांशी आणि नंतर पत्रकारांशी मनमोकळा संवाद साधत विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबाबत महत्त्वपूर्ण विचार मांडले.

पत्रकारांशी संवाद साधताना स्पृहा जोशी म्हणाल्या की, ‘अशा कार्यक्रमांचा फायदा घेणारे विद्यार्थी आपले शैक्षणिक ज्ञाना सोबतच कला गुणांचाही विकास करतात. कलाकारांनी व ‘समवयस्क’व्यक्तींनी सांगितलेल्या गोष्टी अनेकदा विद्यार्थ्यांना जवळच्या वाटतात, त्यामुळे त्या त्यांना सहजपणे स्वीकारता येतात.

त्या पुढे म्हणाल्या की, किशोरवयीन आणि तरुण वयात विद्यार्थी अनेकदा पालक व शिक्षकांच्या मतांशी असहमत असतात.

या वयात ते प्रश्न विचारतात, स्वतःची ओळख शोधण्याच्या प्रक्रियेत असतात. ‘आई-वडील किंवा शिक्षकांनी सांगितलेल्या प्रत्येक गोष्टी त्या वयात पटतीलच असे नाही. मात्र, समवयस्क किंवा कलाकारांकडून आलेले अनुभव, विचार आणि सल्ले त्यांना अधिक आपलेसे वाटतात,’ असे त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमादरम्यान स्पृहा जोशी यांनी त्यांच्या चित्रपटसृष्टीतील प्रवासातील चांगले-वाईट अनुभव विद्यार्थ्यांसमोर उलगडले. तसेच काही कविता सादर करून विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला प्रोत्साहन दिले. ‘माझ्याकडील अनुभव, कविता किंवा विचार यापैकी काही गोष्टी विद्यार्थ्यांनी आत्मसात केल्या आणि त्यातून एखादा विद्यार्थी लिहायला, विचार करायला प्रवृत्त झाला, तर तीच या कार्यक्रमाची मोठी उपलब्धी आहे,’ असे त्या म्हणाल्या.

अभियांत्रिकी शिक्षण घेत असताना केवळ बंद दरवाज्यांआड अभ्यास न करता, जीवनातील विविध अनुभव, कला, साहित्य आणि समाज यांची ओळख होणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. ‘गेट-टुगेदर, स्नेहसंमेलन, संवादात्मक कार्यक्रम यातूनच प्रतिभासंपन्न विद्यार्थ्यांची निर्मिती होते. अशा कार्यक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना चालना मिळते,’ असे मत त्यांनी व्यक्त केले.‘विंग्स-२६’ या स्नेह संमेलनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक नव्हे तर सांस्कृतिक, कलात्मक आणि वैचारिक व्यासपीठ मिळाले असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी असे उपक्रम अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अजाबराव वातीले, सचिव डॉ. शितल वातीले, संचालक पवन वातीले,ज्योति वातीले,प्राची वातीले, प्राचार्य डॉ. प्रवीण डाखोळे, उपप्राचार्य विजय भांबेरे, प्राचार्य डॉ. राहुल बिजवार तसेच सर्व विभागप्रमुख मान्यवर म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यक्रम समन्वयक प्रा.अमोल ढूमणे, प्रा.धनश्री पोहरे, प्रा. ओम अडपावार, प्रा. दर्शना शंमभरकर व प्राध्यापक वृन्द, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# नवीन वर्ष, अपघात मुक्त ही संकल्पना
## सावळी दातुरा येथे जनजागृती मोहीम

**अचलपूर/प्रतिनिधीः-** दररोज वाहन अपघातांची संख्या वाढत असून महामार्गावर शून्य अपघात या उद्देशानुसार नवीन वर्ष अपघात मुक्त ही संकल्पना राबविण्याकरिता वाहन चालकांनी वाहतूक नियमाचे पुरेपूर पालन करण्याबाबत विविध पोस्टरद्वारे जनजागृती मोहीम राजा शिवछत्रपती परिवार तर्फे सावळी दातूरा येथे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा परिसर येथे राबविली.यावेळी प्रमुख उपस्थितीती म्हणून अचलपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी सुधीर अरबट ,सावळी दातुरा चे सरपंच कविता अमोल बोरेकार, ग्रा.पं.सदस्य जयश्री सचिन डांगे ,ग्रा.पं.सदस्य मो.राजू भाई ,पंचायत समिती गट शिक्षणधिकारी राम चौधरी , पत्रकार जितू रोडे, अमोल बोरेकार संचालक कृ.उ.बा समिती अचलपूर , सामाजिक कार्यकर्ते अमोल कथे ,जि.प.शाळेचे सर्व शिक्षक वृंद , पोलीस पाटील अशोक काठोळे , संतोष जगतराव अठाऊ, जेष्ठ नागरिक अरुण डांगे, राजा शिवछत्रपती परिवाराचे सदस्य सागर अंभोरे,धीरज मेटकर,सामाजिक कार्यकर्ते सागर पुरोहित,हर्षल

### राजा शिवछत्रपती परिवार तर्फे आयोजन



खांडझोड,अभिजीत वानखडे,अंकुश बोरेकार आदी उपस्थितीत होते. यावेळी मान्यवरांचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यानंतर मंचावर उपस्थितीत मान्यवरांचे सत्कार सोहळा संपन्न झाला.यावेळी उपस्थितीत मान्यवर , राजा शिवछत्रपती परिवार व सावळी दातुरा जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या विद्यार्थी नी पोस्टर द्वारे दुचाकी- चारचाकी वाहनचालकांना ’आवरा वेगाला, सावरा जीवाला, वाहन धिमा चलाये, अपना किमती जीवन बचाये, सफर मे कितनी कम हो देरी, हेल्मेट लगाना है जरुरी, वाहन आहेत चालवण्यासाठी, नव्हे अपघात करण्यासाठी असे विविध संदेश या उपक्रमाच्या माध्यमातून देण्यात आले.

यावेळी प्रमुख अतिथी,राजा शिवछत्रपती परिवार व विद्यार्थी यांनी दुचाकी वाहन चालकाशी सवांद ही साधला.या उपक्रमाचे सगळीकडे कौतुक होत आहे. अचलपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी सुधीर अरबट ,सावळी दातुरा चे सरपंच कविता अमोल बोरेकार , पत्रकार जितेंद्र रोडे यांनी सुद्धा कौतुक केले. यावेळी अचलपूर पंचायत समिती गटविकास अधिकारी सुधीर अरबट ,सावळी दातुरा चे सरपंच कविता अमोल बोरेकार ,पंचायत समिती गट शिक्षणधिकारी राम चौधरी , पत्रकार जितू रोडे, अमोल बोरेकार संचालक कृ.उ.बा समिती अचलपूर ,धीरज मेटकर यांनी सुद्धा महामार्गावर दिवसेंदिवस वाढत असणाऱ्या अपघाताच्या घटनांची संख्या कमी करण्यासाठी वाहतूक नियमाचे पुरेपूर पालन करण्याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी राजा शिवछत्रपती परिवार व अचलपूर युवा संघर्ष समितीचे सदस्य ,जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे चे शिक्षक - विद्यार्थी ,ग्रामस्थ उपस्थितीत होते .

# ५१४ जणांना कारणे दाखवा नोटीस
## -प्रशिक्षण व कर्तव्यात गैरहजर अधिकारी-कर्मचाऱ्यांवर कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रात निवडणूक प्रक्रियेच्या अनुषंगाने नेमणूक करण्यात आलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांपैकी ५१४ जण गैरहजर राहिल्याने त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, शिस्तबद्ध आणि कायद्याच्या चौकटीत पार पडावी यासाठी प्रशासन कटिबद्ध असून, कर्तव्यात कसूर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येणार असल्याची स्पष्ट भूमिका आयुक्तांनी घेतली आहे. प्रशिक्षणाच्या व्यवस्थेसाठी मनपाचे एकुण पथक ९०० व एकुण कर्मचारी ३६०० अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. निवडणूक प्रशिक्षण सत्रांना अनुपस्थित राहणे अथवा प्रत्यक्ष निवडणूक कर्तव्यात गैरहजर राहणे ही गंभीर बाब असून, अशा प्रकारच्या दुर्लक्षामुळे संपूर्ण निवडणूक व्यवस्थेवर परिणाम होऊ शकतो. त्यामुळे संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आली असून, समाधानकारक उत्तर न मिळाल्यास शिस्तभंगाची कारवाई, विभागीय चौकशी तसेच नियमानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

आयुक्तांनी स्पष्ट केले की, निवडणूक कर्तव्य हे कायदेशीर व अनिवार्य असून त्यात हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणाला उपस्थित राहून आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, अन्यथा कठोर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

प्रशासनाकडून पुढील काळात उपस्थितीवर काटेकोर लक्ष ठेवण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी आवश्यक ती सर्व उपाययोजना करण्यात येणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले.

## १ व १० वरिल उर्वरित

### १५० किलो स्फोटके जप्त

महामार्गावर नाकाबंदी होती. सकाळी ९ वाजता बूंदीहून टोंकच्या दिशेने एक सियाज कार जात होती. त्यात युरिया खताच्या गोण्या भरल्या होत्या. टीमला कारमधील लोक संशयास्पद वाटले, म्हणून त्यांचा पाठलाग केला.

यावर कारमधील सुरेंद्र(४८) आणि सुरेंद्र मोची (३३) रा. करवर (बूंदी) महामार्गावरून चिरौंज गावाच्या दिशेने पळून जाउ लागले. टीमने पाठलाग करून त्यांना गावाबाहेर थांबवले. त्यांनी सांगितले की, कारमधील लोकांना थांबवून चौकशी केली असता ते घाबरले.

### २९ महापालिकांमध्ये ३३ हजार

नवी मुंबई : ९५६ (१११ ) वसई-विरार : ९३५ (११५ ) कोल्हापूर : ८१३ (८१ ) कल्याण-डोंबिवली : ८६० (१२२ ) ठाणे: १ हजार १२८ (१३१ ) उल्हासनगर : ७०६ (७८ ) नाशिक : २ हजार ५३६ (१२२ ) पिंपरी - चिंचवड: १ हजार ९९३ (१२८) सोलापूर : १ हजार ४६० (१०२) अकोला : ७७७ (८०) अमरावती: १०२७ (८७) नागपूर : १ हजार ४५२ (१५१) चंद्रपूर : ६०६ (६६) लातूर : ७५९ (७०) परभणी : ९१९ (६५) भिवंडी-निजामपूर : १ हजार ३३ (९०) मालेगाव: ७१० (८४०) पनवेल: ३९१ (७८) मिरा -भाईंदर : ६३२ (९५) नांदेड-वाघाळा : १ हजार २०३ (८१ ) सांगली-मिरज-कुपवाड : १ हजार ६२ (७८) जळगाव: १ हजार ३८ (७५) धुळे: ७२१ (७४) अहिल्यानगर : ७८८ (६८) जालना : १ हजार २६० (६५)

### अखेर आठवलेंच्या रिपब्लिकन पक्षाला

जागावाटपात भाजप आणि शिवसेना शिंदे गटाने शेवटच्या क्षणापर्यंत वि□ासात न घेतल्याने संतापलेल्या आठवले यांनी मुंबईत ३९ उमेदवारांची घोषणा केली होती. आठवलेंच्या या निर्णयामुळे महायुतीत घटक पक्षांना सन्मानाची वागणूक मिळत नसल्याचा संदेश गेला होता. या पार्श्वभूमीवर आठवले यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेउन जागावाटपाबाबत चर्चा केली. रिपब्लिकन पक्षाने फडणवीस यांच्याकडे पक्षाला हव्या असलेल्या १७ जागांची यादी सोपवली. यापैकी पक्षाला किमान १२ जागा सोडल्या जाणार आहेत.

### सहा नगरसेवक बिनविरोध

ज्योत्स्ना प्रफुल पाटील बिनविरोध निवड झाली आहे. विरोधात उमेदवारी अर्ज नसल्याने ज्योत्स्ना पाटील यांचा बिनविरोध विजय झाला आहे. महापालिका निवडणुकीपूर्वी भाजपच्या दोन जागा बिनविरोध झाल्या आहेत. पनवेल महापालिका निवडणुकीमध्ये भाजपचा उमेदवार बिनविरोध निवडून आला आहे. शेकापच्या उमेदवाराचा अर्ज बाद झाल्याने प्रभाग क्रमांक १८ मधून नितीन पाटील बिनविरोध निवडून आले आहेत. शेकाप महाविकास आघाडीचे उमेदवार रोहन गावंड यांचा अर्ज छाननीत बाद झाल्याने नितीन पाटील विजयी झाले.

### हजारो रुग्णांना मृत्यूच्या दारातून

डा. पाखमोडे यांनी नागपूरच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून (जीएमसी) एमबीबीएस आणि एम.सी.एच. अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर त्यांनी मुंबईच्या नामांकित केईएम हास्पिटलमधून न्युरोसर्जरीचे उच्च शिक्षण घेतले. जीएमसीएचशी संलग्न असलेल्या सुपर स्पेशालिटी हास्पिटलमध्ये पाच वर्षे सेवा दिल्यानंतर, मार्च २०१४ मध्ये त्यांनी प्रसीद्ध न्युरोसर्जन डा. प्रमोद गिरी यांच्या सोबते न्युरान हास्पिटलची स्थापना केली. अत्यंत शांत, संयमी स्वभाव आणि रुग्णांप्रती असलेली संवेदनशीलता यामुळे ते रुग्णप्रिय डाक्टर म्हणून ओळखले जात. कठीण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पाडण्यात त्यांचा हातखंडा होता. डा. पाखमोडे यांच्या निधनावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तीव्र शोक व्यक्त केला आहे. एक अभ्यासू, तज्ज्ञ आणि रुग्णांविषयी कळवळा असलेला संवेदनशील ड?क्टर आपण गमावला आहे, अशा शब्दांत त्यांनी आपली संवेदना व्यक्तकेली. यासह वैद्यकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

### ED च्या हाती लागले ‘घबाड’

अपोलो ग्रीन एनर्जी लिमिटेड नावाच्या कंपनीविरुद्ध पीएमएलए गुन्हा दाखल केला आहे. यादववर खंडणी, खाजगी मुंतवणूकदारांकडून जबरदस्तीने कर्ज वसूल करणे, सशस्त्र धमकी देणे आणि या बेकायदेशीर कामांमधून कमिशन मिळवणे असे आरोप आहेत. हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील विविध ठिकाणी त्याच्याविरुद्ध सुमारे १५ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. या एफआयआरच्या आधारे ईडीने त्याच्याविरुद्ध मनी लाँड्रिंगची चौकशी सुरू केली आहे. ईडीने दिलेल्या माहितीनुसार इंद्रजित सिंगचा सहकारी अमन कुमार याच्या सर्वप्रिय विहार येथील घरातून आतापर्यंत ५.१२ कोटी रुपये रोख जप्त करण्यात आले आहेत.

### मलकापूरचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष

झाला. मात्र आता त्यांच्याविरुद्ध मलकापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्याने या विजयाला काहीसे गालबोट लागले आहे. गुन्हा दाखल होण्याचे कारण मजेदार आहेच पण नूतन अध्यक्षाना भावी काळात राजकारण करताना संयम ठेवण्याचा धडा शिकविणारे देखील आहे. मागील २१ डिसेंबर रोजी मलकापूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूकची मतमोजणी पूर्ण झाल्यानंतर काँग्रेस विजयाचा जल्लोष करीत होती. अध्यक्षीय लढतीत बाजी मारल्याने विजय मिरवणूक निघाली. यावेळी विजय साजरा करताना बेभान झालेल्या अतिकभाईंनी खिश्यातून नोटाचे बंडल काढून या नोटा उधळल्या.

याचा व्हिडिओ सोशल मीडियावर वेगाने व्हायरल झाला. ही चित्रफीत खूप गाजली आणि वादग्रस्त ठरली. या प्रकरणी तब्बल ९ दिवसानंतर मलकापूर नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिकभाई जवारीवाले यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपमुख्याधिकारी विठ्ठल भुसारी यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मलकापूर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी पालिकेचे उप मुख्याधिकारी विठ्ठल बाळासाहेब भुसारी,यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार २१ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजता, मलकापूर शहरातील लोखंडी रेल्वे पुलाजवळ, पारपेठकडील बाजूस नवनिर्वाचित नगराध्यक्ष अतिकभाई जवारीवाले यांनी आपल्या कार्यकर्त्यांसह विजय उत्सव साजरा केला.या उत्सवादरम्यान अतिकभाई जवारीवाले यांनी स्वत? नोटा उधळल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला.

### तिकीट न मिळाल्याने नाराज

आम्ही कोणता असा गुन्हा केला, की आम्हाला उमेदवारी नाकारण्यात आली, असा सवाल नाराज कार्यकर्त्यांनी जयंत डेहनकर आणि शिवराय कुळकर्णी यांना विचारला. यामुळे राजापेठ झोन कार्यालय परिसरात मोठा हंगामा झाला होता, तणावाची परिस्थिती देखील येथे निर्माण झाली होती.

**सोशल मीडियावर विश्वासघात झाल्याचे संदेश-** उमेदवारी न मिळाल्याने कुणी अश्रूंना वाट मोकळी करून दिली, तर कुणी समाज माध्यमांवर विश्वासघात झाल्याचे संदेश प्रसारीत केले. भाजपने मंगळवारी दुपारी बारा वाजताच्या सुमारास उमेदवारांना बी फॉर्मचे वाटप केले. हे वाटप भाजपचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या कॅम्प परिसरातील बंगल्यावर होते. ज्यांना उमेदवारी मिळाली नाही, त्यांनी याच ठिकाणी नाराजी व्यक्त केली. एका महिलेने तर मला जगायचेच नाही, मी जे काही करेल, त्यासाठी भाजपचे पदाधिकारीच जबाबदार राहतील, अशी धमकी दिली. इतर कार्यकर्त्यांनी या महिलेची समजूत काढली. अनेक वर्षांपासून भाजपसाठी घर, दार, कुटूंब, नातेवाईकांकडे दुर्लक्ष करून प्रामाणिकपणे काम केले, पण उमेदवारी मिळाली नाही. जात पाहून तिकिटांचे वाटप करण्यात आल्याचा आरोप काही महिलांनी केला. भाजपमध्ये आता ओबीसींना स्थान उरलेले नाही, अशी खंत या नाराज कार्यकर्त्यांनी उघडपणे व्यक्त केली.

### पैशाचे आमिष देऊन धर्मांतर

यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारीची ग्राभिर्याने दखल घेवुन ठाणेदार, पो.स्टे. बेनोडा यांनी तात्काळ घटनास्थळी जावुन सखोल चौकशी करून आरोपी रितेश बोन्द्रे यास पोलीस स्टेशन येथे आणुन सखोल विचारपुस केली. आरोपी रितेश बोन्द्रे याने चौकशी दरम्यान सदर घटनेत त्याचे सोबत इतर आरोपी आनंदकुमार बेजांमिन करी (वय ४७, रा. ब्राम्हणी कळमेश्वर, जि. नागपूर), सुधिर विल्यम जॉन विल्यम (वय ४०,रा.जेल फवन चमन काला, किडकोला,ता.नायाटिनकरा,जि.तिरूअनंतपुरम(केरल) ह.मु.इनमालवेल हाऊस,गोधनी,मानकापुर,नागपुर), विक्रम गोपाल सांडे (वय ३२, रा.कळमेश्वर) व इतर ४ महीलांचा समावेश असल्याचे चौकशी दरम्यान सांगीतले.

आरोपीने दिलेल्या बयानावरून सर्व आठ आरोपीना अटक करण्यात आली असुन वि.न्यायालया समक्ष हजर करण्यात आले. पुढील तपास बेनोडा पोलीस करित आहे.

सद्यस्थितीत परिसरात शांतता असुन सर्व नागरीकांना पोलीसांनी आवाहन केले आहे की, कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता कुठलाही अनुचित प्रकार निर्दशनास आल्यास त्वरीत नजिकच्या पोलीस स्टेशनला माहीती देवुन कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी पोलीसांना सहकार्य करावे.

### कॅनलमध्ये आढळला वाघिणीचा

कुंपणामुळे वाघिणीचा मृत्यू झाला, असा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच मृत वाघिणीला थेट कॅनलमध्ये फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचेही आढळले आहे.

बुधवारीं सकाळी स्थानिक नागरिकांना कॅनलमध्ये मृत वाघिण असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. तत्काळ उपवनसंरक्षक हरविर सिंग, एसीएफ हरि सरोदे, वर्धा वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, आरओ मंजुषा रवाळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. एनटीसीएचे प्रतिनिधी आशिष गोस्वामी, मुख्य वनसंरक्षकांचे (वन्यजीव) प्रतिनिधी कौस्तूभ गावंडे आणि हिंगणघाट येथील पशुवैद्यकीय अधिकारी चमूही घटनास्थळी पोहोचले.

स्थानिकांच्या मदतीने कॅनलमधून मृत वाघिणीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मृतदेहाची बारकाईने पाहणी करून सर्व अवयवांची शहानिशा केली. त्यानंतर त्रि-सदस्यीय पशुवैद्यकीय चमू डॉ. मंदार मराठे, डॉ. अरुण तुराळे आणि डॉ. ज्योती चौहाण यांनी शवविच्छेदन केले. प्रारंभिक अहवालानुसार विद्युत शॉकमुळे मृत्यू झाला असावा, असा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शवविच्छेदनानंतर नियमानुसार वाघिणीची विल्हेवाट करण्यात आली.

वनविभागाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, घटनेची सखोल चौकशी गोपनीय पद्धतीने केली जात आहे. घटनास्थळ, शेतातील कुंपण, वाघाच्या हालचाली आणि स्थानिक परिस्थितीची माहिती सविस्तर संकलित केली जात आहे. दोषींवर कठोर कारवाई करणे हे या प्रकरणातील प्राथमिक उद्दिष्ट आहे.

### उपोषणाच्या मागण्यांची पूर्तता

काढू पणाचे धोरण अवलंबले आहे.

उपोषणकर्त्याच्या मागण्या वैयक्तिक नसून सार्वजनिक हिताशी संबंधित असल्याचे सांगितले जात असताना त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे. जर एखाद्या नागरिकाला आपल्या हक्कासाठी स्वतःच्या जीवावर बेतणारा इशारा द्यावा लागत असेल तर हे प्रशासनाच्या अपयशाची आणि संवेदन शून्य कारभाराचे जिवंत उदाहरण ठरते. याबाबत एखादी अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण नैतिक व प्रशासकीय जबाबदारी दर्यापूर तहसील कार्यालय प्रशासनावरच राहील याची नोंद घ्यावी,असे निवदेनात नमूद आहे. येत्या दोन तारखेला तहसिल कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष चंदू रायबोले यांनी प्रशासनाला दिला आहे.

### फ्रेजरपुरा परिसरात शस्त्र

घातक शस्त्र बाळगून गुन्हा करण्याच्या तयारीत उभा आहे. माहितीच्या आधारे पोलीस पथकाने घटनास्थळी जाऊन संशयित निरज प्रविण नेवारे (वय १९, रा.समाधाननगर,अमरावती) याला ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्याच्याजवळ एक लोखंडी चाकू व एक स्टीलचा चायना चाकू असा एकूण २ हजार रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. पोलिसांकडून ते शस्त्र जप्त करण्यात आले. याप्रकरणात फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध आर्म अ‍ॅक्ट कलम ४/२५ तसेच मपोका कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

### भरधाव दुचाकीची बैलगाडीला

मधील सुर्या (वय २२, रा.भजदई, मध्यप्रदेश) यांचा अपघातात मृत्यू झाला तर जखमींमध्ये प्रसन्न नितीन माटे (वय १९), प्रज्वल गुरुदेव उमेकर (वय १९ ), पार्थ रवी गाभणे वय २०) यांचा समावेश असून सर्व अमरावती येथील आहेत.

घटनेच्यावेळी अमरावती येथील चार मित्र दोन दुचाकीने खोलापुरमार्गे दर्यापूर तालुक्यातील लासूर येथील आनंदेशवर मंदीरात दर्शनासाठी येत होते. दरम्यान लखापूर फाट्यानजीक पुलावरुन कापूस भरलेली बैलगाडी रस्ता ओलांडत असतांना दुचाकी जोरदार धडकली. या अपघातात दुचाकीवरील आर्यन जाधव व बैलगाडीतील सुर्या या दोघांचा घटनास्थळी मृत्यू झाला. माहिती मिळताच शिवसेनेचे रुगणसेवक गोपाल अरबट रुग्णवाहीका घेऊन घटनास्थळी पोहचले व मृतक आणि जखमींना उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. वृत्त लिहीस्तोवर दर्यापूर पोलीसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला आहे.

### १२ तासात जबरी चोरीचा

रोजी फिर्यादी शेख जाबीर शेख अब्दुल्ला (वय ३६, रा. चपराशीपुरा, अमरावती) हे बडनेऱ्यावरून अमरावतीकडे जात असताना कोडेश्वर टी-पॉईंटजवळील भारत पेट्रोल पंपासमोर स्प्लेंडर दुचाकीवर आलेल्या चार अज्ञात इसमांनी त्यांना अडवले. मारहाण करून १२,५०० रुपये रोख रक्कम जबरीने हिसकावून आरोपी पसार झाले. या प्रकरणी बडनेरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेची गंभीर दखल घेत पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी स्पष्ट आदेश दिले. त्यानुसार, पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली स्वतंत्र पथक नेमण्यात आले. गुप्त माहितीच्या मदतीने तपास करत असताना महादेव खोरी परिसरातून तीन विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. तपासादरम्यान या बालकांनी अमरावती शहर पोलीस आयुक्तालय हद्दीत इतरही गुन्हे केल्याचे निष्पन्न झाले. त्यात बडनेरा, नांदगाव पेठ व फ्रेजरपुरा पोलीस ठाण्यातील गंभीर गुन्ह्यांचा समावेश आहे. सर्व विधी संघर्षीत बालकांना पुढील कायदेशीर कारवाईसाठी पोलीस स्टेशन बडनेरा यांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्यासह गजानन सोनुने, दिपक सुंदरकर, सचिन बहाळे, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखिल गेडाम, योगेश पवार, संदीप खंडारे आदी अधिकाऱ्यांनी कारवाई केली.

### शेतकऱ्यांनी आमदारांच्या

शेतकऱ्यांच्या खात्यात आजतागायत एक रुपयाही जमा झालेला नाही. केवायसी, कागदपत्रे पाठपुरावा करूनही निधी मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. शेतकऱ्यांनी डफडी वाजवत महायुती सरकारचा जोरदार निषेध केला. शेतकरी रडतोय आणि सरकार झोपले आहे. तातडीने अतिवृष्टीचा निधी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावा अन्यथा यापेक्षाही उग्र आंदोलन छेडण्यात येईल असा थेट इशारा देण्यात आला. सरकार शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप यावेळी केला आहे. निवडणुकीच्या वेळी शेतकऱ्यांची आठवण काढू नये अशी संतप्त भावना आंदोलकांनी व्यक्त केली. वेळीच निर्णय न झाल्यास तीव्र स्वरूपाचा लढा उभारण्यात येईल असा निर्धार करण्यात आला. लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव यांच्या नेतृत्वात आंदोलन करणाऱ्यांमध्ये रमण लंगोटे ,आकाश खेलदार, ऋषिकेश रडके, संविधान मोहोड, जावेद पठाण, विजय भाटे ,विकास आवारे, सागर सोनारे ,प्रवीण तडस, गौरव वैद्य, स्वप्निल रखे, इमरान सौदागर, गौरव उल्हे, शाम पारिसे ,सोपान पोहकार, मदन बुदुडे, अशोकराव बंड यांचा सहभाग होता.

### अवैध दारू वाहतुक करणाऱ्यावर

केले. थर्टी फर्स्टला मोर्शी शहरासह तालुक्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी या दृष्टीने पोलीस निरिक्षक राहुल आठवले ठाणेदार,पोलीस स्टेशन मोर्शी यांनी त्यांचे अधिनस्त डी.बी. पथकाला थर्टी फर्स्टच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन मोर्शी हद्दीत अवैध धंदे करणाऱ्या ईसमांविरूध्द कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले होते. त्याअनुषंगाने दि. ३१ डिसेंबर २०२५ रोजी गोपनिय माहीती वरून ग्राम पिंपळखुटा (मोठा) ते पारडी जाण्याऱ्या रोडने इसम नामे अजय प्रल्हादराव मोहोड रा. पिंपळखुटा(मोठा) ता. मोर्शी यास त्याचे मोटर सायकलवर अवैधरित्या देशी दारू वाहतुक करतांना ताब्यात घेण्यात आले. सदर इसमाजवळून ४८ नग देशी दारू बॉबी संत्रा कंपनीच्या प्रत्येकी १८० मिली मापाच्या काचेच्या पावटया कि. ४८०० रू. व यामा कंपनीची एम टी १५ मो.सा.क्र.एम एच २७ डी एक्स ०५१२ किं.अं. २,००,००० रूपयेची असा एकुण २,०४,००० रूपयांचा मुद्देमाल जप्त करून महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधिक्षक विशाल आनंद,अप्पर पोलीस अधिक्षक पंकज कुमावत,उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक राहुल आठवले ठाणेदार पो स्टे मोर्शी यांचे नेतृत्वात डी.बी. पथकाचे पोउपनि आकाश शिवणकर, पोकॉ छत्रपती करपते, पोकॉ स्वप्निल बायस्कर यांनी केली.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, १ जानेवारी २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## जिल्हा प्रशासन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या कायम सोबत – आरडीसी विश्वनाथ घुगे

■ प्रतिनिधी | वाशिम ■

**देहदान व अवयवदान हे केवळ वैद्यकीय क्षेत्रासाठी उपयुक्त नसून ते समाजातील मानवतेचे सर्वोच्च प्रतीक आहे. एका व्यक्तीचा देह अनेक रुग्णांना नवे जीवन देऊ शकतो आणि वैद्यकीय शिक्षणाला दिशा देऊ शकतो. समाजात याबाबत असलेले गैरसमज दूर करून वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविणे ही काळाची गरज आहे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या या उपक्रमाला जिल्हा प्रशासनाचे पूर्ण सहकार्य असून, अशा जनजागृती मोहिमा सातत्याने राबविल्या गेल्या पाहिजेत. प्रत्येक नागरिकाने या चळवळीत सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी. असे प्रतिपादन निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी केले.**



शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित देहदान जनजागृती कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री घुगे बोलत होते. या कार्यक्रमाला वाशिम नगरपालीकेचे नगराध्यक्ष अनिल केंदळे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अविनाश पूरी, मुख्यमंत्री सहाय्यता निधी केंद्राच्या अधिक्षिका डॉ. नयना सारडा, माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे, अतिरिक्त अधिष्ठाता डॉ. धरमसिंग पवार, मोटार वाहन निरीक्षक गजानन हरणे, सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक रविदास विनकरे, प्रा. राजेश घुगे, तसेच धर्मगुरू प्रज्ञापाल भंते , पंकजदेव महाराज, जनार्दन मगर, हरिदास बनसोड, सामाजिक कार्यकर्ते अविनाश मारशेटवार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. एन. ए. रहेमान यांनी केले. त्यांनी देहदानाचे सामाजिक, शैक्षणिक व वैज्ञानिक महत्व सविस्तरपणे उपस्थितांना समजावून सांगितले. डॉ. हर्षाली जाधव यांनी अवयवदानाबाबत मार्गदर्शन करून उपस्थितांना अवयवदानाचा संकल्प करण्याचे आवाहन केले, तर डॉ. अविनाश पूरी यांनी नेत्रदानाचे महत्व विशद केले.


माध्यमिक शिक्षणाधिकारी मंगला धूपे यांनी अवयवदान हे जीवनदायी कार्य असल्याचे सांगून समाजातील प्रत्येक घटकाने यामध्ये सहभाग घ्यावा, असे मत व्यक्त केले. डॉ. नयना सारडा यांनी समाजऋण फेडण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे देहदान व अवयवदान असून याबाबत जनजागृती करणे अत्यंत गरजेचे असल्याचे नमूद केले. धर्मगुरू पंकजदेव महाराज यांनी आत्मा निघून गेल्यानंतर देहाला कोणतेही मूल्य राहत नाही, त्यामुळे नेत्रदान व अवयवदानाचा संकल्प प्रत्येकाने करावा,असे सांगत नेत्रदानाचा संकल्प जाहीर केला.

प्रज्ञापाल भंते यांनी मानवी जीवनातील पंचशीलांचे महत्व सांगत मानवतेचा संदेश दिला. सामाजिक कार्यकर्ते अविनाश मारशेटवार यांनी हा अभिनव व प्रेरणादायी उपक्रम असल्याचे सांगितले, तर जनार्दन मगर यांनी ही मोहीम देशव्यापी राबविण्याची गरज व्यक्त केली. मोटार वाहन निरीक्षक गजानन हरणे यांनी अपघातग्रस्तांच्या बाबतीत अवयवदानाचे महत्व अधोरेखित करत परिवहन विभागामार्फत जनजागृतीसाठी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. अधिष्ठाता डॉ. सतीन मेश्राम यांनी शवचिकित्सेसाठी देहदानाचे महत्व स्पष्ट करत, देहदान हे सर्वश्रेष्ठ दान असून स्वयंसेवी संस्थांनी या मोहिमेत पुढाकार घ्यावा, असे आवाहन केले. नगराध्यक्ष अनिल केंदळे यांनी या सामाजिक उपक्रमासाठी नगरपालिकेमार्फत सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. आणि आयबॅंकसाठी निश्चित प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या दरम्यान उपस्थितांना देहदान व अवयवदान पत्रिकांचे वितरण करण्यात आले. या जनजागृती कार्यक्रमाला शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राध्यापक, अधिकारी–कर्मचारी, विद्यार्थी तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## ऊर्जा संवर्धन ही काळाची गरज असून सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यावा - जिल्हाधिकारी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

### राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहांतर्गत कार्यशाळा उत्साहात



पर्यावरण संरक्षणासोबतच शाश्वत विकासासाठी सौर ऊर्जेचा वापर वाढविणे ही आजच्या काळाची अत्यंत गरज असून सौर ऊर्जेच्या वापरावर भर द्यावा असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

राष्ट्रीय ऊर्जा संवर्धन सप्ताहानिमित्त नियोजन भवन येथे आयोजित ऊर्जा बचत – काळाची गरज, ऊर्जा संवर्धनाचे महत्त्व व सध्याची शासकीय धोरणे या विषयावरील कार्यशाळेत ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

कार्यशाळेला निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शाहू भगत, कृषी उपसंचालक हिना शेख, जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी प्रफुल्ल खंडारे, महाऊर्जा जिल्हा व्यवस्थापक विजय काळे, ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक अच्युत मेहेंदळे तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी उपस्थित होते.

पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर यांनी सांगितले की, अनेक शासकीय कार्यालयांना वाढत्या वीज देयकांमुळे आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. शासकीय इमारतींवर सौर ऊर्जेचा वापर केल्यास वीजबिलात मोठी बचत होऊन ऊर्जा आत्मनिर्भरतेकडे वाटचाल करता येईल. ऊर्जेची बचत ही केवळ गरज नसून जबाबदारी आहे. दैनंदिन जीवनात छोटे-छोटे उपाय अवलंबल्यास मोठ्या प्रमाणात ऊर्जा संवर्धन साध्य होऊ शकते. भविष्यात विजेची मागणी वाढणार असल्याने आजपासूनच ऊर्जा बचतीची सवय लावणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. नागरिकांनी सौर व हरित ऊर्जेचा स्वीकार करून हरित व उज्ज्वल भविष्यासाठी योगदान द्यावे, असे आवाहनही त्यांनी केले.

निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांनी सांगितले की, प्रदूषणमुक्त ऊर्जा मिळविणे ही काळाची गरज आहे. ग्लोबल वॉर्मिंगच्या समस्येला तोंड देण्यासाठी ग्रीन एनर्जीचा वापर वाढवावा लागेल. लहान उपाययोजनांतूनही प्रभावी ऊर्जा संवर्धन शक्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ऊर्जा व्यवस्थापन परीक्षक मेहेंदळे यांनी वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण आणि वाढत्या ऊर्जा गरजांमुळे पारंपरिक ऊर्जास्रोतांवर ताण वाढत असल्याचे सांगितले. या पार्श्वभूमीवर सौर ऊर्जा हा स्वच्छ, सुरक्षित आणि पर्यावरणपूरक पर्याय असून कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठी तो अत्यंत उपयुक्त ठरेल, असे त्यांनी नमूद केले. ऊर्जा बचतीचा वसा जपण्याचे आवाहनही त्यांनी केले.

## श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय डॉ. पंजाबराव देशमुख जयंती उत्सवाचा समारोप

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■



श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती संचालित श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, वनोजा येथे शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त आयोजित उत्सवाचा आज दि. २९ डिसेंबर रोजी समारोप झाला. या जयंती उत्सवाची सुरुवात दि. २५ डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आली होती.

समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक जी. एच. हाडे हे होते, तर प्रमुख अतिथी म्हणून पालक-शिक्षक संघाचे उपाध्यक्ष लक्ष्मण गोरे उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून सुरेश राऊत, गंगादीप राऊत, गजानन राऊत (विशेष निमंत्रित सदस्य), पवन राऊत, ज्येष्ठ पत्रकार गोवर्धन राऊत तसेच प्रभारी पर्यवेक्षक एस. पी. नारळे यांची उपस्थिती लाभली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या पुतळ्यास व प्रतिमेस पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी पर्यवेक्षक एस. पी. नारळे यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांची गीतगायन स्पर्धा घेण्यात आली. जयंती उत्सवानिमित्त आयोजित विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक जी. एच. हाडे यांनी विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्स्फूर्त सहभाग घेतल्याबद्दल त्यांचे कौतुक केले व अशा उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओबीसी आरक्षण वादा; मालेगाव ५ नगरसेवकांचे पद धोक्यात

■ अक्षय सावले ■

*मालेगांव : नगरपंचायतीतील नव-निर्वाचित सत्तासंरचनेवर ओबीसी आरक्षणाच्या वादाने गंभीर सावट निर्माण झाले आहे. ५० टक्क्यांपेक्षा अधिक आरक्षणासंदर्भातील प्रकरण सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने, मालेगाव नगरपंचायतीतील ओबीसी प्रवर्गातून निवडून आलेल्या पाच नगरसेवकांचे पद सध्या टांगती तलवारीखाली आहे.*

मालेगाव नगरपंचायतीतील एकूण जागांच्या आरक्षण रचनेवर आता न्यायालयीन कसोटी लागली असून, येत्या २१ जानेवारी रोजी होणाऱ्या सुनावणीकडे संपूर्ण मालेगाव शहराचे लक्ष लागले आहे. न्यायालयाने आरक्षण रचना अवैध ठरविल्यास संबंधित ओबीसी जागांवरील निवड रद्द होण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम नगरपंचायतीतील सत्ता संतुलनावर होणार असून नगराध्यक्ष / उपाध्यक्ष व विविध सभापती पदांच्या समीकरणांमध्ये मोठे बदल होऊ शकतात. या प्रकरणामुळे मालेगाव नगरपंचायत प्रशासनात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. नगरपंचायतीचे निर्णय विकासकामांचे प्रस्ताव तसेच पुढील धोरणात्मक निर्णय सध्या सावधगिरीने घेतले जात असल्याचे चित्र आहे. दुसरीकडे राजकीय पक्षांमध्येही अंतर्गत हालचालींना वेग आला असून संभाव्य बदलांसाठी सर्वच गट तयारीत असल्याचे दिसून येते. मालेगावातील ओबीसी समाजामध्ये या निर्णयाबाबत तीव्र चर्चा सुरू असून स्थानिक नेतृत्वाकडून आरक्षण टिकवण्यासाठी न्यायालयीन व प्रशासकीय पातळीवर ठोस भूमिका घ्यावी अशी मागणी होत आहे. मालेगाव नगरपंचायतीचे भवितव्य सर्वोच्च न्यायालयाच्या २१ जानेवारीच्या निर्णयावर अवलंबून असून निकालानंतरच स्पष्ट चित्र समोर येणार आहे .

## पंजाबराव राऊत यांना राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

■ प्रतिनिधी | कारंजा ■



श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, आकोट अंतर्गत कार्यरत 'मध्यस्थी वधू-वर सूचक मंडळ, आकोट' यांच्या वतीने दिला जाणारा मानाचा राज्यस्तरीय 'श्री संत वासुदेव महाराज सोयरिक सेवा सन्मान' पुरस्कार यावर्षी कारंजा लाड येथील ज्येष्ठ समाजसेवक पंजाबराव राऊत यांना जाहीर करण्यात आला आहे.

समाजातील विवाहयोग्य मुला-मुलींचे विवाह जुळवण्यासाठी निष्काम भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तीला प्रतिवर्षी या राज्यस्तरीय पुरस्काराने गौरविण्यात येते. ३० वर्षांच्या सेवाकार्याचा गौरव पंजाबराव राऊत हे गेल्या ३० वर्षांपासून सामाजिक बांधिलकी जोपासत विवाह जुळवण्याचे पवित्र कार्य करत आहेत. आजच्या काळात मुला-मुलींचे विवाह जुळवणे अत्यंत कठीण झाले असताना, राऊत यांनी स्वतःला या कार्यासाठी वाहून घेतले आहे. विशेष म्हणजे, यासाठी कोणतेही मानधन किंवा आर्थिक लाभ न घेता, केवळ सेवाभावी वृत्तीने ते अनुरूप स्थळे सुचवून शेकडो कुटुंबांचे संसार उभे करण्यास मदत करत आहेत. त्यांच्या या निःस्वार्थ कार्याची दखल घेऊन मध्यस्थी मंडळाने त्यांना हा सन्मान पुरस्कार जाहीर केला आहे.

## राष्ट्रीय ग्राहकदिनानिमित्त संयुक्त कार्यक्रम संपन्न



■ प्रतिनिधी | वाशिम ■

वाशिम तहसील येथील नवीन सभागृहात २४ डिसेंबर २०२५ रोजी अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम, जिल्हाधिकारी कार्यालय (पुरवठा शाखा), जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम व तहसील कार्यालय, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय ग्राहकदिन उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम – जुगलकिशोर कोठारी होते. व्यासपीठावर अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – व्ही. आर. गावंडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम – व्ही. जी. चौखंडे, अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम – अनुप बाकलीवाल, सहायक जिल्हा पुरवठा अधिकारी, वाशिम – भारती सोनटक्के, मुख्य लोक अभिरक्षक, वाशिम – परमेश्वर शेळके, तहसीलदार, वाशिम – निलेश पळसकर, सदस्य, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – नागेश उबाळे, नायब तहसीलदार, वाशिम – साहेबराव नप्ते तसेच निरीक्षण अधिकारी, वाशिम – मनोज लटारे उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय ग्राहक पंचायत, वाशिम – जुगलकिशोर कोठारी, अध्यक्ष, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, वाशिम – व्ही. आर. गावंडे, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, वाशिम – व्ही. जी. चौखंडे व अध्यक्ष, जिल्हा विधिज्ञ संघ, वाशिम – अनुप बाकलीवाल यांची समायोजित मनोगत व्यक्त केले.

प्रमुख अतिथींनी ग्राहक संरक्षण कायदे, ग्राहकांचे हक्क तसेच तक्रार निवारण प्रक्रियेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन मुख्य लोक अभिरक्षक, वाशिम – परमेश्वर शेळके यांनी केले, तर आभार प्रदर्शन तहसीलदार, वाशिम – निलेश पळसकर यांनी केले.

## मोटार वाहनधारकांसाठी दिलासा : आरटीओचा मासिक शिबीर दौरा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील मोटार वाहन चालक व वाहन मालक यांच्या सोयीसाठी उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, वाशिम यांच्या वतीने मोटार वाहन निरीक्षकांचा मासिक शिबीर दौरा आयोजित करण्यात आला आहे. शिबिरांमध्ये वाहन कर वसुली, मोटार वाहन नोंदणी, वाहन तपासणी वाहन चालक अनुज्ञप्ती संबंधित कामकाज करण्यात येणार असून सदर शिबिरांमध्ये सारथी प्रणालीवरून ऑनलाईन अपॉइंटमेंट घेतलेले अर्जच स्वीकारले जाणार आहेत. जानेवारी महिन्यात ५, ९, १५, १९ व २७, फेब्रुवारी महिन्यात ४, १२, १६, २० व २५, मार्च महिन्यात ५, ९, १६, २० व २५, एप्रिल महिन्यात ६, १०, १६, २२ व २७, मे महिन्यात ४, ११, १५, २२ व २६ तसेच जून महिन्यात ५, ११, १७, २३ व २९ रोजी शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

## ३ जानेवारी रोजी गुरूदेव सेवा मंडळाची महत्वपुर्ण सभेचे आयोजन

■ प्रतिनिधी | वाशिम ■



अखील भारतीय श्री गुरूदेवसेवा मंडळ/श्री क्षेत्र गुरूकुंज आश्रम अंतर्गत केंद्रीय प्रचाार विभाग द्वारा श्री गुरूदेव सेवा मंडळ वाशिमच्या वतीने शनीवार ३ जानेवारी रोजी दुपारी १ वाजता मंगरूळपीर येथील सामुदायीक पार्थना मंदीर सभागृहात जिल्हास्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले.

यामध्ये नवीन कार्यकरनीचे गठन संबंधीत चर्चा करून नीयुत्त्या करण्यात येणार आहे. सभेला जिवन प्रचारक लक्ष्मनराव आवटे दादा हे अध्यक्षता करनार आहे .ग्रामगीता जिवन विकास परीक्षा जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर पाटील कवळे महाराज, ज्येष्ठ प्रचारक गजाननराव इंगळे गुरूजी, मध्यवर्ती प्रतीनीधी रवींद्र वार्डेकर यांच्या उपस्थीतीत पार पडणार आहे.सदर सभेमध्ये जिल्हा तालुका शहर पुरुष व महिला कार्यकारनीचे गठण करण्यात येनार आहे.सदर बैठकीला जिल्हयातील तालुक्यातील सर्व गुरूदेव प्रेमी महिला, पुरूश ,पदाधिकारी यांनी उपस्थीत रहावे असे आव्हान जिल्हा सेवाधिकारी सुनील दशमुखे, जिल्हा प्रचारक दत्ता रोकडे ,महिला विभाग जिल्हा सेवाधिकारी सौ.जोती उगले ,महिला जिल्हा प्रचारक सौ.हर्षा अंधारे यांनी केले आहे. सदर बैठकी मध्ये प्रचार प्रमुख गोपाल कडु यांच्या पत्रानुसार जिल्हा पातळीवर श्री गुरूदेव सेवा मंडळाच्या प्रचार प्रसार योजनाबद्ध पद्धतीने राबवीन नवीन शाखा नोंदनी व जुण्या शाखेचे नुतनीकरन करने ,सामुदायीक ध्यान प्रार्थना, रामधुन आदी उपक्रम राबवीण्या करीता परीश्रम घ्यावे.

## महिला व बालकल्याण विभागात धक्कादायक प्रकार : सॅम्पल टीव्हीच 'गायब'!


## कर्मचाऱ्याची उडवाउडवी, अॅट्रॉसिटीची धमकी; जिल्हा परिषदेत खळबळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

*जिल्हा परिषद अकोला अंतर्गत महिला व बालकल्याण विभागात अंगणवाडी डिजिटलायझेशनच्या नावाखाली गंभीर गैरप्रकार उघडकीस आला असून कार्यालयात जमा केलेला ३२ इंची एलईडी टीव्ही गहाळ झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. विशेष म्हणजे, संबंधित पुरवठादाराकडे टीव्ही जमा केल्याची अधिकृत पोचपावती असतानाही जबाबदार अधिकारी व कर्मचारी हात वर करत असल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.*

महिला व बालकल्याण विभागाने जेम पोर्टलद्वारे अंगणवाड्यांसाठी ई-लर्निंग सॉफ्टवेअर व ३२ इंची एलईडी टीव्हीची मागणी केली होती. त्यानुसार वैष्णवी एंटरप्रायझेस (ॆ्रैर्ह्रैन ह्रींॅगे) या कंपनीकडून नमुना म्हणून टीव्ही व ई-लर्निंग सॉफ्टवेअर कार्यालयात अधिकृतरीत्या जमा करण्यात आले होते. मात्र सदर टेंडर अंतिम टप्प्यात पास न झाल्याने संबंधित कंपनीने नियमाप्रमाणे आपला टीव्ही परत मागितला.

यासाठी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बालकल्याण) यांच्याकडे रितसर अर्ज सादर करण्यात आला, मात्र प्रत्यक्षात संबंधित कर्मचारी नितीन दांडगे यांनी उडवाउडवीची उत्तरे देत टीव्ही परत देण्यास टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप आहे. कळस म्हणजे, 'टीव्ही चोरीला गेला आहे, आम्ही काही देऊ शकत नाही, जे करायचे ते करा,' असे उद्धट उत्तर देण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे.



इतकेच नव्हे तर विचारणा करण्यासाठी कार्यालयात गेल्यावर अॅट्रॉसिटी दाखल करण्याची धमकी दिल्याचा धक्कादायक आरोपही करण्यात आला आहे. त्यामुळे पीडित व्यावसायिक मानसिक त्रासात असून, प्रशासनाकडून संरक्षण व न्यायाची मागणी करत आहे.

**क्वालिफिकेशनवरही संशय :** या प्रकरणाला आणखी गंभीर वळण देणारी बाब म्हणजे ज्या तीन कंपन्या क्वालिफाय करण्यात आल्या, त्या कंपन्यांचे सॅम्पल टीव्ही कार्यालयात सादरच झालेले नव्हते, तरीही त्यांना पात्र ठरवून आदेश देण्यात आल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

यामुळे संपूर्ण निविदा प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर संशय निर्माण झाला आहे.

**प्रशासन मौन, चौकशी कधी? :** एका बाजूला सरकारी कार्यालयात जमा केलेला साहित्य गहाळ होतो, दुसऱ्या बाजूला जबाबदार कर्मचारी उडवाउडवी व धमक्यांचा वापर करतात—हा प्रकार म्हणजे जिल्हा परिषदेतील बेफिकीर आणि बेजबाबदार कारभाराचा नमुना नाही काय? असा सवाल उपस्थित होत आहे. या गंभीर तक्रारीची तात्काळ उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई होणार का, की प्रकरण नेहमीप्रमाणे फाइलमध्येच दडपले जाणार, याकडे आता संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक ३७ ■ गुरुवार, १ जानेवारी २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## सेलू-मुरपाडमध्ये वाघिणीचा मृतदेह; बेकायदेशीर विद्युत कुंपणाचा भयंकर फंदा

### कॅनलमध्ये आढळला मृत वाघिणीचा संशयास्पद मृतदेह

**हिंगणघाट / वर्धा जनमाध्यम :** हिंगणघाट तालुक्यातील सेलू-मुरपाड परिसरातील पोथरा प्रकल्पाच्या कॅनलमध्ये वाघिणीचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना सरत्या वर्षाचा अखेरचा दिवस, ३१ डिसेंबर रोजी सकाळी समोर आली. प्रादेशिक वनविभागाने घटनेची गंभीर दखल घेत तातडीने घटनास्थळी टीम पाठवून सखोल तपास सुरू केला आहे.

मृत वाघिणीचे वय अंदाजे ३ ते ४ वर्ष असून ती पूर्ण वाढलेली व सुदृढ होती. प्राथमिक तपासानुसार शेतातील बेकायदेशीर विद्युत कुंपणामुळे वाघिणीचा मृत्यू झाला, असा संशय व्यक्त केला जात आहे. तसेच मृत वाघिणीला थेट कॅनलमध्ये फेकून पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न झाल्याचेही आढळले आहे.

बुधवार सकाळी स्थानिक नागरिकांना कॅनलमध्ये मृत वाघिणी दिसल्याचे निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ वनविभागाला माहिती दिली. तत्काळ उपवनसंरक्षक हरविर सिंग, एसीएफ हरि सरोदे, वर्धा वनपरिक्षेत्र अधिकारी वैशाली भलावी, आरओ मंजुषा रवाळे यांनी घटनास्थळी धाव घेतली. एनटीसीएचे प्रतिनिधी आशिष गोस्वामी, मुख्य वनसंरक्षकांचे (वन्यजीव) प्रतिनिधी कौस्तुभ गावंडे आणि हिंगणघाट येथील पशुवैद्यकीय अधिकारी चमूही घटनास्थळी पोहोचले.





स्थानिकांच्या मदतीने कॅनलमधून मृत वाघिणीचा मृतदेह बाहेर काढण्यात आला. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी मृतदेहाची बारकाईने पाहणी करून सर्व अवयवांची शहानिशा केली. त्यानंतर त्रि-सदस्यीय पशुवैद्यकीय चमू डॉ. मंदार मराठे, डॉ. अरुण तुराळे आणि डॉ. ज्योती चौहाण यांनी शवविच्छेदन केले. प्रारंभिक अहवालानुसार विद्युत शॉकमुळे मृत्यू झाला असावा, असा संशय अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. शवविच्छेदनानंतर नियमानुसार वाघिणीची विल्हेवाट करण्यात आली.

वनविभागाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, घटनेची सखोल चौकशी गोपनीय पद्धतीने केली जात आहे. घटनास्थळ, शेतातील कुंपण, वाघाच्या हालचाली आणि स्थानिक परिस्थितीची माहिती सविस्तर संकलित केली जात आहे. दोषींवर कठोर कारवाई करणे हे या प्रकरणातील प्राथमिक उद्दिष्ट आहे.

**आरओचा गाफिलपणा? मानव-वन्यजीव संघर्षाची गंभीर धोक्याची घंटा**

हिंगणघाट तालुक्यातील काही भागात मागील वर्षभर वाघांचा मुक्त संचार सुरू आहे. नोव्हेंबरमध्ये आजंती परिसरात वाघाचे दर्शन झाल्यानंतर वनविभाग ॲक्शन मोडवर आला होता. मात्र, नंतर हा पट्टेदार वाघ गोजी परिसरातून बेपत्ता झाला. मृत वाघिणीचा मृतदेह त्याच क्षेत्रात आढळल्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी पुरेशी खबरदारी घेतली गेली होती का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. वनकर्मचाऱ्यांमध्ये आरओ गाफिल होता का, ही चर्चा सध्या रंगत आहे.

स्थानिक रहिवाशांनी ही घटना अत्यंत गंभीर मानली. वाघिणीला मारून नष्ट करणे आणि तिचा मृतदेह कॅनलमध्ये फेकणे ही भयंकर गोष्ट आहे, असे एका नागरिकाने सांगितले. वनविभागाचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे की, मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी आणि वन्यजीवांचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्यात येणार आहेत. हिंगणघाट आणि आजंती परिसरातील वाघांच्या हालचालींवर सतत लक्ष ठेवले जात आहे. मात्र या मृत्यूमुळे वन्यजीव संवर्धन आणि सुरक्षा याबाबत आरओ आणि संबंधित कर्मचाऱ्यांची गाफिलपणा किंवा दुर्लक्ष तपासणे गरजेचे ठरले आहे.

### थर्टीफस्टला नाल्याच्या पाण्याची दारू पिणार होते वर्धेकर

## घाण पाणी, घातक दारू आणि काळा नफा : एलसीबीने उद्ध्वस्त केला अवैध नशेचा अड्डा

### -५.०९ लाखांचा मुद्देमाल जप्त, तिघे आरोपी गजाआड

**वर्धा जनमाध्यम :** थर्टीफस्टच्या जल्लोषाआड वर्धा जिल्ह्यात नागरिकांच्या जीवाशी खेळणारा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. नाल्याच्या दूषित, घाण पाण्याचा वापर करून सर्रास गावठी दारू गाळली जात असल्याचा गंभीर प्रकार स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) धडक कारवाईत उघडकीस आला. अल्लीपूर पोलिस ठाण्याच्या हद्दीतील धोत्रा शिवारात सुरू असलेला हा अवैध नशेचा कारखाना एलसीबीने जमीनदोस्त करत तब्बल ५ लाख ९ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.



धोत्रा शिवारातील नाल्याच्या काठावर मोठ्या प्रमाणात गावठी दारूची निर्मिती करून ती परिसरात चढ्या दराने विकली जात असल्याची गुप्त माहिती एलसीबीला मिळाली होती. थर्टीफस्टच्या पार्श्वभूमीवर अवैध दारूविक्री रोखण्यासाठी पोलिस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांनी दिलेल्या स्पष्ट आदेशानुसार एलसीबीच्या पथकाने नियोजनबद्धरीत्या छापा टाकला. छाप्यादरम्यान दारू गाळण्याची संपूर्ण यंत्रणा कार्यरत अवस्थेत आढळून आली, तर परिसरात दारूचा दर्प दरवळत होता.

पोलिसांनी घटनास्थळावरून ४,४०० लिटर मोह रसायन सडवा, १६८ लिटर तयार गावठी दारू, दारू गाळण्यासाठी वापरण्यात येणारे २३ मोठे ड्रम, गुळ तसेच इतर साहित्य जप्त केले. एकूण जप्त मुद्देमालाची किंमत ५.०९ लाख रुपये इतकी असल्याचे पोलिसांनी सांगितले. विशेष म्हणजे, दारू गाळण्यासाठी थेट नाल्याचे पाणी वापरण्यात येत असल्याचे स्पष्ट झाल्याने सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे.

या प्रकरणी प्रफुल्ल विक्रम कांबळे, गजानन रामचंद्र कोपरकर आणि यश गंगाधर वानखेडे (सर्व रा. तळेगाव, ता.) यांच्याविरुद्ध अल्लीपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी थर्टीफस्टच्या दिवशी जादा नफा कमावण्यासाठी नागरिकांच्या आरोग्याशी खेळत होते, असा आरोप पोलिसांनी केला आहे.

या कारवाईमुळे अवैध दारू व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून, जिल्ह्यात सुरू असलेल्या नशेच्या काळ्या धंद्याला मोठा धक्का बसला आहे. पोलिसांकडून सध्या परिसरात आणखी अशा अड्ड्यांचा शोध घेण्यासाठी विशेष मोहीम सुरू करण्यात आली आहे. बेकायदेशीर दारू निर्मिती व विक्री करणाऱ्यांवर यापुढेही कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे.

ही संपूर्ण कारवाई एलसीबीचे अधिकारी अरविंद येनुरकर, रोशन निंबोळकर, रवी पुरोहित आणि अभिषेक नाईक यांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली. पुढील तपास अल्लीपूर पोलिस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

## थर्टीफस्टला अंनिसची व्यसनमुक्ती मोहिम; नववर्षाचे स्वागत निरोगी जीवनशैलीने करण्याचा संदेश

### - 'द' दारूचा नाही, तर 'दुधाचा

**वर्धा जनमाध्यम :** नववर्षाच्या स्वागताच्या पार्श्वभूमीवर, दारू आणि व्यसनांवर समाजात जनजागृती करण्यासाठी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती (अंनिस) ने ३१ डिसेंबर रोजी ठोस उपक्रम राबविला. 'चला व्यसनाला बदनाम करू या' असा घोषवाक्य घेत त्यांनी 'द' दारूचा नाही, तर 'दुधाचा' असा ठोस संदेश नागरिकांना दिला. थर्टीफस्टच्या पारंपरिक नशेसंदर्भात हा मोहिमेचा उपक्रम अत्यंत प्रभावी ठरला.

सकाळी ९ वाजता दयालनगर परिसरातील कामगार चौकात आयोजित या व्यसनमुक्ती कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. विनय शादिजा होते. कार्यक्रमास डॉ. प्रवीण धाकटे, डॉ. नरेंद्रकुमार कांबळे, महेश दुबे, राजू वाघमारे, प्रियदर्शना भेले, उषा कांबळे, ज्योत्स्ना वासनिक, सुरेश रंगारी, शीतल बनसोड, चंद्रप्रकाश बनसोड, विलास नागदेवते, हरिश्चंद्र भुरे, संदीप कांबळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात व्यसनांचे दुष्परिणाम ठळकपणे मांडले गेले. वक्त्यांनी सांगितले की, दारू, सिगारेट आणि इतर व्यसनांमुळे केवळ आरोग्याचा हानी होत नाही, तर आर्थिक तुटवडाही निर्माण होतो, कौटुंबिक जीवन उद्ध्वस्त होते आणि समाजात अस्थिरता वाढते. नववर्षाच्या निमित्ताने शुद्ध, निरोगी आणि व्यसनमुक्त जीवन जगण्याची प्रेरणा नागरिकांना देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रस्ताविक ज्योत्स्ना वासनिक यांनी केले, तर संचालन शीतल बनसोड यांनी केले. आभारप्रदर्शन सुरेश रंगारी यांनी केले. यावेळी दशरथ गवळी, सुधाकर दडमल, जानराव नागमोते, अनिल भोंगाडे आदी नागरिक उपस्थित होते आणि त्यांनी मोहिमेत उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

अंनिसच्या या उपक्रमामुळे नववर्षाचे स्वागत केवळ जल्लोषाने नव्हे, तर निरोगी जीवनशैली, समाजाभिमुख विचार आणि व्यसनमुक्त संस्कृतीने करण्याचा संदेश व्यापक पातळीवर नागरिकांपर्यंत पोहचला.

## भाजपा अनुसूचित जाती मोर्चा वर्धा जिल्हा कार्यकारिणी जाहीर

### ९९ सदस्यीय सर्वसमावेशक संघटन; तळागाळातील कार्यकर्त्यांना संधी

**वर्धा जनमाध्यम :** प्रदेश भाजपाच्या निर्देशानुसार भाजपा अनुसूचित जाती मोर्चा वर्धा जिल्ह्याची नवी कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. मंगळवार, ३१ डिसेंबर रोजी वर्धा येथील भाजपा कार्यालयात जिल्हाध्यक्ष अशोक विजयकर यांनी ही घोषणा केली. विदर्भ संघटन मंत्री डॉ. उपेंद्र कोठेकर, जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, आमदार दादाराव केचे, आमदार समीर कुणावार, आमदार राजेश बकाने, आमदार सुमित वानखेडे, माजी खासदार रामदास तडस, माजी खासदार सुरेश वाघमारे तसेच भाजप जिल्हाध्यक्ष संजय गाते यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यकारिणी गठित करण्यात आली आहे.

२०२५ साठी जाहीर झालेल्या या जिल्हा कार्यकारिणीत एकूण ९९ सदस्यांचा समावेश असून



अशोक विजयकर



प्रविण डोंगरे



मनोज वालदे



अतुल नंदागवळी

त्यामध्ये ३ जिल्हा सरचिटणीस, ८ जिल्हा उपाध्यक्ष, १० जिल्हा चिटणीस, १ कोषाध्यक्ष, १ जिल्हा युवाप्रमुख, १ जिल्हा युवती प्रमुख व ५० जिल्हा कार्यकारिणी सदस्यांचा समावेश आहे. याशिवाय १४ कायम निमंत्रित व १० विशेष निमंत्रित सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. अनुसूचित जाती समाजातील विविध उपजातींमधील अनुभवी, कार्यक्षम व सक्रिय कार्यकर्त्यांना स्थान देत भौगोलिक आणि सामाजिक समतोल साधण्याचा प्रयत्न या कार्यकारिणीत करण्यात आला आहे. वर्धा जिल्ह्यातील चारही विधानसभा मतदारसंघ, तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सर्कलमधील कार्यकर्त्यांना प्रतिनिधित्व देण्यात आल्याने ही कार्यकारिणी सर्वसमावेशक असल्याचा विश्वास जिल्हाध्यक्ष अशोक विजयकर यांनी व्यक्त केला. नव्या कार्यकारिणीमुळे संघटन अधिक मजबूत होऊन अनुसूचित जाती समाजातील प्रश्न प्रभावीपणे मांडता येतील, तसेच भाजपाचे कार्य तळागाळापर्यंत पोहोचेल, असा निर्धार त्यांनी व्यक्त केला. या नवीन कार्यकारिणीची लवकरच बैठक घेण्यात येणार असून भाजपा नेत्यांच्या उपस्थितीत सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात येणार असल्याची माहितीही देण्यात आली.

## कर्जबाजारीपणा व नापिकीचा तडाखा : युवा शेतकऱ्याने संपवले जीवन

**मोझरी (शेकापूर) :** नापिकी, अतिवृष्टी आणि वाढत्या कर्जाच्या विळख्यात अडकलेल्या टाकळी (दरणे) येथील युवा शेतकऱ्याने आत्महत्येचा टोकाचा निर्णय घेतल्याची दुर्दैवी घटना समोर आली आहे. अतुल अलोणे (वय ३४) असे मृत शेतकऱ्याचे नाव असून, या घटनेने संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



यंदाच्या खरीप हंगामात झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. विशेषतः सोयाबीन हे प्रमुख पीक पूर्णतः उद्ध्वस्त झाले असून कपाशीच्या उत्पादनातही मोठी घट झाली आहे. या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांमध्ये अतुल अलोणे यांचाही समावेश होता. पीक हातचे गेल्याने उत्पन्नाचा मार्ग बंद झाला, तर दुसरीकडे बँक व खासगी सावकारांचे कर्ज फेडण्याचा ताण वाढत गेला. परिणामी ते गेल्या काही दिवसांपासून तीव्र मानसिक तणावाखाली होते.

या विवंचनेतूनच त्यांनी आपल्या राहत्या घरी कीटकनाशक प्राशन करून आत्महत्या केली. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने उपचारासाठी हलवण्याचा प्रयत्न केला; मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी दाखल होऊन पंचनामा केला असून आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.


या घटनेमुळे शेतकरी वर्गातील संकट पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे होणारे पीकनुकसान, अपुरी भरपाई आणि कर्जबाजारीपणातून शेतकरी बाहेर पडू शकत नसल्याची वास्तवस्थिती या घटनेतून स्पष्ट होते. अतुल अलोणे यांच्या पश्चात कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून शासनाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीची मदत, कर्ज सवलत व मानसिक आधार देण्याची गरज असल्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## वर्ध्यात हाय सिक्युरिटी नंबर प्लेटला अल्प प्रतिसाद; केवळ ४७ टक्के वाहने पूर्ण

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात २०१९ पूर्वी नोंदणीकृत वाहनांसाठी हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक करून जवळपास एक वर्षाचा कालावधी लोटला असला, तरी अद्यापही अपेक्षित प्रतिसाद मिळालेला नाही. जिल्ह्यातील एकूण २ लाख ८७ हजार ९९० वाहनांपैकी केवळ १ लाख ३५ हजार ८९९ वाहनांवरच आजपर्यंत हाय सिक्युरिटी नंबर प्लेट बसविण्यात आली आहे. त्यामुळे केवळ ४७ टक्के वाहनधारकांनी नियमाचे पालन केले असून तब्बल ५३ टक्के वाहनधारक अजूनही नियमांकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे.

वाहन सुरक्षेला बळकटी देण्यासाठी तसेच बनावट नंबर प्लेटला आळा घालण्यासाठी परिवहन विभागाने २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याचा निर्णय घेतला होता. त्यासाठी ऑनलाईन बुकिंगची सुविधा, अधिकृत एजन्सीद्वारे नंबर प्लेट बसविण्याची व्यवस्था आणि मुदतवाढ देऊन वाहनधारकांना पुरेसा वेळ देण्यात आला. मात्र, माहितीचा अभाव, उदासीनता आणि शेवटच्या क्षणीच काम उरकण्याची प्रवृत्ती यामुळे मोठ्या प्रमाणावर वाहनधारकांनी अजूनही हाय सिक्युरिटी नंबर प्लेट लावलेली नाही. परिवहन विभागाकडून वेळोवेळी जनजागृती करण्यात येत असली, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणीचा वेग मात्र समाधानकारक नाही. नियमांचे पालन न करणाऱ्या वाहनधारकांवर येत्या काळात दंडात्मक कारवाई, कागदपत्रांमध्ये अडचणी तसेच तपासणीदरम्यान कठोर कारवाई होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

## गुडबाय २०२५, हॅलो २०२६



पूर्वीसारखा वर्ष २०२५ अनेक आव्हानांनी भरलेले होते. मात्र नागरिकांनी एकमताने आणि उत्साहाने हे वर्ष निरोप घेतले आणि नवीन वर्षात आशा व उत्साहाचे स्वागत केले. जुने दुःख विसरून नवीन वर्षात नवीन यश गाठूया, अशी भावना शहरवासीयांनी व्यक्त केली. फोटो : राहुल तेलरांधे,

### हेडाऊ वडतकर स्मृतिगंध संगीत समारोह

## शुक्रवारी खुशबू कठाणे यांचे गायन व पांचाळ यांचे मृदंग वादन

**वर्धा जनमाध्यम :** स्व. मनोहरराव हेडाऊ आणि प्रा. सुधाकरराव वडतकर स्मृतिप्रीत्यर्थ शुक्रवार, दि. २ रोजी स्थानिक सत्यनारायण बजाज सार्वजनिक जिल्हा ग्रंथालयाच्या सभागृहात सायंकाळी ७ वाजता संगीत समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्मृतिगंध समारोहाच्या पहिल्या सत्रात प्रतिथयश गायिका खुशबू कठाणे ह्यांचे गायन होणार असून त्यांना आकाश जवादे (तबला) व नरेंद्र माहुलकर (संवादिनी) संगीतसाथ करतील. तसेच द्वितीय सत्रात आळंदी येथील तुकाराम पांचाळ मृदंग वादन करणार असून त्यांना रवी खाडे संवादिनीवर लहरा संगत करतील.

या कार्यक्रमाला संगीतप्रेमींनी उपस्थित रहावे, असे आवाहन अजय हेडाऊ, हरीश वडतकर व मित्रपरिवाराने केले आहे.


### नावात बदल

माझे पूर्वी MADHURI DWARKADAS NOTWANI असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील SONAM RAJKUMAR GODHWANI हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- दयाल नगर वर्धा ४४२००१

### नावात बदल

माझे पूर्वी MONICA SANJAY SARAF असे नाव होते. आता माझ्या आधार कार्ड व पॅन आधार कार्ड वरील MONIKA SANJAY SARAF हे नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

पत्ता :- लहानुजी नगर वर्धा ४४२००१

### जाहीर सूचना

माझे पती गोपाळराव गोविंदराव मोरे याचे दिनांक १० एप्रिल २०२५ रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या मालकीचे टायटन (ग्रे) चारचाकी वाहन क्रं. MH 32AS6919 चेचीस नंबर MALFB81BLPM 479151 इंजिन नंबर G4LAPM579845 हा आहेत. (नाते पत्नी ) माझे नाव मंदा गोपाळराव मोरे (वय 76) कमला नेहरू शाळेजवळ रामनगर वर्धा, हे असून, ते वाहन माझ्या नावाने हस्तांतरण करण्यासाठी माझा कुटुंबातील सदस्यांनी ना-हरकत परवानगी दिली आहे. वाहन हस्तांतरण करण्यासाठी कुणाचा आक्षेप असल्यास दहा दिवसांच्या आत उपप्रादेशिक परिवहन कार्यालय वर्धा येथे आक्षेप नोंदवावा.

**आपली नम्र**
**श्रीमती मंदा गोपाळराव मोरे**
**कमला नेहरू शाळा जवळ रामनगर वर्धा**
**मो.:९८५०२३५५९०**

**महाराष्ट्र शासन**
**विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर**
**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वर्धा यांचे कार्यालय**
**पत्ता- यशवंत महाविद्यालय समोर, सेवाग्राम रोड,वर्धा - ४४२००१**

**ई-मेल पत्ता :- eemidwrd@gmail.com** **दुरध्वनी क्र. :- ०७१५२-२९५०१०**

**ई-निविदा सुचना क्र. ०८/२०२५-२६**

**Main Portal : https://mahatenders.gov.in**

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वर्धा जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम कंत्राटदाराकडुन खालील कामासाठी ब-१ नमुन्यातील ई-निविदा प्रणालीव्दारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहे. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ ऑनलाईन **https://mahatenders.gov.in** येथुन डाऊनलोड करण्यात यावीत. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, वर्धा यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ. क्र. | कामाचे नांव | निविदेची अंदाजित किंमत | बयाना रक्कम | को-या निविदेची रक्कम | पात्रता | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शिरुड ल.पा.प्रकल्पाच्या उजव्या मुख्य कालव्यावरील कि.मी. ० ते कि.मी.४.८८,डाव्या पुच्छ कालव्यावरील कि.मी. ० ते कि.मी. ३.०३ व वणी लघु कालवा कि.मी. कि.मी. ० ते कि.मी. १.४१ मधील अतिरिक्त बांधकामे. | रु. २०६.१३ लक्ष | रु.१.५० लक्ष | रु.२०००/- जीएसटी १८% रु.३६०/- = रु.२३६०/- | सर्वासाठी खुली जे कामासाठी पात्र ठरतात | १२ महिने पावसाळा धरुन |

| | |
|---|---|
| अ) ई-निविदा उपलब्ध कालावधी<br>ब) ई-निविदा सादर करण्याचा अंतिम कालावधी<br>क) निविदा पुर्व बैठक | दि. ०१.०१.२०२६ वेळ १०.०० वाजता ते दि.०८.०१.२०२६ वेळ १७.४५ पर्यत<br>दि.०८.०१.२०२६ वेळ १७.४५ पर्यत<br>निविदापूर्व बैठक होणार नाही, परंतु कंत्राटदारास निविदेमध्ये काही आक्षेप असल्यास किंवा काही स्पष्टीकरण /खुलासा आवश्यक असल्यास, कंत्राटदार निविदा भरण्याच्या शेवटच्या तारखेपासून ७ दिवसांपूर्वी ऑनलाईन पोर्टलव्दारे स्पष्टीकरण मागवू शकतात. या आक्षेपांच्या उत्तरार्थ, वेब पोर्टलवर Common set of deviation (CSD) जारी केले जाईल. आणि निविदाचा भाग म्हणून त्याचा विचार केला जाईल. महामंडळाकडून निविदा सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत कोणताही प्रतिसाद प्राप्त झाला नाही तर निविदा अटीमध्ये कोणतेही बदल केले गेले नाहीत असे समजावे, या अंतिम तारखे नंतर कोणत्याही प्रकारचे प्रश्न विचारात घेतले जाणार नाही. |
| ड) सिक क्लेरीफीकेशन ऑप्शन | दि. ०१.०१.२०२६ ते दि.०७.०१.२०२६ |
| क) निविदा उघडणे | दि.१२.०१.२०२६ (वेळ १२.०० वाजता) |

(सदर निविदे सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास फक्त वरील वेबसाईट वरती कळविण्यात येईल )

१) आंतरराष्ट्रीय कंत्राटदार यांची उपकंपनी भारतीय असल्यास निविदेत भाग घेऊ शकतील.
२) कार्यकारी अभियंता कार्यालयातून ई-निविदा कोरी प्रपत्रे विकली जाणार नाहीत.
३) सविस्तर ई-निविदा सुचना महाराष्ट्र शासनाच्या Electronic Tender management http://mahatenders.gov.in वर तसेच कार्यकारी अभियंता कार्यालयातील नोटीसबोर्डवर पहावयास मिळेल.
४) या कामाचे अंदाजपत्रक, दर, विश्लेषण, मोजमापे नकाशे इ.कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग वर्धा जि.वर्धा जि.वर्धा यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे.निविदाकार प्रत्यक्ष कार्यक्षेत्र परिस्थितीनुसार दर भरण्यास जबाबदार राहतील आणि या करिता कोणताही प्रकारचे दावे (Claims) निविदाकारास देय राहणार नाही.

**जा.क्र./३५८५/निली/लपावि/ २०२५ दिनांक २९.१२.२०२५**

**सही/-**
**(अ.प्र. कापसे )**
कार्यकारी अभियंता
लघु पाटबंधारे विभाग
वर्धा

# सदानंद दाते नवे पोलिस महासंचालक

## 3 जानेवारीला स्वीकारणार पदभार

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय पोलीस सेवेतील अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्र पोलीस महासंचालक (DGP) म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी नवीन पोलिस महासंचालक कोण असेल याची चर्चा गेल्या महिन्यापासून सुरू होती. राज्याच्या गृह विभागाने त्यासाठी सात ज्येष्ठ आयपीएस अधिका-यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती. राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) प्रमुख सदानंद दाते यांचे नाव यात प्रामुख्याने चर्चेत होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने सातपैकी तीन नावांची निवड करून ती राज्य सरकारकडे पाठवली होती. त्यातून सदानंत दाते यांच्या नियुक्तीवर आज शिक्कामोर्तब करण्यात आले. एका अधिकृत निवेदनात महाराष्ट्र सरकारने म्हटले आहे की, महाराष्ट्र राज्याच्या पोलीस महासंचालक (डीजीपी) भारतीय पोलीस सेवा रश्मी शुक्ला यांचा 'महाराष्ट्र राज्याचे पोलीस महासंचालक' म्हणून कार्यकाळ ३ जानेवारीला २०२६




रोजी संपत आहे. त्यानंतर सदानंद दाते पदभार स्वीकारतील. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या पॅनेलमेंट समितीने शिफारस केलेल्या पॅनेलमध्ये समाविष्ट असलेले सदानंद वसंत दाते, भारतीय पोलिस सेवा यांची 'महाराष्ट्र राज्याचे पोलिस महासंचालक (एचओपीएफ)' या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. निवेदनात म्हटले आहे की, सर्वोच्च न्यायालयाच्या संबंधित निकाल आणि आदेशांनुसार, 'पोलीस महासंचालक (HOPF)' या पदावर नियुक्त झालेल्या भारतीय पोलीस सेवेच्या अधिका-याचा कार्यकाळ दोन वर्षांचा असेल. त्यानुसार, भारतीय पोलीस सेवेचे सदानंद वसंत दाते हे नियुक्तीच्या तारखेपासून दोन वर्षांच्या कालावधीसाठी 'पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (HOPF)' या पदावर राहतील. सदानंद दाते १ एप्रिल २०२४ पासून राष्ट्रीय तपास संस्थेचे (NIA) महासंचालक (डीजी) होते. यापूर्वी त्यांनी सीबीआयमध्ये उपमहानिरीक्षक (डीआयजी), महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाचे (एटीएस) प्रमुख, मुंबईतील सह पोलिस आयुक्त(गुन्हे आणि कायदा आणि सुव्यवस्था) आणि मीरा-भाईंदर आणि वसई-विरार प्रदेशांचे पोलिस आयुक्तम्हणून काम पाहिले आहे. दाते यांनी वाणिज्य विषयात पदव्युत्तर पदवी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून डाक्टरेट (पीएच.डी.), इन्स्टिट्यूट ऑफ कास्ट अकाउंट्स ऑफ इंडियामधून पात्र कास्ट अँड मॅनेजमेंट अकाउंट आणि हम्फ्रे फेलोशिप अंतर्गत मिनेसोटा विद्यापीठात व्हाईट-कालर आणि संघटित गुन्हेगारी नियंत्रणाचा अभ्यास केला आहे.

## १५ जानेवारीला शासकीय सुटी; शाळा राहणार बंद

**मुंबई :** राज्यातील नोकरदार वर्गासाठी मोठी बातमी. १५ जानेवारी रोजी मुंबई, ठाण्यासह २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी राज्य सरकारने भरपगारी सुटी जाहीर केली आहे. खासगी कंपन्या,




आयटी पार्क्स आणि मालमधील कर्मचा-यांनाही हा नियम लागू असेल. मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सुटी न देणा-या आस्थापनांवर कडक कारवाईचा इशारा उद्योग आणि कामगार विभागाने दिला आहे. मुंबई, पुण्यासह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. १५ जानेवारी रोजी २९ महापालिकांसाठी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे. ज्या ठिकाणी मतदान होणार आहे, त्या ठिकाणी राज्यात भरपगारी सुटी जाहीर करण्यात आली आहे. त्याशिवाय ज्या ठिकाणी मतदान आहे, त्या ठिकाणी शाळांनाही सुटी जाहीर करण्यात येणार आहे.

## करूणा मुंडेंची याचिका कोर्टाने फेटाळली

# धनंजय मुंडे यांना दिलासा!

**बीड /प्रतिनिधी-** माजी मंत्री धनंजय मुंडे यांना न्यायालयाकडून दिलासा मिळाला. विधानसभा निवडणूक २०२४ मधील त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या शपथपत्रामध्ये उल्लेख केलेल्या माहितीवर आक्षेप घेण्यात आला होता. लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी परळी वैद्यनाथ यांच्या न्यायालयात करुणा शर्मा-मुंडे यांनी फौजदारी कारवाई करण्याबाबत फिर्याद प्रकरण दाखल केले होते. याबाबत आज परळी न्यायालयाने निकाल दिला असून या प्रकरणातील सर्व आरोप तथ्यहीन असल्याचे सांगत फेटाळून लावले. धनंजय मुंडे यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद माहितीवरून करुणा मुंडे यांनी वेगवेगळे आरोप करत शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत लोकप्रतिनिधी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी परळीच्या प्रथमवर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली. करुणा मुंडे यांनी नोंदवलेला जबाब, वकिलांचा युक्तिवाद यांसह वस्तुस्थिती लक्षात घेत न्यायालयाने करुणा मुंडे यांनी दाखल केलेली फिर्याद फेटाळून लावली आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या बाजूने न्यायालयाने आणखी एक निकाल दिला आहे. याआधी देखील कृषी विभागाच्या खरेदीवरून निरनिराळे आरोप करत धनंजय मुंडे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये देखील कोणतेही तथ्य आढळले नाही आणि ते प्रकरण देखील मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावत तक्रारदाराला उलट दंड लावला होता.



# 'लाडकी' चा निधी सरकारी कर्मचा-यांच्या खात्यात

## माहिती अधिकारामधून मोठा गैरप्रकार उघड

**मुंबई/प्रतिनिधी :** -राज्यातील महिलांसाठी सुरू करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनेत मोठा गैरप्रकार झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. माहिती अधिकारांतर्गत मिळालेल्या माहितीनुसार, या योजनेचा लाभ घेण्यास अपात्र असलेल्या हजारो सरकारी कर्मचा-यांनी थेट शासकीय निधीचा फायदा घेतल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणामुळे प्रशासनात खळबळ उडाली असून सरकारने संबंधितांवर कारवाईचे आदेश दिले आहेत.विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने लाडकी बहीण योजना सुरू केली होती. या योजनेअंतर्गत पात्र महिलांच्या खात्यावर दरमहा १,५०० रुपये जमा केले जातात. या योजनेला मोठा प्रतिसाद मिळाला आणि अनेक महिलांना याचा थेट आर्थिक आधार मिळाला. मात्र याच काळात नियमांचे उल्लंघन करत मोठ्या प्रमाणावर अपात्र अर्ज मंजूर झाल्याचा प्रकार आता समोर आला आहे.यापूर्वी सरकारकडून सुमारे २,४०० सरकारी कर्मचा-यांनी चुकीच्या पद्धतीने लाभ घेतल्याचे सांगण्यात आले होते. मात्र आलेल्या ताज्या आकडेवारीनुसार हा




आकडा पाच पटीहून अधिक असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे योजनेतील तपासणी आणि अर्ज मंजुरी प्रक्रियेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

**१२,९०० पेक्षा अधिकांनी घेतला लाभ-** आरटीआयमधून मिळालेल्या माहितीनुसार, किमान १२,९०० पेक्षा अधिक सरकारी कर्मचा-यांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला आहे. नियमांनुसार नियमित वेतन घेणारे सरकारी कर्मचारी या योजनेसाठी अपात्र आहेत. असे असतानाही संबंधित कर्मचा-यांच्या खात्यावर दरमहा १,५०० रुपये जमा करण्यात आले. महिला व बालविकास विभागाने दिलेल्या अधिकृत उत्तरात १२,९१५ सरकारी कर्मचा-यांना या योजनेअंतर्गत पैसे देण्यात आल्याचे मान्य करण्यात आले आहे.

**महिला व बालविकास विभागाने दिले कारवाईचे आदेश-** महिला व बालविकास विभागाने आपल्या उत्तरात संबंधित सरकारी कर्मचा-यांविरोधात त्यांच्या विभागांना कारवाईचे आदेश दिल्याचे नमूद केले आहे. दरम्यान, सरकारकडून सध्या लाडकी बहीण योजनेतील अर्जांची पुन्हा एकदा छाननी सुरू आहे. निकषात न बसणा-या लाभार्थ्यांचे अर्ज रद्द केले जात असून पुढील काळात चुकीच्या पद्धतीने लाभ घेतलेल्या व्यक्तींवर कठोर कारवाई केली जाणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत

# निष्ठावंतांना डावलल्याने भाजपमध्ये राडा

## विजय वडेट्टीवारांचा दावा; काँग्रेसमध्येही तक्रारी येत असल्याची कबुली

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपने निष्ठावंतांना डावलून उप-या लोकांना तिकिट दिल्यामुळे इच्छुक उमेदवारांच्या संयमाचा उद्रेक झाल्याची भावना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी व्यक्तकेली आहे. भाजपचे सध्याचे धोरण वापरा व फेकून द्या असे आहे. त्यामुळे संभाजीनगरात इच्छुक उमेदवार नाराज झाले असून भाजपमध्ये राडा तर होणारच अशी प्रतिक्रिया वडेट्टीवार यांनी दिली. महायुती तुटल्यानंतर छत्रपती संभाजीनगरात भाजपमध्ये उमेदवारी वाटपावरून सुरू झालेला गृहकलह आता जवळपास नियंत्रणाबाहेर गेला आहे. मंगळवारी रात्री भाजपच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयापुढे संतप्त कार्यकर्त्यांनी अभूतपूर्व गोंधळ घातला. त्यानंतर बुधवारी सकाळी पुन्हा कार्यकर्त्यांनी माजी केंद्रीय मंत्री डाक्टर भागवत कराड यांची गाडी रोखून धरली. तसेच राज्याचे कॅबिनेट मंत्री अतुल सावे यांच्या गाडीला काळे फासून आपला निषेध नोंदवला. यावेळी प्रशांत भदाने नामक इच्छुक उमेदवाराने आपल्या अंगावर राकेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केल्याने एकच खळबळ उडाली. यावेळी सावे व कराड यांनी पोलिस संरक्षणात तेथून काढता पाय घेतला.

या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी भाजपच्या अंतर्गत कलहावर भाष्य केले आहे. ते म्हणाले, भाजमध्ये राडा तर होणारच आहे. कारण, सर्वच पक्षांमध्ये, आमच्याही पक्षामध्ये काही ठिकाणी उपरे लोक घेतल्याच्या तक्रारी येत आहेत. भाजपमध्ये हे प्रमाण सर्वांत जास्त आहे. भाजपमध्ये बाहेरून आलेल्यांना उमेदवारी देण्यात आल्याची ओरड होत आहे. निष्ठावंतांना डावलण्यात आल्याची चर्चा जोरात आहे. त्यातून हा उद्रेक झाला आहे. खरे तर भाजपचे धोरण वापरा आणि फेकून द्या असे आहे. त्यामुळे संभाजीनगरात जो आक्रोश दिसत आहे, तो बाहेरून आलेल्या लोकांना उमेदवारी



दिल्यामुळे होत आहे. पूर्वी काँग्रेसची जी स्थिती होती ती स्थिती आता भाजपची झाली आहे.

ते पुढे म्हणाले, संभाजीनगरमध्ये भाजप-शिवसेनेची युती होण्याचे शेवटपर्यंत संकेत होते. पण काल त्यांनी वेगवेगळे लढण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे त्यांना कार्यकर्त्यांना जागा देण्याचा स्कोप होता. परंतु त्यांनी तसे केले नाही. सध्या जे वातावरण तयार झाले तो त्या पक्षाचा अंतर्गत विषय आहे. मला त्यावर अधिक भाष्य करणे चुकीचे वाटते. पण एक गोष्ट नक्की आहे की, काँग्रेस वैचारिक दृष्टिकोनातून लढत आहे, तर भाजप हा सत्ता मिळवण्यासाठी निष्ठा बाजूला ठेवून निवडणूक लढवत आहे व त्या दृष्टिकोनातूनच त्यांनी तिकिट वाटप केले हे स्पष्ट होते, असे वडेट्टीवार म्हणाले.

भाजपचे इच्छुक उमेदवार प्रशांत भदाने आपल्या पक्षावर संताप व्यक्त करताना म्हणाले की, मी सर्वेक्षणात आघाडीवर होतो. रात्रंदिवस पक्षासाठी झटलो, पण साहेबांनी त्यांच्या पीएला तिकिट देउन माझा घात केला. मला अंधारात ठेवले गेले. आता मला काही झाले तर त्याला नेतृत्व जबाबदार असेल.

# एसटी बसस्थानक आता चकाचक होणार!

## ■ दर 15 दिवसांनी स्वच्छता मोहीम अनिवार्य ■ राज्यभर स्वच्छतेचा नवा फॉर्म्युला

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्य परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांवरील अस्वच्छतेचा प्रश्न आता गंभीर झाला असून, खुद्द परिवहन विभागानेच आता कंबर कसली आहे. सोलापूर बसस्थानकातील भीषण अस्वच्छता पाहून संतापलेल्या परिवहन मंत्र्यांनी आगार प्रमुखाचे थेट निलंबन केले होते. या कारवाईनंतर आता राज्यभरातील सर्व बसस्थानकांवर दर १५ दिवसांनी ' स्वच्छता मोहीम राबविण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. काही दिवसांपूर्वी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सोलापूर बसस्थानकाची पाहणी केली होती. त्यावेळी स्थानकातील अस्वच्छता पाहून त्यांनी संताप व्यक्त केला होता आणि तात्काळ सुधारणा करण्याच्या सूचना दिल्या होत्या. बस आगार हे अस्वच्छतेचे आगार बनले आहे, असे खडेबोल त्यांनी सुनावले होते. मात्र, आठवडा उलटल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल न झाल्याचे पाहून सरनाईक यांनी थेट कारवाई केली. त्यांनी कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत आगार प्रमुखाला जागेवरच निलंबित करण्याचे आदेश दिले.

**दर १५ दिवसांनी 'स्वच्छता मोहीम' सक्तीची-** त्यानंतर प्रवाशांना दर्जेदार सुविधा देण्यासाठी महामंडळाने आता नवीन नियमावली जाहीर केली आहे. यानुसार बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच आणि विशेषतः महिला विश्रांतीगृहे व शौचालयांची १५ दिवसातून एकदा पूर्णपणे स्वच्छता करावी लागेल. यासंदर्भात निवेदन जारी करण्यात आलं आहे. 'महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती. काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे.



साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे,' असं या निवेदनात म्हटलं आहे.'कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कच-याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचा-यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर १५ दिवसांनी होणा-या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे,' असंही निवेदनातून सांगण्यात आलं आहे. नव्या स्वच्छता मोहिमेमुळे प्रवाशांकडून समाधान व्यक्त केले जात आहे. आता ही मोहीम केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात बसस्थानकांचे रूप पालटणार का? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महायुतीकडून ऊमेदवारीसह कोटींचे पॅकेज-राऊत

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी मंगळवारी (३० डिसेंबर) शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत. मात्र महायुतीमधील घटक पक्ष असलेल्या भाजपा आणि शिवसेना यांच्यात अनेक ठिकाणी युती झाली नसल्याचे चित्र आहे. तर दुसरीकडे उमेदवारी न मिळाल्याने इच्छुकांनी दुस-या पक्षात प्रवेश केला आहे. त्यामुळे आता शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी महायुतीकडून उमेदवारीसह ५ ते १० कोटींचे पॅकेज दिल्याचा दावा केला आहे. तसेच मराठी माणूस यावेळी बंडखोरी प्रवृत्तींना पाठीशी घालणार नाही, असा इशारा देखील त्यांनी दिला आहे.

तुमच्या पक्षाने किंवा शिवसेना शिंदे गटाने जागावाटप जाहीर केलेले नाही, यामागे नेमके काय कारण आहे. असा प्रश्न विचारला असता संजय राउत म्हणाले की, गेली अनेक वर्षे अशा याद्या शिवसेनेतर्फे जाहीर केल्या जात नाहीत, हे आपण पाहिले आहे. शिवसेनाप्रमुखांपासून ही प्रथा सुरू आहे. ज्यांना आम्हाला उमेदवारी द्यायची असते, त्यांना एबी फार्म दिला जातो. त्यामुळे अर्जांची छाननी झाल्यावर तुम्हाला उद्या कळेलच कोणाला उमेदवारी दिली आहे. कारण उमेदवारी कोणाला दिली, हे काही लपून राहत नाही. याद्या जाहीर करायच्या, मग त्या यादीतून गोंधळ हे प्रकार बहुतेक सर्व पक्षांनी थांबवले आहेत. उमेदवारांचे अर्ज वैध ठरल्यावर जी यादी येते, ती फायनल असते. काल संध्याकाळपर्यंत शिवसेना ठाकरे गटाने ज्यांना एबी फार्म दिले आहेत, त्या सगळ्यांनी वाजतगाजत आपले अर्ज भरले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उमेदवारांनी सुद्धा उत्साहात अर्ज भरले आहेत. काही ठिकाणी शिवसेना ठाकरे गट आणि मनसेच्या उमेदवारांनी एकत्र जाउन अर्ज भरले आहेत. बाकी इतर पक्षांत काय गोंधळ चालला आहे, हे आपण पाहिले असेल, असे म्हणत राउत यांनी महायुतीवर निशाणा साधला.



संजय राउत यांनी दावा केला की, महायुती १४ महापालिकांमध्ये तुटलेली आहे. अनेक शहरांमध्ये महायुतीचे लोक एकमेकांच्या छाताडावर बसले आहेत. शिस्तबद्ध वगैरे भाजप पक्ष तिकिट कापतो. नाशिक, छत्रपती संभाजीनगर आणि ठाण्यात काय गोंधळ झाला. महिलांनी आणि मुलींनी काय गोंधळ केला, हे चित्र पाहण्यासारखे होते. बाहेरून आलेल्या उमेदवारांना आणि गुंडांना उमेदवारी देण्याचे काम अजित पवारांपासून सर्वच पक्षांनी केले. ही लोकशाही आहे, त्यांच्या पक्षाची अशी टीकाही संजय राउत यांनी केली. भाजपा म्हणतेय की आमच्याकडे उमेदवारांची रीघ लागली आहे. या प्रश्नावर संजय राउत म्हणाले की, बरोबर त्यांच्याकडे गुंडांची रीघ लागली आहे. काल गजा मारणेच्या बायकोला देखील अर्ज दिला आहे. तसेच रीघ लागली आहे ती पैसे घेण्यासाठी, उमेदवारी अर्जाबरोबर जे ५ कोटी रुपये दिले जात आहेत, त्या ५ कोटींसाठी ही रीघ आहे. तसेच शिवसेना शिंदे गटाकडे उमेदवारीसोबत १० कोटी रुपये दिले जात आहेत, असा दावा राउत यांनी केला.

# भाजपा उप-यांचा पक्ष बनलाय; आता रेशिमबाग नाही तर अदानी-अंबानी भाजपा चालवणार- सपकाळ यांची टीका

**बुलडाणा/प्रतिनिधी -** महानगरपालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी भाजपामध्ये उमेदवारीवरून मोठा गोंधळ झाल्याचं चित्र राज्यभरात दिसून आलं. तसेच अनेक ठिकाणी भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आपल्या नेत्यांविरोधात तीव्र रोष व्यक्त केला. त्यावरून आता काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपाला टोला लगावला आहे. भाजपा उप-यांचा पक्ष बनलाय; आता रेशिमबाग नाही तर अदानी-अंबानी भाजपा चालवणार, अशी टीका सपकाळ यांनी केली. बुलढाण्यात प्रसारमाध्यमांशी बोलताना काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपावर ही टीका केली. ते म्हणाले की, नगरसेवकपदासाठी भाजपामध्ये प्रचंड गोंधळ माजल्याचे चित्र दिसत आहे आणि हेच चित्र आगामी विधानसभा निवडणुकतही दिसेल. मुळ भाजपा व संघाच्या कार्यकर्त्यांना बाजूला सारून उप-यांच्या हाती भारतीय जनता पक्ष गेल्याने लवकरच या पक्षाचे नियंत्रण हे नागपूरच्या रेशिमबागेतून नाही तर अदानी अंबानी यांच्याकडून होईल, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षात अराजकाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पक्षासाठी काम करणा-या कार्यकर्त्यांना बाजूला सारून दुस-या पक्षातील आयत्यावेळी आलेल्यांना भाजपाने उमेदवारी दिल्याने निष्ठावान कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप आहे. भाजपामध्ये ही नाराजी राज्यभर सर्वदूर दिसत असून काँग्रेसमुक्त भारत करण्याची वल्गना करणारा भाजपा कार्यकर्तामुक्त भाजपा झाला आहे,



असा घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे.अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबद्दल बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, गुंडांचाच पक्ष आहे तो, याआधी त्यांनी माफियांना प्रवेश देण्यात आला, मराठवाड्यात एका वरळी किंगला पक्षात प्रवेश दिला. कोयता गँगशी संबंधित लोक त्यांच्या पक्षात आहेत. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सातारा जिल्ह्यातील भावाच्या शेतातील ड्रग्ज कंपनीचा वितरक हा अजित पवार यांच्या पक्षाचा कार्यकर्ता असल्याचे दिसून आले असे सपकाळ म्हणाले.

२०२६ हे वर्ष काँग्रेससाठी संघटनात्मक वर्ष आहे आणि त्याची तयारी डिसेंबर महिन्यापासूनच झाली आहे. काँग्रेसचे हौसले बुलंद आहेत, पक्षप्रवेश मोठ्या प्रमाणात होत आहेत. वैचारिक कटीबद्धता आहे आणि वैचारिक मेळ व मूठ बांधण्याचे काम नवीन वर्षात करणार आहे असे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी सांगितले.

# चालत्या कारमध्ये दोन तास लैंगिक अत्याचार

## तरुणीला मारहाण; मध्यरात्री रस्त्यावर फेकून दिले

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दिल्लीतून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. शहरालगत असलेल्या फरिदाबादमध्ये एका तरुणीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. तरुणीला आधी कारमध्ये लिफ्ट दिली. त्यानंतर, तिला घेउन फरिदाबाद-गुरुग्राम रस्त्यावर दोन तास प्रवास केला. यादरम्यान, तिच्यावर सामूहिक बलात्कार करण्यात आला. तिने विरोध केला तेव्हा तिला मारहाणही करण्यात आली. नंतर मध्यरात्री चालत्या गाडीतून बाहेर फेकण्यात आले. त्या तरुणीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. रुग्णालयात तिच्या डोक्याला १२ टाके पडले. पीडितेच्या बहिणीने पोलिसांकडे तक्रार दाखल केली. त्यानंतर, पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या मदतीने दोघांना अटक केली. दोन्ही आरोपी मध्य प्रदेशातील असून सध्या फरिदाबादमध्ये राहत असल्याचे सांगितले जात आहे.

### तिने कारला लिफ्ट मागितली

मिळालेल्या माहितीनुसार, पीडितेचे तिच्या आईशी भांडण झाले होते. त्यानंतर, ती तिच्या बहिणीला फोन करून तिच्या मैत्रिणीच्या घरी गेली. तिने सांगितले होते की ती तिच्या मैत्रिणीच्या घरी जात आहे आणि सुमारे तीन तासांत परत येईल. पीडिता रात्री १२:३० च्या सुमारास घरी परतण्यासाठी तिच्या मैत्रिणीच्या घरातून निघाली. तेव्हा ती मेट्रो चौकात पोहोचली तेव्हा ती ऑटोरिक्षा मागत होती. एक कार आली, यामध्ये दोन पुरुष होते, त्यांनी तिला लिफ्ट दिली.

यानंतर, त्यांनी फरिदाबादहून गुरुग्रामला गाडी चालवली. त्यांनी फरिदाबाद-गुरुग्राम रस्त्यावर सुमारे दोन तास गाडी चालवली. यादरम्यान एका पुरूषाने गाडी चालवली तर दुस-याने तरुणीवर अत्याचार केले. तिने विरोध केला तेव्हा तिला मारहाण करण्यात आली. त्यानंतर त्यांनी मुलीला रस्त्यावर फेकून दिले आणि पळून गेले. त्यानंतर पीडितेने तिच्या बहिणीला तिच्यावर झालेल्या अत्याचाराबद्दल सांगितले. त्यानंतर तिला सिव्हिल हास्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. तेथून तिला एम्समध्ये रेफर करण्यात आले. सध्या तिच्यावर फरीदाबादमधील एका खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



# 'ऑपरेशन सिंदूर'नंतर पहिल्यांदा पाकिस्तानी नेत्याला भेटले भारताचे परराष्ट्र मंत्री

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** बांगलादेशाच्या माजी पंतप्रधान खालिदा जिया यांच्यावर ढाका येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकरही हजर होते. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी खालिदा जिया यांचा मुलगा आणि बांगलादेशच्या नॅशनलिस्ट पार्टीचे कार्यकारी अध्यक्ष तारीक रहमान यांची सांत्वन भेट घेतली. या भेटीत जयशंकर यांनी खालिदा यांच्या निधनावर शोक व्यक्त केला. त्याशिवाय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून पाठवण्यात आलेले शोक पत्रही त्यांच्या हाती देण्यात आले. या कार्यक्रमात परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे तिथे उपस्थित असणा-या पाकिस्तानच्या काही नेत्यांनाही भेटले. सध्या त्यांचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. ऑपरेशन सिंदूरनंतरभारत आणि पाकिस्तान यांच्यातील नेत्यांची ही पहिलीच भेट आहे. परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी पाकिस्तानी नेते सरदार अयाज सादिक यांच्याशी हस्तांदोलन केले. ते पाकिस्तानी संसदेत नॅशनल असेंबली स्पीकर आहेत. ही एक अनौपचारिक भेट होती, ज्यात दोन्ही नेते एकमेकांना भेटले. दोघांमध्ये कुठलीही अन्य चर्चा झाली नाही. या फोटोबाबत दोन्ही देशांच्या परराष्ट्र मंत्रालयाकडून निवेदन जारी करण्यात आले नाही.

परराष्ट्र मंत्री एस जयशंकर हे ज्या पाकिस्तानी नेते सरदार अयाज यांना भेटले ते पाकिस्तानी पंतप्रधान शहबाज शरीफ यांचे निकटवर्तीय मानले जातात. अयाज यांनी बालकोट स्ट्राइकवर तेव्हाचे पाकिस्तानी परराष्ट्र मंत्री शाह महमूद यांची खिल्लीही उडवली होती. जर भारतीय पायलट अभिनंदनची सुटका केली नसती तर भारताने पाकिस्तानवर हल्ला केला असता असं महमूद म्हणाले होते.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## अरवलीचा टाहो

गौण (आणि अर्थातच मौल्यवान) खनिजामागे साऱ्या जगाची अर्थव्यवस्था धावू लागली आहे. उद्याच्या अर्थव्यवस्थेचा तोच कणा असेल, असे अर्थतज्ज्ञ जोरजोरात सांगत आहेत. विविध खनिजद्रव्य, त्यातून मिळणारे धातू आणि बांधकामांसाठी लागणाऱ्या साहित्यासाठी भारतात सर्वत्र डोंगर आणि टेकड्यांचे वेगात खोदकाम सुरू आहे. त्याच्या पर्यावरणीय परिणामाची चर्चा सुरू असतानाच राजस्थानात अरवली पर्वताच्या खोदकामाविरोधात मोठा असंतोष संघटित झाला आहे. या असंतोषाने रौद्ररूप घेण्याआधी त्याचे गांभीर्य सर्वोच्च न्यायालयाच्या लक्षात आले आणि त्यांनी साधारण महिन्यापूर्वी दिलेल्या आपल्याच आदेशाला सोमवारी स्थगिती दिली. अरवली पर्वताची व्याख्या आणखी विचारपूर्वक करण्याची गरज असून या विचारमंथनतज्ज्ञ आणि पर्यावरणवाद्यांनाही सामील करून घेतले पाहिजे, असे सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या नेतृत्वाखालील न्यायमूर्ती जे. के. महेश्वरी आणि न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसिह यांनी स्पष्ट केले. केंद्र सरकारने नियुक्त केलेल्या प्रदत्त समितीचा आणि याच क्षेत्रातील सरकारी संस्थांनी दिलेला अहवाल अपुरा वाटत असल्याने या संपूर्ण प्रश्नाचंच पुनरावलोकन करण्याची गरज न्यायमूर्तींनी परवा व्यक्त केली, हा यातला महत्त्वाचा भाग आहे. खनिज संपत्ती काही दोन-चारशे वर्षांत तयार होत नाही. त्यामुळे तिचा वापर अत्यंत जबाबदारीने, काटकसरीने, भविष्यातील परिणामांचा विचार करून केला पाहिजे. नफेखोरी हाच उद्देश असलेले एवढा सम्यक विचार करण्याची शक्यता जवळपास नसते. त्यासाठी अशा सर्व संवेदनशील क्षेत्रांत नियामक यंत्रणांची योजना केली आहे. पण, नियामक यंत्रणाच हितसंबंधीयांच्या प्रभावाखाली निर्णय घेऊ लागतात, तेव्हा न्यायालयांना हस्तक्षेप करण्याची वेळ येते. अरवली प्रकरणी न्यायालयाचा आधीचा हस्तक्षेप अपुऱ्या माहितीवर आधारित असल्याने आता अधिक खोलात जाऊन दखल घेण्याची गरज न्यायालयाला भासली आहे. न्यायालयाची या प्रकरणातील कृती भविष्यात अशा प्रकरणांत अत्यंत दिशादर्शक ठरणार आहे. गुजरातमध्ये अहमदाबादजवळ सुरू होणारी अरवली पर्वतरांग राजस्थान, हरियाणा राज्यांतून ६७० किलोमीटरचे अंतर कापून दिल्लीजवळ थांबते. या रांगेचे सर्वोच्च शिखर माउंट अबू. उंचीला फार नसली तरी विस्तीर्ण पसरलेली ही पर्वतरांग देशातली सर्वात जुनी पर्वतरांग मानली जाते. तिचे वय साधारण दोन अब्ज वर्षे आहे! बांधकामांसाठी वापरले जाणारे रंगीबेरंगी, विशिष्ट धाटणीचे दगड याच पर्वतरांगांमध्ये मुख्यतः आढळतात. देशातले सिमेंटचे सर्वाधिक उत्पन्न याच पर्वतरांगांच्या जीवावर होते. त्यासाठी या पर्वतरांगांचे गेली अनेक वर्षे प्रचंड उत्खनन सुरू आहे. पर्यावरणीय घटकांचा विचार करणारा भारत हा जगातील सर्वात असंवेदनशील देश असल्यामुळे जगात ज्या उद्योगांवर निर्बंध किंवा बंदी आहे, ते येथे सुखेनैव चालतात. अशा निसर्ग संपत्तीची आपण निर्यात करतो. ती करणाऱ्यांना उत्कृष्ट निर्यातीची पारितोषिकंही दिली जातात! अरवलीच्या कुशीत जी उत्खनने सुरू आहेत किंवा जे डोंगर- टेकड्या भुईसपाट झाल्या आहेत, त्या नजीक अधिक उत्खननाला परवानगी देण्याचा प्रश्न आला आणि ती देताना या पर्वताची जी नवी व्याख्या करण्यात आली, त्यामुळे हा विषय चव्हाट्यावर आला. अरवली पर्वतरांगांमधील बहुतेक डोंगर - टेकड्या १०० मीटरपेक्षा कमी उंचीच्या आहेत, असे पर्यावरणतज्ज्ञांचे म्हणणे आहे. सरकारच्या उच्चाधिकार समितीने जिथे पर्वतरांगांची उंची १०० मीटरपेक्षा कमी (म्हणजे साधारण ३० मजल्यांपेक्षा कमी) असेल आणि जिथला उतार तीन डिग्रीपेक्षा कमी असेल तिथे उत्खननास किंवा खोदकामास हरकत नाही, अशी भूमिका पूर्वी न्यायालयासमोर मांडली होती. हा निकष मान्य केला, तर पर्वतरांगेतील ९० टक्के भागाचे संरक्षण होते, असेही न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले होते. त्यामुळे, न्यायालयाने त्याला सहमती दर्शवली. पण, काही संस्था आणि पर्यावरणवाद्यांनी या निकषाला आक्षेप घेतला, त्यातील मखलाशी फेरयाचिकेद्वारे न्यायालयासमोर मांडली, तेव्हा त्यात तथ्य वाटल्याने न्यायालयाने आता तज्ज्ञांच्या स्वतंत्र समितीची कल्पना मांडली असून पुढील सुनावणी २१ जानेवारीला ठेवली आहे. अरवली पर्वत म्हणजे काही सलग भिंत नाही. त्याचे पर्यावरणीय महत्त्व त्यापेक्षा कितीतरी मोठे आहे. सिकर आणि झुनझुनू या दोन जिल्ह्यांत या रांगेची उंची अवघी ४० ते ६० मीटर आहे. पण, थर वाळवंटाला पूर्वेकडे पसरण्यापासून या रांगांनीच रोखले आहे. उत्खनन झाल्याने अलवार आणि महेंद्रगडच्या डोंगरांची उंची आधीच कमी झाली आहे. अलवार ते भिवडी हा वन्य प्राण्यांचा पट्टा आहे. सरिस्कातून येणारे वाघ, बिबटे याच मार्गाने प्रवास करतात. हा मार्ग नवी उत्खनने आणि बांधकामांनी विस्कळीत झाला, तर आज महाराष्ट्रात जी परिस्थिती आहे, तीच तिकडे होईल. न्यायालयाने आधी मान्य केलेला १०० मीटरचा निकष अमलात आला, तर उदयपूर आणि चितोडगडचाही बराच भाग उद्ध्वस्त होईल, असे स्थानिकांचे म्हणणे आहे. त्यासाठी रस्त्यावर उतरण्याची तयारी त्यांनी चालवली आहे. संपन्न जैवविविधता, दिल्ली आणि लगतच्या परिसरासाठी असलेले जलोद्भव, धुळीची वादळे रोखण्यासाठी नैसर्गिक आडोसा हे अरवलीचे नैसर्गिक फायदे आपण गमावू, अशी भीती त्यांना वाटते. प्रदूषण नियंत्रण, नैसर्गिक जलसंधारण, स्थानिक हवामानाचे संतुलन, वन्य प्राण्यांची प्रचंड मोठी परिसंस्था यातून नष्ट होईल, असे त्या परिसरातील सगळेच पुन्हा पुन्हा सांगत आहेत. न्यायालयापर्यंत त्यांचे म्हणणे गेले आहे. केवळ भूमिती न पाहता भूरूप शास्त्रानुसार या प्रश्नाचा विचार झाला, तर निसर्गसंपन्न देशातला निसर्ग कदाचित वाचेलही!


# चीनची वाढती निर्यात आणि परिणाम

चीनचे वाढते निर्यात आधिक्य ही योगायोगाने घडलेली बाजारपेठीय घटना नसून ती धोरणात्मक नियोजन, युवा शक्तीचा प्रभावी वापर, संशोधनातील गुंतवणूक आणि जागतिक बाजारपेठेचा अचूक अभ्यास यांचा परिपाक आहे. जागतिक तणावाच्या काळातही आर्थिक आघाडीवर मिळवलेले यश अतुलनीय आहे. आज पण भारत-चीन व्यापारात चीन आघाडीवर असून १०० अब्ज डॉलरच्या फरकाने भारत मागे आहे. भारतासाठी यातून बोध म्हणजे प्रत्यक्ष परिणाम देणारे उद्योग धोरण मजबूत केले पाहिजे. त्यासोबत जपान, कोरियाप्रमाणे उत्पादनाची नावीन्यता, सुबकता आणि जागतिक तोडीचा दर्जा यावर लक्ष देणे जरुरी आहे, तरच भारताची व्यापार तूट कमी होईल.

चीनचे जागतिक व्यापार आधिक्य एक ट्रिलियन डॉलरच्या पुढे असणे म्हणजे चीनची निर्यात आयातीपेक्षा जवळपास एक लाख कोटी डॉलरने जास्त होणे. जगातील दुसरी मोठी अर्थव्यवस्था असलेल्या चीनचे त्यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेतील स्थान अधिक मजबूत झालेले आहे. या वर्षी प्रथमच चीनची निर्यात २०२५ वर्षाअखेर जवळपास १.२५ ट्रिलियन डॉलरने वाढलेली असेल हे त्यांच्या जागतिक आर्थिक सामर्थ्याचे प्रतीक आहे. चीनचा हा वाढलेला प्रभाव जागतिक व्यापारामध्ये असमतोल दर्शवतो आणि त्याचा भारताच्या अर्थव्यवस्थेवर मोठा परिणाम होऊ शकतो. मुख्यतः जागतिक बाजारपेठेतील चिनी उत्पादनांच्या किमती कमी असल्यामुळे भारताला निर्यातीमध्ये अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

साम्यवादी चौकटीत राहूनही चीनने भांडवलवादी जगाला लाल गालिचा अंथरला, १९८०-९० च्या दशकापासून त्यांनी पुढील शंभर वर्षांचा रोड मॅप बनवला. उगीचच डावी पोथीनिष्ठा जपत साम्यवादी-भांडवलवादी विचारांच्या चक्रव्यूहात तो देश अडकून राहिला नाही. काळानुसार उत्पादन, संशोधन, तंत्रज्ञान आणि जागतिक पुरवठा साखळीवर एकछत्री सत्ता निर्माण केली. त्यामुळेच त्यांचे जागतिक व्यापार आधिक्य एक ट्रिलियन डॉलरवर पोहोचले आहे. जगभरात सध्या युद्धग्रस्त व तणावग्रस्त परिस्थिती असताना चीनचे निर्यात आधिक्य तब्बल एक लाख कोटी डॉलरने वाढणे ही घटना केवळ आर्थिक आकड्यांपुरती मर्यादित नाही, तर ती चीनच्या दीर्घकालीन धोरणात्मक नियोजनाचे प्रतीक आहे. युक्रेन-रशिया युद्ध, मध्यपूर्वेतील संघर्ष, अमेरिका-चीन व्यापारी युद्ध, जागतिक पुरवठा साखळीतील तुटवडा आणि वाढणारी महागाई अशा अनेक प्रतिकूल परिस्थितीमध्येही चीनने आपली जागतिक व्यापारी पकड अधिक मजबूत केली आहे. अगदी कपड्यांपासून अत्याधुनिक इलेक्ट्रॉनिक वस्तूंपर्यंत, दुचाकीपासून नवीन इलेक्ट्रिक मोटारीपर्यंत एक वेगळी औद्योगिक परिसंस्था चीनने विकसित केली आहे.

यामागे सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे अमेरिकेने लादलेले व्यापार निर्बंध आणि मोठ्या प्रमाणात वाढवलेले आयात शुल्क. अमेरिकेने चीनविरोधात घेतलेल्या कठोर



भूमिकेमुळे चीनने आपले लक्ष केवळ पाश्चात्त्य बाजारपेठांवर न ठेवता आशिया, आफ्रिका, लॅटिन अमेरिका आणि मध्यपूर्व या नव्या व उभरत्या बाजारपेठांकडे वळवले. 'वन बेल्ट वन रोड'सारख्या उपक्रमांमुळे या देशांशी असलेले व्यापारी संबंध अधिक दृढ झाले.

चीनच्या प्रचंड भौगोलिक आकारामुळे उपलब्ध असलेला वेगवेगळ्या दुर्मिळ खनिजांचा मोठा साठा, त्यासोबतच प्रचंड लोकसंख्या. त्यामुळे उपलब्ध असलेले स्वस्त आणि कुशल मनुष्यबळ या दोन्ही गोष्टींनी उत्पादन क्षमता वाढवली. त्यासोबत जागतिक बाजारात आपली वस्तू स्वस्त ठेवण्यासाठी चीनने आपले चलन युवानचे मूल्य कृत्रिमरीत्या कमकुवत ठेवले, ज्यामुळे त्यांची निर्यात अधिक स्पर्धात्मक झाली. चीन अजूनही जगाची फॅक्टरी म्हणून ओळखला जातो. यासोबतच संशोधन व विकास क्षेत्रात चीनने केलेली प्रचंड गुंतवणूक लक्षवेधी आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, इलेक्ट्रिक वाहने, सोलार पॅनेल्स, सेमीकंडक्टर्स, बॅटरी तंत्रज्ञान अशा क्षेत्रांत चीनने नावीन्यपूर्ण संकल्पना विकसित करून उत्पादनातील उत्कृष्टता साधली आहे.

इलेक्ट्रिक उपकरणे, वैद्यकीय उपकरणे यांमध्ये लागणारे अर्धसंवाहक आणि दुर्मिळ संयुगे यांचे उत्पादन आणि व्यावसायिक वापर यावर तर चीनची जागतिक मक्तेदारीच आहे. भारताला फक्त चीनवर दोष ठेवून चालणार नाही. आपण स्वतः संशोधन, उत्पादन, नवकल्पना आणि जागतिक स्पर्धात्मकता इथे किती मजल मारू शकतो याचे कठोर आत्मपरीक्षण करायला हवे. भारतात पायाभूत सुविधांची मोठ्या प्रमाणावर कामे सुरू आहेत, पण त्यांना लागणारी अवजड मशिनरी, जसे टनेल बोअरिंग मशीन ऊँश मात्र चीनमधूनच आणावी लागते.

आपल्या उच्च अधिकाऱ्यांना चीनने जगभरातील बाजारपेठांचा आणि त्यांच्या गरजांचा अभ्यास करण्यासाठी पाठवले, त्याप्रमाणे विविध बाजारपेठांचा योग्य तो अभ्यास आणि अचूक अंदाज घेऊन वेगवेगळ्या उत्पादन रचना करणे ही चीनची सर्वात मोठी रणनीती ठरली आहे. युरोपसाठी हरित तंत्रज्ञान, आफ्रिकेसाठी स्वस्त व टिकाऊ उत्पादने, आशियासाठी मध्यम दरातील इलेक्ट्रॉनिक वस्तू, ज्यांना आपण स्वस्त चिनी उत्पादने म्हणतो अशी विभागनिहाय उत्पादन धोरणे चीनने यशस्वीपणे राबवली. त्यामुळे जागतिक मागणीत चढ-उतार असतानाही चीनची निर्यात सातत्याने वाढत राहिली जागतिक युद्धजन्य परिस्थितीमुळे अनेक देशांची उत्पादन क्षमता कमी झाली असताना चीनने मात्र पुरवठा साखळीवर नियंत्रण ठेवत संधीचे सोने केले.

एकूणच पाहता चीनचे वाढते निर्यात आधिक्य ही योगायोगाने घडलेली बाजारपेठीय घटना नसून ती धोरणात्मक नियोजन, युवा शक्तीचा प्रभावी वापर, संशोधनातील गुंतवणूक आणि जागतिक बाजारपेठेचा अचूक अभ्यास यांचा परिपाक आहे. जागतिक तणावाच्या काळातही आर्थिक आघाडीवर मिळवलेले यश अतुलनीय आहे. आज पण भारत-चीन व्यापारात चीन आघाडीवर असून १०० अब्ज डॉलरच्या फरकाने भारत मागे आहे. भारतासाठी यातून बोध म्हणजे प्रत्यक्ष परिणाम देणारे उद्योग धोरण मजबूत केले पाहिजे. खासगी भांडवलदारांना प्रेरणा देऊन त्यांना स्वस्त भांडवल, योग्य किमतीत जमिनीची उपलब्धता, वीज पुरवठा, निर्यातप्रधान उद्योगांना प्रोत्साहन, सुटसुटीत कर रचना, कामगार कायदे, उद्योजकांना निर्यातीसाठी इतर पायाभूत सोयीसुविधा निर्माण केल्या आणि जागतिक स्तरावर स्पर्धक होण्याची तयारी, त्यासोबत जपान, कोरियाप्रमाणे उत्पादनाची नावीन्यता, सुबकता आणि जागतिक तोडीचा दर्जा यावर लक्ष देणे जरुरी आहे, तरच भारताची व्यापार तूट कमी होईल. नाहीतर चीनचे वर्चस्व पुढील अनेक दशके असेच टिकून राहील.

**अनिल साखरे**

# शरद पवारांची बदलती नीती



**माझेही मत**

मराठीत एक चपखल म्हण आहे, 'वारा पाहून पाठ फिरवावी,' म्हणजेच काळ आणि परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आपली धोरणे लवचिक ठेवावीत. महाराष्ट्राच्या राजकारणात 'मुत्सद्दीपणा' हा शब्द ज्यांच्या नावाने ओळखला जातो, त्या शरद पवारांनी पुन्हा एकदा हेच धोरण स्वीकारल्याचे दिसत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटी नंतरचा संघर्ष आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीचे निकाल पाहता, शरद पवारांनी पुतण्या अजित पवार यांच्याशी जुळवून घेण्याचा घेतलेला निर्णय हा निव्वळ योगायोग नसून तो 'व्यावहारिक राजकारणाचा' एक मास्टरस्ट्रोक मानला जात आहे.

लोकसभा निवडणुकीत शरद पवार गटाला मिळालेले यश विधानसभा निवडणुकीत ओसरल्याचे दिसले. अजित पवार यांनी आपल्या गटाचे ५० पेक्षा जास्त आमदार निवडून आणून हे सिद्ध केले की, ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांचे जाळे आणि 'निवडून येण्याची क्षमता' आजही त्यांच्याकडेच आहे. याउलट, शरद पवार गटाला १० आमदारांचा टप्पा गाठताना झालेली दमछाक हे स्पष्ट करते की, सत्तेचे समीकरण जुळवण्यासाठी आता अजित पवारांचे संख्याबळ अनिवार्य आहे.हरियाणा, महाराष्ट्र आणि त्यानंतर दिल्ली, बिहार विधानसभा निवडणुकांत काँग्रेसचा झालेला 'सुपडा साफ' शरद पवारांसाठी धोक्याची घंटा ठरली आहे. राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली काँग्रेस भाजपला रोखण्यात अपयशी ठरत आहे, हे पवारांसारख्या मुरब्बी राजकारण्याने ओळखले आहे. केंद्रात भाजपचे वर्चस्व दीर्घकाळ टिकणार असल्याने, केवळ काँग्रेसच्या भरवशावर राहून स्वतःचे राजकीय नुकसान करून घेणे त्यांना व्यवहार्य वाटत नसावे.

खासदार सुप्रिया सुळे यांचा संसदेतील अनुभव मोठा असला, तरी राज्याच्या प्रशासकीय राजकारणात आणि कार्यकर्त्यांच्या फौजेवर त्यांची पकड अजित पवारांच्या तुलनेत आजही कमी आहे. शरद पवारांनंतर पक्ष विखुरला जाऊ नये आणि सुप्रिया सुळे यांचा पाया भक्कम व्हावा, यासाठी सत्तेच्या प्रवाहाची गरज आहे. आपल्या हयातीतच सुप्रिया सुळे यांचा राजकीय पाया मजबूत करणे आणि त्यांना केंद्रात मंत्रिपद मिळवून देऊन राजकीय स्थिरता आणणे, हा पवारांच्या अजेंड्याचा मुख्य भाग असल्याचे दिसते.केंद्रात जरी भाजपला नितीश कुमार,जेडीयू आणि चंद्राबाबू नायडू,टीडीपी यांसारख्या प्रादेशिक पक्षांवर अवलंबून राहावे लागत असले, तरी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे सरकार भक्कम आहे. अशा परिस्थितीत भाजपशी टोकाचा संघर्ष करून राजकीय विजनवासात राहण्यापेक्षा, अजित पवारांच्या माध्यमातून केंद्रीय सत्तेशी जवळीक आणि सुसंवाद साधणे राजकीयदृष्ट्या अधिक फायदेशीर ठरू शकते.


आगामी महानगरपालिका निवडणुकांमध्ये पुणे, पिंपरी-चिंचवड आणि सोलापूर-कोल्हापूर यांसारख्या पश्चिम महाराष्ट्रातील बालेकिल्ल्यांमध्ये राष्ट्रवादीची ताकद टिकवणे दोन्ही पवारांसाठी महत्त्वाचे आहे. सत्तेशिवाय कार्यकर्ता टिकवणे कठीण असते. त्यामुळे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये भाजपचा प्रभाव रोखण्यासाठी दोन्ही राष्ट्रवादींचे एकत्र येणे ही आता 'राजकीय अपरिहार्यता' बनली आहे. राजकारणात कोणीही कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो, तर केवळ 'हितसंबंध' महत्त्वाचे असतात. शरद पवारांनी आपल्या प्रदीर्घ अनुभवातून हे ओळखले आहे की,'अजित' शक्तीला सोबत घेतल्याशिवाय राष्ट्रवादीचा प्रभाव टिकवून ठेवणे कठीण आहे. हा निर्णय म्हणजे तत्त्वांशी तडजोड नसून, भविष्यातील अस्तित्वासाठी केलेली एक 'व्यावहारिक तडजोड' आहे.

**अविनाश देशपांडे**

# नवीन वर्ष: आत्मनिरीक्षण, संकल्प आणि मोदी सरकारची धार्मिक परीक्षा

नवीन वर्ष हे एका नवीन पहाटेसारखे आहे, जे दरवर्षी एकदा येते आणि आपल्यासोबत एक नवीन सुरुवात होण्याची शक्यता घेऊन येते. कालांतराने, ते त्याच्या शिखरावर पोहोचते आणि नंतर हळूहळू नाहीसे होते. हे चक्र या जगातील प्रत्येक व्यक्तीने अनुभवलेला एक सततचा अनुभव आहे. ही सातत्य निसर्ग आणि जीवनाचे अंतिम सत्य आहे. प्रत्येकाने नवीन वर्षाची सुरुवात चांगल्या कर्मांनी करावी, मागील वर्षाच्या सततच्या प्रवाहातून आणि अनुभवांमधून शिकून घ्यावी. हा आत्मनिरीक्षणाचा काळ आहे, जेव्हा आपण आपल्या चांगल्या आणि वाईट कर्मांचे मूल्यांकन केले पाहिजे आणि पुढे जाण्याचा संकल्प केला पाहिजे.चांगल्या कर्मांनी, सकारात्मक विचारांनी आणि स्पष्ट दिशेने नवीन वर्षाची सुरुवात केल्याने जीवन अर्थपूर्ण बनते. नवीन वर्ष हे प्रत्येकासाठी गेल्या वर्षातील यश आणि कामगिरी तसेच उणीवा आणि चुकांचे मूल्यांकन करण्याचा काळ आहे. ते येत्या वर्षासाठी योजना आखण्याची, कृती करण्याची आणि नवीन ध्येये निश्चित करण्याची संधी प्रदान करते. नवीन वर्षाच्या सुरुवातीला, प्रत्येकाने येणाऱ्या वर्षासाठी नवीन ध्येये निश्चित करावीत आणि ती साध्य करण्यासाठी रणनीती विकसित करावीत. ते संधींना यशात रूपांतरित करू शकतात. जर एखाद्या व्यक्तीने आयुष्याच्या सुरुवातीच्या काळातच आपले ध्येय निश्चित केले तर यशाचा मार्ग आपोआप स्पष्ट होतो. ध्येये शिस्त, कठोर परिश्रम आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना प्रेरणा देतात. त्याचप्रमाणे, नवीन वर्षाच्या सुरुवातीला, प्रत्येकाने वर्षासाठी स्पष्ट ध्येये निश्चित केली पाहिजेत जेणेकरून ते सतत प्रगती करू शकतील आणि चांगल्या कृती आणि त्यांच्या ध्येयांसाठी प्रयत्नांद्वारे त्यांच्या जीवनाच्या शिखरावर पोहोचू शकतील. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली, केंद्र सरकारने गेल्या वर्षात असंख्य कामगिरी साध्य केल्या आहेत, तसेच असंख्य यश देखील मिळवले आहेत. मोदी सरकारने या यशांपासून आपल्या चुका आणि उणीवा लपवू नयेत. त्याऐवजी, त्यांनी आपल्या चुका आणि उणीवांचे मूल्यांकन केले पाहिजे आणि येणाऱ्या वर्षासाठी रणनीती तयार केली पाहिजे, जेणेकरून या चुका आणि उणीवा दुरुस्त करून संधींमध्ये रूपांतरित करता येतील.

ज्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूतकाळात अनेक आव्हानांना तोंड दिले, त्याचप्रमाणे त्यांना येणाऱ्या वर्षातही आव्हानांना तोंड द्यावे लागेल. असे म्हणता येईल की २०२६ मध्ये नरेंद्र मोदींना अनेक परीक्षांना तोंड द्यावे लागेल आणि येणारे वर्ष भाजप आणि पंतप्रधान मोदींसाठी राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचे आहे. २०२६ मध्ये चार राज्यांमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत: आसाम, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि केरळ आणि एक केंद्रशासित प्रदेश: पुद्दुचेरी. परिणामी, भाजपला केवळ प्रचारातच नव्हे तर संघटनात्मक ताकद आणि लोकशाही प्रक्रियांमध्ये सक्रिय सहभाग यामध्येही आव्हानांचा सामना करावा लागेल. या संदर्भात, मतदार याद्यांची विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रिया निवडणूक तयारीचा एक महत्त्वाचा भाग आहे. लोकशाही मजबूत करण्यासाठी नवीन वर्षात मतदार याद्या त्रुटीमुक्त, पारदर्शक आणि अद्ययावत असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. बनावट, डुप्लिकेट किंवा मृत मतदारांना काढून टाकणे आणि विशेष सघन पुनरावृत्तीद्वारे यादीत खरे आणि पात्र मतदार समाविष्ट करणे निष्पक्ष निवडणुकांचा पाया मजबूत



करते. या पाच मतदारसंघांमध्ये भाजपची स्थिती वेगळी आहे. आसाममध्ये पक्षाचे पूर्ण बहुमत असलेले सरकार आहे, तर पुद्दुचेरीमध्ये युती सरकार सत्तेत आहे. या दोन्ही भागात सत्ता टिकवणे हे भाजपसाठी एक महत्त्वाचे आव्हान असेल. केरळ, तामिळनाडू आणि पश्चिम बंगाल ही अशी राज्ये आहेत जिथे भाजप आपल्या संघटनेचा विस्तार करून राजकीय फायदा मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. विशेषतः पश्चिम बंगाल हे भाजपच्या रणनीतीचे प्रमुख केंद्र असल्याचे दिसून येते. येथे, राष्ट्रीय मुद्द्यांसोबतच, विशेष सघन पुनरावृत्ती सारख्या लोकशाही प्रक्रियेद्वारे निष्पक्ष मतदान आणि जागरूक मतदारांवर भर देणे हा पक्षाच्या निवडणूक धोरणाचा एक महत्त्वाचा भाग असू शकतो.

आसाम आणि पश्चिम बंगालमध्ये, मोठ्या संख्येने बांगलादेशी घुसखोरांना मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले आहे आणि ते वर्षानुवर्षे मतदान करत आहेत अशी चिंता बऱ्याच काळापासून व्यक्त केली जात आहे. जर हे खरे असेल, तर ते केवळ भारताच्या लोकशाही व्यवस्थेच्या पावित्र्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करत नाही तर स्थानिक नागरिकांच्या संवैधानिक अधिकारांनाही गंभीर आव्हान निर्माण करते. या चिंता लक्षात घेऊन, सरकारने विशेष सघन पुनरावृत्ती प्रक्रिया सुरू केली आहे, ज्या अंतर्गत मतदार यादींची कसून तपासणी केली जात आहे. सरकारचा असा युक्तिवाद आहे की ही प्रक्रिया विशेषतः आसाम आणि पश्चिम बंगालसारख्या सीमावर्ती राज्यांमध्ये आवश्यक आहे, जिथे वेळोवेळी बेकायदेशीर घुसखोरीच्या समस्येबद्दल प्रश्न उपस्थित केले जात आहेत. असेही आरोप झाले आहेत की काही घुसखोरांनी आधार कार्ड आणि मतदार ओळखपत्रे अशी कागदपत्रे मिळवली आहेत, ज्यामुळे त्यांना निवडणूक प्रक्रियेत सहभागी होता येते. राजकीय विश्लेषकांच्या मते, अशा मतदारांचा पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमूल काँग्रेसला फायदा होतो, तर आसाममध्ये त्यांचा प्रभाव विरोधी पक्षांची स्थिती मजबूत करणारा म्हणून पाहिला जातो. सरकारचा असा दावा आहे की विशेष सघन पुनरावृत्तीचा उद्देश कोणत्याही समुदायाला किंवा राज्याला लक्ष्य करणे नाही, तर मतदार यादीची शुद्धता सुनिश्चित करणे आहे जेणेकरून केवळ पात्र आणि कायदेशीर नागरिकच लोकशाही प्रक्रियेत सहभागी होऊ शकतील. लोकशाहीची विश्वासार्हता केवळ निष्पक्ष, पारदर्शक आणि संवैधानिक प्रक्रियेद्वारेच राखली जाऊ शकते. केरळ आणि तामिळनाडू या दोन दक्षिणेकडील राज्यांबद्दल बोलायचे झाले तर, भारतीय जनता पक्षाला येथे गमावण्यासारखे फारसे काही नाही.

**डॉ.ब्रम्हानंद राजपूत**
मो.८८६४८४०६०७

गुरुवार, १ जानेवारी २०२६

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम


## बाभूळगाव घरकुल लाभार्थ्यांचे प्रकरण थेट पालकमंत्र्याच्या दरबारात

# बीडिओ यांना एक आठवड्याचे अल्टिमेटम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



बाभूळगाव - गणोरी येथील बकऱ्या चारणाऱ्या इसमाची दखल जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजय राठोड यांनी घेतली असून बाभूळगाव पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांना पत्र देऊन एक आठवड्यात उचित कार्यवाही करावी व केलेल्या कामाचा अहवाल आपल्या कार्यालयाला सादर करावा असे निर्देश दिले आहे. या पत्रा मुळे मोठी खळबळ उडाली असून लांबलेला लाभार्थ्यांच्या घरकुलाचा प्रश्न लवकरच निकाली निघेल अशी आशा पल्लवीत झाली आहे. सोबतच लाभार्थ्याला पंचायत समिती स्तरावर पाठपुरावा करावा अडचण आल्यास आपल्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे पत्र लाभार्थी शेख जाबीर यांना पालकमंत्री यांच्या कार्यालयातून देण्यात आले आहे.

प्राप्त माहिती नुसार गणोरी येथील शेख जाबीर शेख हुसेन वय 45 वर्ष हा भूमिहीन असलेला इसम बकऱ्या चारुन आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करीत आहे. सदर इसमाचे घरकुल प्रधानमंत्री आवास योजनेत दिनांक 27 जानेवारी 2025 च्या यादी प्रमाणे मंजूर असून त्याचा रजिस्ट्रेशन आयडी क्रमांक एम एच 13 40 62 792 असा आहे. असे असताना त्याला घरकुलाचा पहिला हप्ता बाभूळगाव पंचायत समिती कडून मिळाला नाही. अनेक वेळा त्याने पंचायत समिती कडे अर्ज विनंती केली. मात्र उपयोग झाला नाही. भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढ दिवसा पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंती पर्यंत शासना कडून महाराजस्व अभियान राबविण्यात आले. मात्र या महसूल पंधरवाड्यात सुद्धा लाभार्थ्यांचा घरकुलाचा प्रश्न मार्गी लागला नाही. आपले घर गावठाणात असून शासना कडून मिळणाऱ्या पैशात घरकुल बांधून पूर्ण होणार नाही. यामुळे त्याने पावसाळ्या पूर्वी बकऱ्या विकून विटा आणल्या आहे. यानंतर त्याने पंचायत समिती गाठली असतात त्याला के वाय सी केलेली नाही. असे सांगण्यात आले त्याने लगेच केवायसी करून पंचायत समितीला माहिती दिली. मात्र सिस्टीम मध्ये येण्या करिता चार-पाच दिवस लागतील असे त्याला पंचायत समितीच्या घरकुल विभागात सांगण्यात आले. या मुळे तो निश्चित झाला मात्र आज पर्यंत त्याच्या खात्या मध्ये 15,000/- रुपयाचा पहिला हप्ता जमा झाला नाही. या नंतर त्याने नव्याने रुजू झालेल्या येथील गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांची प्रत्यक्ष भेट घेतली असता त्यांनी गणोरी गावचा ग्राम सेवक सचिन वाघ याच्याशी संपर्क साधला असता अर्जदाराचे घर अतिक्रमण मध्ये आहे. अशी माहिती ग्रामसेवकाने गटविकास अधिकारी उज्वला ढोले यांना दिली. यानंतर तक्रार कर्त्याने माझ्या घराच्या भिंतीला भिंत लागून असलेल्या इसमाला घरकुल मिळाले आहे. असे गट विकास अधिकारी उज्वला ढोले यांना सांगितले असता त्यावर त्यांनी एकदा केलेली चूक वारंवार करायची काय? असा प्रति प्रश्न तक्रार कर्त्याला केला. अखेर सगळी कडून निराश झालेल्या इसमाने राज्याचे मृद संधारण मंत्री तथा यवतमाळ जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार संजय राठोड यांचे कार्यालय गाठले व तेथे असलेले उपजिल्हाधिकारी तथा विशेष कार्यकारी अधिकारी मोहन जोशी यांच्या कानी ही बाब घालण्यात आली. त्यांनी सर्व प्रकरण कागदपत्र, अर्ज, झोपडीचा फोटो हे पाहिल्या नंतर सदर बाब पालकमंत्री यांच्या निदर्शनास आणून दिली. पालक मंत्री ना. संजय राठोड यांनी या प्रकरणी गटविकास अधिकारी बाभूळगाव यांना एक आठवड्यात उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहे. तसेच अर्जदार शेख जाबीर शेख हुसेन यांना एक पत्र देऊन पंचायत समिती मध्ये पाठ पुरावा करावा व अडचण आल्यास आपल्या कार्यालयाशी संपर्क साधावा असे पत्र अर्जदाराला दिले आहे. पालकमंत्र्याच्या या पत्रा मुळे पंचायत समिती मध्ये मोठी खळबळ उडाली असून एक आठवड्यात बीडीओ यांच्या कडून काय कार्यवाही केली जाते या कडे गणोरी वासियांचे लक्ष लागले आहे.

## तलाठी संवर्गाच्या विविध मागण्यांसाठी एकदिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी ) संवर्गाच्या आर्थिक व सेवाविषयक विविध मागण्यांबाबत जिल्हा प्रशासनाकडे अनेक वेळा निवेदने सादर करूनही प्रशासनाकडून कुठल्याही प्रकारची दखल न झाल्याने विदर्भ पटवारी संघ नागपूर ,तालुका शाखा उमरखेड च्या वतीने दि 3 1 डिसेंबर रोजी तहसील कार्यालयात डी एस सी जमा करण्यात आले व तहसिल कार्यालयासमोर एक दिवसीय लक्षवेधी धरणे आंदोलन शंभर टक्के उपस्थितीने करण्यात आले.

जिल्ह्यातील तलाठी संवर्गाची एकत्रित सेवा ज्येष्ठता यादी मागील 15 वर्षापासून अद्ययावत करण्याबाबत प्रशासनाकडून होत असलेली टाळाटाळ,तलाठी संवर्गाच्या मंडळ अधिकारी पदोन्नती संवर्गात पदोन्नती द्यावी,ग्राम महसूल अधिकारी संवर्गाची विनंतीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण करणे ,कालबाह्य झालेल्या लॅपटॉप प्रिंटर बदलून मिळावे ,जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी संवर्गाची विनंतीनुसार बदली प्रक्रिया पूर्ण करावी ,अतिवृष्टी व दुष्काळ अनुदान वाटपावरील नियमानुसार 0 . 25 टक्के प्रशासकीय खर्च मेहनताना मिळावा ,भाड्याने असलेल्या तलाठी कार्यालयांना भाडे मिळावे ,वार्षिक मूल्यांकन अहवालाची प्रत मिळावी,ग्राम महसूल अधिकाऱ्यांचे वेतन निश्चित करावे,जिल्ह्यातील ग्राम महसूल अधिकारी यांच्याकडे सहा महिन्यापेक्षा जास्त अतिरिक्त प्रभार न ठेवता अतिरिक्त प्रवारांचा मेहनताना वेळेवर मिळावा ,जिल्ह्यातील तलाठ्यांना आदिवासी प्रोत्साहन पर भत्ता मिळावा ,ग्राम महसूल अधिकारी कार्यालयांना फर्निचर व इतर सुविधा पुरवाव्या,तलाठी साजा वरील कोतवाल प्रतिनियुक्तिवार तहसील कार्यालयाच्या ठिकाणी किंवा इतर ठिकाणी घेण्यात येऊ नये ,गौण खनिज पथकामध्ये संरक्षण पुरवावे ,ग्राम महसूल कार्यालयांना शासनातर्फे विद्युत बिल मिळावे ,ग्राम महसूल अधिकारी वैद्यकीय प्रतिकृती देयके निकाली काढावे ,2013 शीर्षकांतर्गत शासनाकडून मिळणारी रक्कम ग्राम महसूल अधिकारी यांना प्रदान करावी,जिल्हाधिकारी कार्यालयातील तलाठी स्थापनेचा आढावा नियमित घेण्यात यावा , अशा विविध मागण्यासंदर्भात विदर्भ पटवारी संघ नागपूर जिल्हा शाखेच्या वतीने 26 डिसेंबर 2025 रोजी जिल्हा शाखेच्या वतीने जिल्हा प्रशासनाला रीतसर सूचना पत्र देऊन जिल्हा शाखेच्या निवेदनानुसार दि 3 1 डिसेंबर रोजी ग्राम महसूल अधिकारी यांनी उमरखेड तहसिल कार्यालयात डीएससी टोकन जमा करुन एकदिवशीय लक्षवेधी धरणे आंदोलन केले .त्याचप्रमाणे दि .2 जानेवारी 20 26 रोजी जिल्हाधिकारी कार्यालय समोर एकदिवसीय धरणे आंदोलन व दि 6जानेवारीपासून जिल्ह्यातील तलाठी संवर्ग बेमुदत सामूहिक रजेवर जाणार असल्याचे निवेदनात नमूद केले आहे.

## आश्रम शाळेचा मुख्याध्यापक एसीबीच्या जाळ्यात



पुसद - मोबाईल कॉल रेकॉर्डच्या आधारे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मोठी कारवाई करत शासकीय आश्रम शाळा खैरखेडा येथील मुख्याध्यापकाला लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. सदर मुख्याध्यापक हा वैद्यकीय खर्चाच्या बिलाला मंजुरी देण्यासाठी दीड हजार रुपयांची लाच मागितल्याप्रकरणी ही कारवाई करण्यात आली आहे. बाबुराव एन. एम्बलवाड यांनी सादर केलेल्या मेडिकल बिलाची मंजुरी देण्यासाठी संबंधित मुख्याध्यापकाने दीड हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप होता. याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केल्यानंतर सापळा रचून करण्यात आलेल्या कारवाईत गौरीशंकर प्रभाकर सैजाने (मुख्याध्यापक, शासकीय आश्रम शाळा खैरखेडा) यांना लाच स्वीकारताना जाळ्यात अडकवण्यात आले. ही संपूर्ण कारवाई पुसद येथील विश्रामगृहात पार पडली. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचाराचा गंभीर प्रकार पुन्हा एकदा उघडकीस आला असून, आरोपीविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## वेचक

### खंडाळा येथील राष्ट्रीय कराटे स्पर्धेत पांढरकवड्याचा डंका




पांढरकवडा - खंडाळा (जि. पुणे) येथे आयोजित राष्ट्रीय कराटे शिबीर व अजिंक्यपद स्पर्धेत पांढरकवड्याच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला आहे. अंश क्रीडा व बहुउद्देशीय संस्था संचलित कराटे प्रशिक्षण केंद्राच्या सात खेळाडूंनी काता व कुमिते या प्रकारांत एकूण १२ पदके पटकावत आपली छाप उमटवली. हंशी परमजीत एस. सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक २८ डिसेंबर ते १ जानेवारी या कालावधीत पाच दिवसीय राष्ट्रीय शिबीर व स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्र, गुजरात, दिल्ली, राजस्थान, मध्य प्रदेश, मेघालय आदी राज्यांतील सुमारे ३०० खेळाडूंनी सहभाग नोंदवला. यावेळी रेंशी परमजीत एस. सिंग यांनी जागतिक कराटे महासंघाच्या (WKF) नवीन नियमांचे मार्गदर्शन केले. पांढरकवडा कराटे प्रशिक्षण केंद्राच्या विद्यार्थ्यांनी दोन्ही प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी केली. ईश्वरी रामकृष्ण गेडाम हिने कुमिते प्रकारात सुवर्ण, तर काता प्रकारात कांस्य पदक पटकावले. गौरी योगेश पडोळे हिने काता प्रकारात सुवर्ण, तर कुमिते प्रकारात रौप्य पदक मिळवले. खुशी सोनूदीप सिंहा हिने काता व कुमिते दोन्ही प्रकारांत रौप्य पदक मिळवले. मनस्वी मुकेश माथुर हिने कुमिते प्रकारात रौप्य, तर काता प्रकारात कांस्य पदक पटकावले. अर्हत राहुल मेश्राम याने काता प्रकारात रौप्य, तर कुमिते प्रकारात कांस्य पदक मिळवले. पृथ्वीराज संदीप संदलवार याने काता प्रकारात रौप्य, तर कुमिते प्रकारात कांस्य पदक पटकावले. ओम प्रवीण कुमरे याने काता व कुमिते दोन्ही प्रकारांत कांस्य पदक मिळवले. या स्पर्धेत पांढरकवड्याच्या खेळाडूंनी २ सुवर्ण, ५ रौप्य व ५ कांस्य अशी एकूण १२ पदके पटकावली. न. प. मराठी शाळा क्र. १, पांढरकवडा येथे गेल्या चार वर्षांपासून शिहान प्रा. आनंद एस. भुसारी (5th डॅन ब्लॅक बेल्ट व राष्ट्रीय पंच) यांच्या मार्गदर्शनाखाली सेन्साई योगेश पडोळे व सेन्साई हितेश नागभीडकर हे विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देत आहेत.

### अखिलेश अग्रवाल यांना राज्यस्तरीय 'दर्पण रत्न' पुरस्कार जाहीर



पुसद - आंतरराष्ट्रीय मानांकन प्राप्त हिंदी मराठी पत्रकार संघ यांच्या वतीने देण्यात येणारा अत्यंत प्रतिष्ठेचा 'राज्यस्तरीय दर्पण रत्न पुरस्कार २०२६' पुसद येथील लोकमतचे तालुका प्रतिनिधी ज्येष्ठ पत्रकार अखिलेश अग्रवाल यांना जाहीर झाला आहे. पत्रकारिता क्षेत्रात त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. हिंदी मराठी पत्रकार संघ आणि 'दर्पण' वृत्तपत्राच्या माध्यमातून दरवर्षी सामाजिक बांधिलकी म्हणून शिक्षण, साहित्य, आरोग्य, कला, राजकारण आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांत उत्तुंग कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान केला जातो. पुसद येथील अखिलेश अग्रवाल हे ३४ वर्षांपासून पत्रकारितेच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असून त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामाजिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले आहे. विधायक कार्याचा पाठपुरावा त्यांनी आजपर्यंत केला आहे. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांची राज्यस्तरावर निवड झाली आहे. हा गौरव सोहळा मंगळवार, दि. ६ जानेवारी २०२६ रोजी मलकापूर येथील मराठा मंगल कार्यालय हॉलमध्ये आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते अखिलेश अग्रवाल यांना पुरस्कार प्रदान करून सन्मानित केले जाईल.

### बाभूळगाव विद्युत करंट लागून महिलेचे निधन



बाभूळगाव - नागरगाव येथील रहिवासी जयश्री राजू कांबळे वय 45 वर्ष यांचे विद्युत करंट लागून निधन झाल्याने गावात हळहळ केली जात आहे. बचत गटाच्या आय सी आर एफ म्हणून काम करणाऱ्या जयश्री राजू कांबळे ह्या बुधवारला सकाळी 9.30 वाजता आंघोळ करीत असताना त्यांना जिवंत विद्युत तारेचा स्पर्श झाला. यातच त्यांचे निधन झाले त्यांच्या मागे पती, एक मुलगा, एक मुलगी व बराच मोठा आप्त परिवार आहे.सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जयश्री कांबळे यांच्या अचानक निधनामुळे गावात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## कुठे नव्हे एवढ्या अवाजवी व अन्यायकारक करांविरोधात आर्णीकर एकवटले

### लोकांच्या प्रश्नांचा भडिमार मुख्याधिकारी गोंधळले, समाधानकारक उत्तर नाही

**जनमाध्यम प्रतिनिधी**



आर्णी - नगर परिषदेकडून लावण्यात आलेल्या अवाजवी व अन्यायकारक करांविरोधात सोमवारी शहरात तीव्र जनआक्रोश उसळला. कुठे नव्हे एवढ्या विविध कर प्रकारांच्या नावाखाली नागरिकांवर आर्थिक बोजा टाकण्यात आल्याचा आरोप करीत आर्णीकरांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना घेराव घातला.

वृक्ष प्राधिकरण अस्तित्वात नसताना वृक्ष कराची वसुली का केली जात आहे? अग्निशमन प्राधिकरण नसतानाही अग्निशमन कर नागरिकांकडून का आकारला जातो? महाराष्ट्र शिक्षण कर नेमका किती टक्के घेतला जात आहे आणि त्याचा कायदेशीर आधार काय? असे एकामागून एक प्रश्न उपस्थित करण्यात आले. याशिवाय प्रशासकाला केवळ धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार असताना झोन बदलणे, भाडेमूल्य वाढविणे आणि त्याआधारे अवाजवी कर आर्णीकरांवर लादणे योग्य आहे का, असा थेट सवाल उपस्थित करण्यात आला.

या सर्व मुद्द्यांवर नागरिकांनी मुख्याधिकाऱ्यांवर प्रश्नांचा भडीमार केला. मात्र नागरिकांच्या प्रश्नांना समाधानकारक उत्तरे देण्यात मुख्याधिकारी अपयशी ठरल्याचे चित्र दिसून आले. काही वेळातच वातावरण तापले आणि अखेर सुनावणीच्या ठिकाणावरून मुख्याधिकाऱ्यांनी माघार घेतल्याचा आरोप नागरिकांनी केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आक्षेप नोंदविणे व सुनावणीसाठी एक दिवसाची मुदतवाढ देण्यात आली. मात्र या निर्णयानंतरही नागरिकांचा संताप शमलेला नसून, नगर परिषदेच्या कारभाराविरोधात आर्णीकरांमध्ये तीव्र असंतोष कायम आहे. यावेळी गणेश हिरोळे माजी आरोग्य सभापती, प्रवीण मुनगिनवार,विठ्ठल देशमुख, दर्शन कोषटवार,अमोल मांगूळकर, विशाल देशमुख, अनिल बेलगमवार, अजय छल्लाणी, कांतीलाल कोठारी, भिकूसेठ पटेल, रवी नालमवार, जयंत डोल्हारकर,आबीद फानन, राजू बुटले, फारुख धरिवाला,आरिफ शेख, रब शेख, इरफान रजा, प्रितेश भोगे, संदेश भगत, क्षितिज भगत यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजी गार्डन बनले रोड रोमिओ चा अड्डा

### दिवसा,रात्री 'रोड रोमियो' यांचे अश्लील चाळे, पोलीस व नगर परिषदेच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप

**जनमाध्यम प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्न..

यवतमाळ – शहराच्या मध्यवर्ती भागात असलेले शिवाजी गार्डन हे नागरिकांसाठी सुरक्षित व सुसंस्कृत सार्वजनिक उद्यान असावे अशी अपेक्षा असताना, प्रत्यक्षात मात्र हे उद्यान आज समाजविघातक प्रवृत्तींचे आश्रयस्थान बनल्याचे चित्र समोर येत आहे. या ठिकाणी वारंवार होणारे गैरवर्तन, अनुचित वर्तन व अश्लील चाळे यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना पसरली आहे.



शिवाजी गार्डन परिसरात शाळा, महाविद्यालये तसेच विविध कोचिंग क्लासेस असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात अल्पवयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींची वर्दळ असते. मात्र याच परिस्थितीचा गैरफायदा घेत काही व्यक्ती उद्यानात व आजूबाजूच्या परिसरात उघडपणे समाजसंस्कृतीला बाधा पोहोचवणारे वर्तन करताना आढळून येत आहेत. या प्रकारांमुळे विद्यार्थ्यांवर चुकीचे संस्कार होण्याची भीती पालक व नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. दिवसेंदिवस या प्रकारात वाढ होत असून, रहिवाशांना मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. अनेक नागरिकांनी याबाबत तक्रारी करूनही पोलीस प्रशासन व नगर परिषद यांच्याकडून कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या परिसरात नियमित पोलीस गस्त असणे अत्यावश्यक असताना प्रत्यक्षात गस्तीचा अभाव दिसून येतो. तसेच नगर परिषद यवतमाळ यांच्या अखत्यारीतील या उद्यानात सुरक्षेसाठी चौकीदाराची नियुक्ती करण्यात आलेली नाही. अपुरी प्रकाश व्यवस्था, अस्वच्छता आणि कोणतीही नियंत्रण यंत्रणा नसल्यामुळे गैरप्रकारांना मोकळे रान मिळाले असल्याचे स्पष्ट होत आहे. जर शहराच्या मध्यवस्तीतील सार्वजनिक उद्यानात नागरिक व विद्यार्थी सुरक्षित नसतील, तर संपूर्ण शहराच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर येतो. एखादी अनुचित घटना घडण्याची वाट प्रशासन पाहत आहे का? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत. नागरिकांच्या ठोस मागण्या पूर्ण करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. शिवाजी गार्डन परिसरात नियमित पोलीस गस्त सुरू करावी. उद्यानात चौकीदारची तात्काळ नियुक्ती करावी. प्रकाश व्यवस्था व सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत.समाजविघातक वर्तन करणाऱ्यांवर कठोर कायदेशीर कारवाई करावी. वेळीच उपाययोजना न झाल्यास नागरिक आंदोलनाचा मार्ग अवलंबतील, असा इशाराही देण्यात येत आहे.प्रशासन आता तरी जागे होणार की एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच कारवाई करणार? असा प्रश्न सामान्य नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

## चिडी मारी करणाऱ्या युवकांला दिला चोप

### मानव विकास मिशनची बस पूर्ववत शाळे जवळ येण्याची मागणी

**जनमाध्यम प्रतिनिधी**



ढाणकी - शहरातील कस्तुरभा गांधी कन्या विद्यालय परिसरातील मुलींची सर्वात मोठे शाळा कॉलेज त्यामुळे परिसरातील गाव खेड्याच्या मुली या ठिकाणी शिक्षण घेण्यासाठी येत असतात. प्रत्येक गावाखेड्याच्या मुली सुरक्षित ढाणकी येथे शाळेत जाणे येणे करण्याकरीता शासनाच्या वतीने मोफत बस ची व्यवस्था करण्यात आली.गावातील मुली खाजगी क्लासेस ला याच मार्गाने राहादारी करतात. गांवात राहदारीचा मुख्यमार्ग असल्याने महिला, मुली मोठ्या संख्येने राहादारी असते.

कस्तुरबा गांधी कन्या विद्यालय शाळा मेन रोड ला लागून असल्याने नेहमी वरदळी चे ठिकाण असल्याने गर्दी राहते. याच गर्दीचा फायदा घेऊन चिडीमार करणारे मुलींची छेड काढत असल्याचे वर्तवली जात आहे. कस्तुरबा गांधी कन्या विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या गावाखेड्याच्या मुलीनं करीता शाळे जवळील धन्य गोडावून समोरील मोकळ्या पतंगणात बसे स येत होत्या.परंतु बस चालक यांनी शाळे जवळील मोकळ्या पटागणात बसेस आणण्यासाठी मनाई केल्या मुळे शाळेतील मुलींना पाई चालत बस्टॅन्ड पर्यंत जावे लागत असल्याने. मुलींच्या सुरक्षेच्या दृष्टी कोनातून बस पूर्ववत धन्य गोडावून च्या रिकाम्या जागेत यावी य करीता कस्तुरबा गांधी विद्यालया कडून सर्व विभागाला पत्रव्यवहार करण्यात आला. बस शाळेजवळ येत नसल्याने याचा फायदा घेऊन चिडी मारी वाढली होती. चिडी मारी करणाऱ्या रोड रोमिंयो ना चपो देण्या करीता ठाणेदार पांडुरंग शिंदे बिट जमादार मोहन चाटे,पोलीस शिपाई शिवाजी शिंदे आज रोड वर उतरून चांगलाच चोप दिला. बस पूर्ववत शाळे जवळ चालू करण्याची मागणी शाळे सह पालक वर्गातून उमटत आहे.

## ज्येष्ठ पत्रकार प्रदीप देशपांडे, अविनाश दुधे यांचा सत्कार !

### पुसद पत्रकार संघातर्फे ६ जानेवारी रोजी पत्रकार दिनाचे आयोजन

**जनमाध्यम प्रतिनिधी**





पुसद - लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचे मूल्य अधोरेखित करणारा मराठी पत्रकार दिन पुसद पत्रकार संघाच्या वतीने मंगळवार,६ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त ज्येष्ठ पत्रकार प्रदीप देशपांडे (संपादक जनमाध्यम, अमरावती) व अविनाश दुधे (संपादक, मीडिया वॉच) यांचा शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व मानचिन्ह देऊन हृद्य सत्कार करण्यात येणार आहे.

देशभक्त शंकरराव सरनाईक सार्वजनिक वाचनालयाच्या सुधाकर नाईक प्रेक्षागृहात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार निलय नाईक राहतील. विशेष अतिथी म्हणून नवनिर्वाचित नगराध्यक्ष मोहिनी इंद्रनील नाईक यांची उपस्थिती राहणार असून त्यांचाही पुसद पत्रकार संघाच्या वतीने सत्कार करण्यात येईल. या कार्यक्रमाला उपस्थित राहण्याचे आवाहन पुसद पत्रकार संघाचे अध्यक्ष ललित सेता, सचिव हरिप्रसाद विश्वकर्मा, उपाध्यक्ष अमोल व्हडगीरे, कोषाध्यक्ष रुपेंद्र अग्रवाल,सहसचिव ज्ञानेश्वर शिंदे तसेच कार्यकारीणी सदस्य प्रा. दिनकर गुल्हाने, रवि देशपांडे, अखिलेश अग्रवाल, अनिल चेंडकाळे,योगेश राजे, कैलास जगताप, राजु दुधे, गणेश राठोड यांनी केले आहे.

## दलित व आदिवासी शिक्षण संस्थेवरील बेकायदेशीर संचालक मंडळ बरखास्त

### सहाय्यक धर्मदाय आयुक्तांचा स्पष्ट आदेश ; मडावी गटाचा सर्व अधिकार संपुष्टात

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - तालुका बाभूळगाव येथील दलित व आदिवासी उद्धार शिक्षण प्रसारक मंडळ, मादनी या संस्थेवरील बेकायदेशीर संचालक मंडळ अखेर बरखास्त करण्यात आले असून, चंद्रशेखर दादाराव मडावी व त्यांच्या सहकाऱ्यांचा संस्थेवरील सर्व प्रकारचा कायदेशीर, प्रशासकीय व आर्थिक अधिकार संपुष्टात आल्याचा स्पष्ट आदेश सहाय्यक धर्मदाय आयुक्त, यवतमाळ यांनी दिला आहे.

सदर संस्थेच्या कारभाराबाबत गेल्या अनेक दिवसांपासून सहाय्यक धर्मदाय आयुक्त कार्यालयात विविध तक्रारी व प्रकरणे प्रलंबित होती. महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियमातील कलम ४१-डी अंतर्गत दिलेल्या आदेशांचे पालन न करता संचालक मंडळाने मनमानी व बेकायदेशीर कारभार केल्याचे सुनावणीत स्पष्ट झाले. विशेषतः चंद्रशेखर मडावी हे बेकायदेशीररित्या स्वतःला अध्यक्ष समजून संस्थेचा गैरवापर करीत असल्याचे गंभीर आरोप समोर आले. या पार्श्वभूमीवर संस्थेच्या सहसचिव जनाबाई बाबाराव राठोड यांनी दिनांक २९ जानेवारी २०२४ रोजी सहाय्यक धर्मदाय आयुक्तांकडे रीतसर अर्ज सादर करून जुने संचालक मंडळ बरखास्त करून नवीन संचालक मंडळाची परिशिष्ट-१ नोंद घेण्याची मागणी केली होती. या अर्जावरील सुनावणी पूर्ण झाल्यानंतर दिनांक १५ डिसेंबर २०२५ रोजी जुने संचालक मंडळ पूर्णतः बरखास्त करून नवीन संचालक मंडळाची नोंद घेण्याचे आदेश देण्यात आले. नवीन मंडळ नोंदणीसाठी ३० दिवसांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. दरम्यान, चंद्रशेखर मडावी यांच्याशी संस्थेच्या नावाने कोणताही आर्थिक व्यवहार, करार किंवा देणगी देऊ नये, असे आवाहन करण्यात आले आहे. तसेच मडावी यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार, वीजचोरी व अन्य गुन्ह्यांचे आरोप असून, त्याबाबत चौकशीचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले असल्याची माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली. या पत्रकार परिषदेस जनाबाई राठोड, धनराज राठोड, स्वप्निल निकुरे, देवयानी निकुरे व नीलिमा राठोड उपस्थित होते.

## महात्मा फुले दैनिक पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष मुडे तर सचिवपदी स्वप्निल मगरे !

**जनमाध्यम प्रतिनिधी**



उमरखेड - जन सामान्यांच्या विविध समस्या वृत्तपत्रातुन मांडून त्या समस्यांना वाचा फोडण्याचे महत्कार्य करणाऱ्या दैनिक महात्मा फुले पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी संतोष मुडे तर सचिवपदी स्वप्नील मगरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

तालुक्यातील जेष्ठ पत्रकार राजेश गांजेगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली ३१ डिसेंबर २५ रोजी शासकीय विश्रामगृह येथे पत्रकारांची बैठक घेण्यात आली. संघाच्या उपाध्यक्षपदी संभाजी भोयर , कोषाध्यक्षपदी प्रवीण सूर्यवंशी, सहसचिवपदी सुनिल ठाकरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यावेळेस संघाचे अध्यक्ष दत्तात्रय काळे, डॉक्टर अविनाश खंदारे , राजु गायकवाड, प्रा. प्रदिप इंगोले , शाहरूख पठाणआदि पत्रकार उपस्थित होते. सर्व सामान्यांच्या विविध प्रकारच्या समस्यांना प्राधान्य देत न्याय देण्याचा सातत्याने प्रयत्न करून , पत्रकारांना भेडसावणाऱ्या प्रश्नांना वाचा फोडून एकीचे दर्शन घडवण्याचा प्रयत्न करणार असल्याचे परखड मत नवनियुक्त अध्यक्ष संतोष मुडे यांनी व्यक्त केले.


### अमरावतीच्या अंबादेवी संस्थानास

# चिखलदरा येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची तीन एकर जमीन

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्यातील मौजे चिखलदरा येथील श्री. अंबादेवी संस्थान, अमरावती यांना महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाची ३ एकर ८ आर जमीन देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

चिखलदरा येथील सुमारे साडे सात एकर जमीन १९७५ मध्ये महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाला पर्यटकांसाठी मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी देण्यात आली होती. पण ही जमीन वापराविना पडून होती. दरम्यान, अमरावतीच्या



श्री अंबादेवी संस्थान यांनी चिखलदरा येथील देवी पॉईंट आणि विराट देवी देवस्थान यांच्या व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. या संस्थानाने या दोन्ही देवस्थानच्या विकासासाठी शासनाकडे जमिनीची मागणी केली आहे.

त्यानुसार पर्यटन विकास महामंडळाकडील सुमारे तीन एकर ८ आर जमीन शासन जमा करून घेऊन, ती श्री. अंबादेवी संस्थानास विनामुल्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ही जमीन मंदिर संस्थानाला भोगवटादार वर्ग – २ म्हणून मिळणार असून, जमीन केवळ धार्मिक प्रयोजनासाठी वापरता येणार आहे.

## सार्वत्रिक निवडणूक तयारीचा आयुक्तांकडून आढावा

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका क्षेत्रातील सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ शांततापूर्ण, पारदर्शक व नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाकडून सर्वंकष तयारी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी प्रत्येक प्रभागातील झोनल अधिकाऱ्यांची सविस्तर आढावा बैठक घेतली. या बैठकीत निवडणूकपूर्व, मतदानाच्या दिवशी व मतदानानंतरच्या सर्व तयारीचा सखोल आढावा घेण्यात आला. या बैठकीत अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, अधिकारी वर्ग, कर्मचारी उपस्थित होते.



मतदान केंद्रांवर मतदारांसाठी आवश्यक भौतिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले. ँश्इ अंतर्गत स्वच्छतागृहांची व्यवस्था, मतदारांसाठी वेटिंग रूम, मतदान केंद्राकडे जाण्यासाठी दिशा निर्देशक (अ्गेमूदह ँर्दे) तसेच मतदान केंद्र क्रमांक व नावाचे फलक (स्टिकर्स) लावण्याबाबत स्पष्ट सूचना करण्यात आल्या. मतदान केंद्रावर कार्यरत बी.एल.ओ. यांच्यासाठी बैठकांचे योग्य नियोजन करण्यावर भर देण्यात आला.

झोनल अधिकाऱ्यांच्या ईव्हीएम प्रशिक्षणाची माहिती घेण्यात आली असून पिंक बूथ व थीमॅटिक बूथ उभारणी, ट्रान्सपोर्टर प्लॅनची अंमलबजावणी, संवेदनशील मतदान केंद्रांकरिता मायक्रो ऑब्झर्व्हर नियुक्ती याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. दुबार मतदार तपासणी, मतदार पावती (वोटर स्लिप) वाटप व मतदार केंद्र यादी अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. दिव्यांग, ज्येष्ठ नागरिक, गरोदर महिला तसेच तान्ह्या बाळासह येणाऱ्या महिलांसाठी वाहन सुविधेची प्रभावी अंमलबजावणी करण्यास सांगण्यात आले.


बैठकीच्या शेवटी आयुक्तांनी सर्व झोनल अधिकाऱ्यांना निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून आपापल्या प्रभागात जबाबदारीने काम करण्याचे निर्देश दिले. अमरावती महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक २०२५–२६ यशस्वी व आदर्श पद्धतीने पार पाडण्याचा प्रशासनाचा निर्धार असल्याचे त्यांनी नमूद केले. मतदानाच्या दिवशी सकाळी ७.३० वाजण्यापूर्वी मॉक पोल घेणे बंधनकारक राहील. दर दोन तासांनी मतदानाचा अहवाल गुगल शीटद्वारे सादर करणे आवश्यक आहे. सायंकाळी ५.३० नंतर मतदान करणाऱ्या नागरिकांची स्वतंत्र नोंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले. मतदान पथक ज्या वाहनाने मतदान केंद्रावर जाईल, त्याच वाहनाने परत येणे बंधनकारक असून कोणतीही पोलींग पार्टी स्वतःच्या वाहनाने जाणार नाही. तसेच सर्व मतदान केंद्रातील कर्मचारी मतमोजणी केंद्रावर सुरक्षितपणे पोहोचल्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे

## निवडणुकीच्या रिंगणात सर्वाधिक ८७ उमेदवार









**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका निवडणुकीच्या शेवटच्या तारखेला उमेदवारी अर्जांचा पूर आला. भाजप, शिंदे सेना आणि काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांना एबी फॉर्म वाटण्यात आणि उमेदवारांना अंतिम रूप देण्यात अडचणी आल्या. अशा परिस्थितीतही, स्वतंत्रपणे निवडणूक लढवण्याचा इरादा जाहीर करणारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (अजित पवार गट) विजयी झाला. ८७ पैकी ८७ जागांवर अधिकृत उमेदवार उभे करून पक्षाने आपले इरादे स्पष्ट केले आहेत.

यानंतर काँग्रेस ७५ उमेदवार उभे करणार आहे. शिंदे सेनेने ७३, भाजपने ६९, शिवसेना (उभाथा) ४५ आणि युवा वायएसपीने ४१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. भाजपने महायुती आघाडीचा भाग असलेल्या युवा स्वाभिमानी पक्षासाठी सहा जागा सोडल्या आहेत, असे भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले. असे असूनही, युवा स्वाभिमानी पक्षाचे प्रमुख आमदार रवी राणा यांनी वायएसपीच्या वतीने ४१ उमेदवार उभे केले आहेत. यामध्ये माजी नगरसेवक आशिष गावंडे, माजी नगरसेविका सुमतीताई ढोके आणि माजी नगरसेविका सपना ठाकूर यांचा समावेश आहे.

महानगरपालिका निवडणुकीत युती, चर्चा आणि निष्फळ बैठकांचे चक्र सुरू असतानाही, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे आमदार संजय खोडके आणि आमदार सुलभा खोडके यांनी सुरुवातीपासूनच एकट्याने लढण्याचा निर्धार व्यक्त केला होता. या रणनीतीनुसार, त्यांनी नियोजन केले आणि सर्व ८७ जागांवर उमेदवार उभे केले, पहिल्या टप्प्यातच इतर राजकीय पक्षांना त्यांचे राजकीय कौशल्य दाखवून दिले.

## ग्रामपंचायत कर सवलतीची मुदतवाढीची मागणी

**बेलोरा/वार्ताहर**

राज्यात मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानांतर्गत घर आणि पाणी कर ५०% सवलतीची मुदतवाढ देण्याची मागणी गावागावातून करण्यात येत आहे. १७ नोव्हेंबर ते ३१ डिसेंबर दरम्यानच्या कालावधीत ग्रामपंचायत अंतर्गत घर व पाण्याच्या थकीत करामधे ५० ज्ञ सवलत देण्याची योजना राज्यसरकार द्वारा १३ नोव्हेंबर २०२५ च्या शासन निर्णयानुसार लागू करण्यात आली आहे. ही सवलत प्राप्त करण्यासाठी नागरिकांनी जोरदार पुढाकार घेतला आहे. ग्रामपंचायत कार्यालयात रोजच कराचा भरणा करण्यासाठी गर्दी दिसून येत असली तरी अजूनही केवळ ५०ज्ञ वसुली झाल्याचे निदर्शनास येते.

ग्रामीण भागातील अर्थकारण बव्हंशी शेतीशी निगडित आहे. अजून कपाशीचे पीक बऱ्यापैकी हाताशी नाही. तसेच मजूरांना पाहिजे तशी मजूरी मिळत नसल्याने आर्थिक तडजोड करण्यास अवकाश लागतो आहे, परिणामी इच्छा असूनही मुदतीत कर भरण्यासाठी पैसा हाताशी नसल्याने या योजनेला किमान एक महिना मुदतवाढ द्यावी अशी भावना सर्वत्र दिसून येत आहे. सदरी योजने अंतर्गत मार्च २०२५ पर्यंत घर व पाण्याच्या थकीत करामधे ५० ज्ञ सवलत आणि चालू वर्षाचा पुर्णतः कर भरल्यानंतरच ही सवलत घेता येते. त्यामुळे ही रक्कम मोठी असल्याने अनेकांना मुदतीत तडजोड करणे शक्य होत नाही. लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन ही मुदतवाढ एक महिना वाढवून द्यावी, अशी मागणी तात्यासाहेब मेश्राम माजी सभापती जिल्हा परिषद अमरावती यांनी केली आहे.

## बांगलादेशावर निर्बंध घालण्यासह कट्टरतावादी गटांवर कारवाईची मागणी

**अमरावती/का.प्र.**

बांगलादेशातील हिंदू दीपू चंद्रदास याची कट्टरतावादी जमावाने झाडाला बांधून जिवंत जाळून हत्या करणे, हिंदूंची घरे, दुकाने जाळणे पुन्हा चालू केले आहे. हिंदू जनजागृती समिती हिंदूविरोधी हिंसाचाराचा तीव्र निषेध करत पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह तसेच बांगलादेश उच्चायुक्त यांना कारवाई करण्यासाठीचे निवेदन जिल्हधिकारी आशिष येरेकर यांना सादर केले.

यात सततचे हिंदूविरोधी हिंसाचार थांबवण्या साठी भारत सरकारने बांगलादेशावर आर्थिक, व्यापारिक व राजनैतिक निर्बंध घालावेत. तसेच बांगलादेशातील दहशतवादी व कट्टरतावादी घटकांविरुद्ध कठोर कारवाई करावी, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.



बांगलादेशातील प्रमुख युवा नेता शरीफ उस्मान हादी यांच्यावर ढाका येथे गोळीबार झाला. त्यांच्या मृत्यूनंतर हिंदू समाजाविरुद्ध सुनियोजित हिंसाचार सुरू झाला आहे. अनेक ठिकाणी हिंदूंची घरे व मंदिरांना लक्ष्य केले जात आहे. याचे प्रत्यक्ष व्हिडिओ, साक्षी व आंतरराष्ट्रीय प्रसिद्धीमाध्यमांतून उघड झालेले सत्य आहे. तरीही बांगलादेश सरकार कारवाईत टाळाटाळ करत आहे. निवेदनात भारत-बांगलादेश कराराद्वारे अल्पसंख्याकांच्या धार्मिक स्वातंत्र्याचे संरक्षण, संयुक्त राष्ट्र व मानवाधिकार आयोगावर मुद्दा उपस्थित करून फॅक्ट-फाइंडिंग मिशनची मागणी, छळग्रस्त हिंदूंना नागरिकत्व व पुनर्वास धोरण, मंदिरे व धार्मिक संपत्तीचे संयुक्त सर्वेक्षण, बांगलादेशातील हिंदू समाजाशी थेट संवाद यंत्रणा उभारण्यासारख्या मागण्या करण्यात आल्या आहेत. भारत हा जगातील सर्वांत मोठा हिंदूबहुल देश असल्याने बांगलादेशातील हिंदूंच्या सुरक्षिततेसाठी राजनैतिक, कायदेशीर व आंतरराष्ट्रीय प्रयत्न करावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदन देताना पुंजाराम नेमाडे, श्रीकांत पिसोळकर, प्रदीप गर्गे, अमोल पवार, राजेश चौरासिया, रंजना पांडे, क्षत्रिय ब्राह्मण समाज समिती महिला मंडळ पदाधिकारी उपस्थीत होते.

## आर्थिक दुर्बल घटकांसाठी राज्य शासनाची स्मार्ट सौर योजना

### १ किलोवॅट सौर प्रकल्पावर ९५ टक्के पर्यंत अनुदान

**अमरावती/का.प्र.**

राज्यातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, दारिद्र्यरेषेखालील कुटुंबे आणि अल्प वीज वापर करणाऱ्या नागरिकांसाठी राज्य शासनाने 'स्मार्ट' सौर योजना सुरू केली असून, या योजनेमुळे गरीब कुटुंबांना वीजबिलातून मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे परिमंडळातील पात्र ग्राहकांनी लाभ घेण्याचे आवाहन मुख्य अभियंता अशोक साळुंके यांनी केले आहे.

महावितरणमार्फत राबविण्यात येत असलेल्या या योजनेत शून्य ते १०० युनिट वीज वापर करणाऱ्या पात्र वीज ग्राहकांच्या घरांच्या छतावर १ किलोवॅट क्षमतेचा सौर प्रकल्प बसवण्यात येणार आहे. त्यासाठी प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनाबरोबरच राज्य शासनाच्या स्मार्ट योजनेत अतिरिक्त अनुदान देण्याचे प्रावधान करण्यात आले आहे. त्यामुळे सौर प्रकल्पाचा ८० ते ९५ % खर्च शासन उचलणार असून लाभार्थ्यांना केवळ अत्यल्प रक्कम भरावी लागणार आहे. विशेषतः प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेतलेल्या कुटुंबांना या योजनेचा थेट फायदा होणार आहे.

राज्य शासनाने या योजनेद्वारे आर्थिकदृष्या दुर्बल, दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाला घराच्या छतावर सोलार रूप टॉप यंत्रणा बसविण्यासाठी प्रोत्साहित करून त्यांना वीजेबाबत स्वंयपूर्ण बनविणे, तसेच अतिरिक्त निर्माण होणाऱ्या विजेतून आर्थिक स्त्रोत निर्माण करण्यासोबत पर्यावरण पुरक वीज निर्मिती करणे आहे.

आर्थिकदृष्या दुर्बल व दारिद्र्य रेषेखालील कुटूंबाचे जीवनमान उंचावणे हा योजनेचा मुख्य उद्देश असून या योजनेतील लाभार्थ्यांना प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेतील प्रति किलोवॅट ३० हजार रूपयाच्या अनुदानासोबत राज्यशासनाच्या स्मार्ट योजनेत अतिरिक्त अनुदानाचे प्रावधान करण्यात आले आहे. या योजनेत लाभार्थी ग्राहकांच्या छतावर १ किलो वॅट क्षमतेचे सौर पॅनेल बसविण्यात येणार आहे.

त्यामुळे प्रति किलोवॅट क्षमतेची आधारभूत किंमत ५० हजार इतकी गृहित धरल्यास, दारिद्र्य रेषेखालील ग्राहकाला लाभार्थी हिस्सा म्हणून केवळ २ हजार ५०० रूपये भरायचे आहे. उर्वरित ९५% रक्कमेला केंद्र आणि राज्य शासनाकडून अनुदान देण्यात आले आहे. अनुसूचित जाती/ जमाती प्रवर्गातील ग्राहकाला ९० % अनुदान देण्यात आले असून लाभार्थी हिस्सा म्हणून केवळ ५ हजार रूपये भरावे लागणार आहे, त्याचबरोबर सर्वसाधारण प्रवर्गातील आर्थिक दुर्बल कुटूंबाला ८० % अनुदान असून लाभार्थी हिस्सा म्हणून त्यांना फक्त १० हजार रूपये भरावे लागणार आहे.

स्मार्ट योजनेचा लाभार्थी होण्यासाठी पात्र वीज ग्राहकांना राष्ट्रीय पोर्टलवर नोंदणी करणे बंधनकारक आहे. पीएम सुर्यघर मुफ्त बिजली योजना या नॅशनल पोर्टलसाठी https://consumer.pmsuryaghar.gov.in/consumer/#/login महावितरणच्या i-SMART पोर्टलसाठी असलेल्या https://css.mahadiscom.in/UI/ROOFTOP/PVNewApplication.aspx ही लिंक वापरून नोंदणी करता येते.

वीज ग्राहकाकडे वैध वीज जोडणी आवश्यक असून वीज ग्राहकाकडे थकीत वीज बिल नसावे. याशिवाय वीज ग्राहकाने याअगोदर सौर यंत्रणा आस्थापित करण्यासाठी कोणत्याही अनुदानाचा लाभ घेतलेला नसावा.

## संक्षिप्त

### मयुरी बदरके विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत

**अमरावती-** पीपल्स वेलफेअर सोसायटी द्वारा संचालित परतवाडा येथील यादवरावदादा देशमुख विधी महाविद्यालयाची तीन वर्षीय विधी अभ्यासक्रमाची विद्यार्थिनी मयुरी दुर्योधन बदरके हिने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत उल्लेखनीय स्थान मिळवले आहे. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेशकुमार बुधराज श्रीवास यांच्यासह प्राध्यापक मंडळी, ॲड मंगेश हरणे, अक्षदा अग्रवाल, डॉ. स्वाती वानखडे, राजेंद्र अस्वार, शबाना मोहम्मद, अजय वानखडे, श्रद्धा मिश्रा, रूपाली काळे, वैशाली अडगोकार (नाथे), पूनम केदार, छाया बूंदे, नूतन भीड़कर, ग्रंथपाल अंजू चव्हाण आणि शिक्षकेतर कर्मचारी मिलिंद वैद्य, चेतन पारवे, घनश्याम खडसे तसेच मातृ संस्थेच्या, पीपल्स वेल्फेअर सोसायटी, अमरावतीच्या अध्यक्षा, माजी मंत्री मा. वसुधाताई देशमुख, सचिव प्रा. अभयदादा देशमुख आणि संस्थेचे प्रशासकीय संचालक प्राचार्य सु.ना. उपाख्य जीवनराव देशमुख यांनी मयूरी आणि तिच्या आईवडीलांचे हृदयपूर्वक अभिनंदन केले आहे.

### विद्यापीठाच्या हिवाळी- २०२५ लेखी परीक्षांचे सुधारित वेळापत्रक जाहीर

**अमरावती**-संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या हिवाळी - २०२५ सर्व लेखी परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहेत. सदर वेळापत्रकातील बी.कॉम. एल.एल.बी. सेमि.-१ (फाईव्ह इयर्स टेन सेमिस्टर्स इंटीग्रेटेड कोर्स) आणि ॲडव्हान्स डिप्लोमा इन कौन्सिलिंग ॲन्ड सायकोथेरेपी सेमि.-१, २ व ३ (एन.ई.पी.) या परीक्षांच्या वेळापत्रकात दुरुस्ती/सुधारित/नवीन वेळापत्रक जाहीर करण्यात येत असून विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाकडून कळविण्यात येत आहे.यासंदर्भात सर्व प्राचार्य, केंद्राधिकारी, संबंधित महाविद्यालये, परीक्षा केंद्र यांना पत्राव्दारे परीक्षा विभागाकडून कळविण्यात आले असून, संबंधितांनी याची सर्व विद्यार्थ्यांना जाणीव करुन द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनी केले आहे. अधिक माहितीकरीता विद्यापीठाच्या वेबसाईटवर परीक्षा विभागाच्या अधिका-यांच्या क्रमांकावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कळविण्यात येत आहे.

### ५ ते ७ जानेवारी दरम्यान राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

**अमरावती-** सन २०२५-२६ या वर्षातील आदिवासी विकास विभागाच्या शासकीय, अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धाचे आयोजन अपर आयुक्त आदिवासी विकास अमरावती विभागामार्फत करण्यात येणार आहे. ही क्रीडा स्पर्धा ५, ६ व ७ जानेवारी २०२६ या कालावधीत श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती येथे आयोजित करण्यात येणार आहे. या संदर्भात या कार्यालयाच्या स्तरावरून विविध समित्या गठीत करण्यात आल्या असल्याची माहिती आदिवासी विकास विभागाचे अपर आयुक्त जितेंद्र चौधरी यांनी दिली आहे.

### डिंगाबर कुंभलकर यांचे निधन



**अंजनगाव बारी -** येथील जेष्ठ नागरिक डिंगाबर यशवंतराव कुंभलकार ( रा.चाळी चौक, माळी पुरा) अंजनगाव बारी यांचे वयाच्या ७० व्या वर्षी यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी व बराचसा आप्त परिवार आहे.

### नरसम्मा महाविद्यालयात ए. आय. चे महत्व या विषयावर कार्यशाळा

**अमरावती -**श्रीमती नरसम्मा कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, किरण नगर अमरावती येथे महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी अध्ययन, अध्यापन व संशोधनामध्ये एआय चे महत्व या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा झाली. या कार्यशाळेला संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे डॉ. सुहास पाचपांडे यांनी उपस्थित सर्व प्राध्यापकांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेश चंदनपाट, संशोधन समिती प्रमुख आशिष मालधुरे, सदस्य डॉ. दिनेशकुमार सातंगे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. चंद्रशेखर सावरकर हे कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी व्यासपीठावर उपस्थित होते.

### पदभार स्वीकारण्याआधीच

## नांदगावच्या नगराध्यक्षा ॲक्शन मोडवर

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ प्राप्ति मारोटकर व नगरसेवकांनी पदभार स्वीकारण्या आधीच ॲक्शन मोडवर येऊन नगरपंचायत कार्यालयात सकाळी १०.३० वाजताच धडक दिली व झाडाझडती घेतली त्यामुळे न.पं. कर्मचाऱ्यांत धास्ती निर्माण झाली आहे.

नवनिर्वाचित नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी नगरपंचायत कार्यालयात सकाळी अचानक धडक देऊन कार्यालयाची पाहणी केली यावेळी मुख्याधिकारी सुट्टीवर असल्याने न.पं. कार्यालयातील अनेक कर्मचारी विनापरवानगी गैरहजर आढळून आले ने उपस्थित कर्मचाऱ्यांना खडे बोल सुनावण्यात आले लाखो रुपये खर्च करून कचऱ्याचे डम्पिंग ग्राउंड निर्माण केले मात्र सदर डम्पिंग ग्राउंड पूर्णपणे अस्तव्यस्थ झाले आहे यावेळी आधुनिक पद्धतीने कचऱ्याची विल्हेवाट करण्याचे निर्देश दिले तसेच नांदगाव शहराला पाणीपुरवठा करणारे जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली यावेळी पाणी स्वच्छ होत नसल्याची बाब निर्देशनांस आली व जलशुद्धीकरण च्या काही मशिनरी बंद असल्याच्या धक्कादायक बाब उघडकीस आली केंद्रावरील काही मशिनरसदर जल शुद्धीकरण केंद्रात योग्य त्या सुधारणा करण्याचे निर्देश दिले पाणी पुरवठा, स्वच्छता, आरोग्य इत्यादी विभागाचा मुख्याधिकाऱ्यांच्या गैरहजेरीतच आढावा घेण्यात आला बस स्थानक परिसरातील शौचालयाची दुर्गंधी पाहून नगराध्यक्षा प्राप्ती मारोटकर यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना चांगले धारेवर धरत चांगलीच कानउघाडणी केली यावेळी नगरसेवक प्रकाश मारोटकर, प्रीती इखार, कांता लोमटे, वसुदेव लोखंडे, राष्ट्रवादीचे मो.साजिद इत्यादी उपस्थित होते.

# पश्चिम विदर्भात २०२५ मध्ये विक्रमी २ हजारावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**यवतमाळ**-२०२५ मध्ये पश्चिम विदर्भात २००१ पासुन पहिल्यांदाच विक्रमी २००९ नापिकी ग्रस्त व कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केली असून ही जागतिक स्तरावर शेतकऱ्यांच्या नरसंहाराची सर्वात मोठी घटना आहे. भाजप सरकार,प्रशासकीय यंत्रणा तसेच सर्वच राजकीय पक्ष मौन आहे. संपुर्ण २०२५ वर्ष केवळ लोकसभा, विधानसभा,स्थानीय स्वराज्य संस्था यांच्या निवडणुकीच्या धामधुमीत गेला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी आश्वासनाचा पाऊस पाडला.मात्र, शेतकरी




आत्महत्या हा गंभीर विषय हवेत विरला अशी खंत शेतकरी आत्महत्या व कृषी संकट या गंभीर विषयावर कार्य करणारे कार्यकर्ते किशोर तिवारी व्यक्त केली .

## सरकारच्या चुकीच्या कृषी धोरणाचे बळी -किशोर तिवारी

**शेतकऱ्यांच्या आत्महत्यांची कारणे**

पश्चिम विदर्भात शेतकरी आत्महत्याग्रस्त भागात जुन्या बेरार वा वऱ्हाड चे यवतमाळ ,अमरावती ,अकोला ,वाशीम ,बुलढाणा येतात. प्रशासकीय रित्या पूर्व विदर्भाचा वर्धा जिल्हा येतो.बहितेक सर्व क्षेत्रात कोरडवाहू शेती करण्यात येते.पश्चिम विदर्भात ४५ टक्के क्षेत्रात कापूस घेण्यात येतो तर ४० टक्के क्षेत्रात सोयाबीन व उरलेल्या क्षेत्रात विविध डाळ ,ज्वारी घेण्यात येते. यावर्षी ३ जून पासुन १२ नोव्हेंबर पर्यंत सतत पावसाने कहर केला. सरकारने दोन वेळा नुकसान भरपाई दिली.मात्र, त्यामुळे कृषी संकट कमी झाले नाही. याला फक्त ५० टक्के बँका मार्फत पीककर्ज वाटप ,सावकारांच्या व मायक्रो फायनान्स बचत गटा मार्फत लूट ,लागवडीचा खर्च दुप्पट झाल्यामुळे कर्जाचे अनियंत्रित ओझे त्यातच संपुर्ण सोयाबीन नापिकी,कापसाचे ४० टक्के आलेले पीक,तुरीच्या पिकाची नापिकी हि प्रमुख कारणे असुन सरकारची मदत तटपुंजी असल्यामुळे कृषी संकटात भरच पडली आहे .

**यवतमाळ जिल्हा शेतकरी आत्महत्या मध्ये आघाडीवर**

२०२५ मध्ये यवतमाळ जिल्ह्यात विक्रमी ४४६ आत्महत्या झाल्या आहे. त्या पाठोपाठ अमरावती ३९६ ,अकोला ३८८,बुलढाणा ३४३, वर्धा २२४ तर वाशीम जिल्ह्यात २१२ शेतकऱ्यांच्या आत्महत्या झाल्या. यामध्ये युवा शेतकरी ,भाड्याने शेती करणारे शेतकरी यांच्या नावाने सातबारा नाही.म्हणून सरकार दरबारी या आत्महत्यांची नोंद नाही. मत्त्याने म्हणजे भाड्याने शेती करणारे शेतमजुरांची संख्या प्रत्येक खेड्यात ५० टक्के आह. यांना सरकारी पीककर्ज तसेच सरकारची नुकसान भरपाई मिळत नाही वरून शेतीचे भाडे नापिकी झाली तरी देणे अटळ आहे. यामुळे सातबारा नसणाऱ्या शेतकऱ्यांच्या आत्महत्या यावर्षी प्रचंड वाढल्या आहेत.कारण ते खाजगी सावकार,मायक्रो फायनान्स कंपन्या गावागावात सुरु झालेल्या राजकीय नेत्यांच्या नागरी पत संस्था आघाडी वर आहे. या गंभीर विषयावर बोलण्यास सरकार,प्रशासकीय यंत्रणा तसेच सर्वच राजकीय पक्ष बोलण्यास तयार नाहीत. २०२५ मध्ये झालेल्या विक्रमी शेतकरी आत्महत्या आहे. सरकारने पत पुरवडा ,बियाणे सुधार ,पीक पद्धतीत बदल तसेच लागवड खर्च ५० टक्क्यांनी कमी करणे ,हमीभावावर राज्याने बोनस घोषित करणे ह्या उपाय योजना केल्या नाहीतर २०२६ मध्ये कृषी संकट व शेतकरी आत्महत्या प्रचंड प्रमाणात वाढतील अशी भीती किशोर तिवारी यांनी व्यक्त केली आहे.

## नववर्षाची पहाट

नववर्षाची पहाट झाली ।
सुख समृद्धी घेऊन आली ।।

मागील वर्षा उत्तम घेऊ ।
दुःख विसरुनी आनंदे न्हाऊ ।।

शिखरावरूनी ऊंच भरारी ।
प्रगतिची वाजवू तुतारी ।।

नवे स्वप्न अन् नव्या दिशा ह्या ।
पुष्प सुगंधी नवे फुलवू या ।।

शेती फुलवू, बागा फुलवू ।
धनधान्याने समृद्ध होऊ ।।

आनंद घेऊ, आनंद देऊ ।
आनंदगीत हे, सुरेल गाऊ ।।

नवे संशोधन विचार उजळू ।
देशभक्तीचा गुलाल उधळू ।।

भारतदेशाचे गुण गाऊ ।
सत्यसत्व गुण जनमन रमवू ।।

'स्वरचैतन्य' डॉ. मिलिंद इंदूरकर,नागपूर
मो. ९५५२६०७६४६

## जिल्ह्यात शेतकरी आत्महत्यांचा आलेख वाढताच

**अमरावती/का.प्र.**

शासन-प्रशासन गंभीर नसल्याने जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या थांबलेल्या नाहीत. वर्षभरात २०० वर शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास आवळला. यावर नियंत्रण मिळविण्यास शेतकरी स्वावलंबी मिशनदेखील कुचकामी ठरले आहे. त्यामुळे हे सर्व शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटाचे बळी ठरले आहेत.

जिल्ह्यात यंदा ११ महिन्यांत तब्बल १८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले. नैसर्गिक आपत्ती, नापिकी, बँकांसह सावकाराचे कर्ज वसुलीसाठी तगादा, मुलीचे लग्न, आजारपण यासह अन्य कारणांमुळे जिल्ह्यात शेतकरी आत्महत्या होत आहे. सत्ता कोणाचीही असली तरी



जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्यांचे सत्र अडीच दशकात थांबलेले नाही, किंबहुना यामध्ये वाढ होत आहे. वर्ष २००१ पासून शेतकरी आत्महत्यांची नोंद शासनस्तरावरून घेतली जाते. त्यानुसार अमरावती जिल्ह्यांत ५,५५७ शेतकऱ्यांनी मृत्यूचा फास ओढला आहे. शासन-प्रशासन शेतकरी आत्महत्या विषयात गंभीर नसल्याने शेतकरी आत्महत्यांमध्ये वाढ होताना दिसत आहे. शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने कै. वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबन मिशनाची स्थापना केली. मात्र, मिशनद्वारा ठोस उपाययोजना नसल्याने शेतकरी आत्महत्यांवर नियंत्रण मिळालेले नाही.

**दोन दशकांपासून शासन मदतीत वाढ नाही**

शेतकरी आत्महत्याग्रस्त परिवारास १९ डिसेंबर २००५ च्या शासनादेशानुसार फक्त एक लाखाची मदत दिली जाते. यात ३० हजारांचा धनाकर्ष, तर ७० हजारांची मुदत ठेव तहसीलदार व वारस यांच्या संयुक्त नावे ठेवली जाते. या मदतीमध्ये तब्बल २० वर्षांत शासनाने वाढ केलेली नाही. सात-बारावरील बोजा कायम असल्याने त्यांना कोणताही लाभ मिळत नाही.

**२०२५ मधील शेतकरी आत्महत्या**

जिल्ह्यात यंदाच्या ११ महिन्यांत तब्बल १८१ शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले आहे. यामध्ये जानेवारी महिन्यात ११, फेब्रुवारी १०, मार्च १६, एप्रिल १६, मे २५, जून २०, जुलै १६, ऑगस्ट २१, सप्टेंबर १७, ऑक्टोबर १७ व नोव्हेंबर महिन्यात १२ शेतकरी आत्महत्या झालेल्या आहेत. यापैकी ४९ प्रकरणे पात्र, ४० अपात्र, तर २२ प्रकरणे चौकशीसाठी प्रलंबित आहेत.

## जि.प. व पं.स. निवडणुकीसाठी बडनेरा मतदार संघात भाजपकडून मोर्चाबांधणीला प्रारंभ



**अंजनगाव बारी/वार्ताहर**

भाजपने बडनेरा मतदार संघातील अंजनगाव बारी सर्कल मध्ये कंबर कसली आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूकीची नामांकनाची जबाबदारी बडनेरा मंडळ अध्यक्ष विलास राठोड यांच्याकडे देण्यात आली आहे.

जिल्हा परिषदसाठी सोपान मुळे, विलास राठोड पंचायत समितीसाठी निखिल पोकळे, झनकार नवखरे ,गुणवंत शेलोकर ,प्रेम निचत, गौरव गुलालकारी, मनोज पुनसे यांना नामांकन देण्यात आले.यावेळी मंडळ अध्यक्ष विलास राठोड, महिला मोर्चा आधाडी दिपाली मलवार, संदिप राठोड, सरचिटणीस सोपान मुळे, माध्यम प्रमुख शैलेश पोकळे, ओबीसी मोर्चा अध्यक्ष मुकंदराज होळकर, निखिल पोकळे, मनोज इंगोले, मिथून अंबडकार, राजू पोकळे, गुणवंत शेलोकार , झनकार नवखरे, गौरव गुलालकरी उपस्थित होते.

## हर्षदा गडकरी यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश

**अमरावती/का.प्र.**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री - नामदार अजितदादा पवार यांच्या नेतृत्व व मार्गदर्शनात सामान्य माणसाच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे काम राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने अविरतपणे केल्या जात आहे.राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेशाला घेऊन अनेकांची रिघ लागल्याचे चित्र अमरावती मध्ये दिसून येत आहे. अशातच प्रभाग क्रमांक - १९ साईनगर - अकोली भागातील रहिवासी हर्षदा हेमंत गडकरी यांनी आ.सुलभा खोडके



यांच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला.

यावेळी आ. सुलभा खोडके यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा दुपट्टा देऊन त्यांचे पक्ष प्रवेश क्षणी स्वागत केले. शून्यातून विश्व निर्माण करताना अनेकांनी लहानमोठ्या प्रसंगाला सामोरे जावून आपले ध्येय गाठले आहे. अशाच फळीतील सहकारी मित्रांना सोबत ठेवून लोकसेवेच्या आपल्या ध्येयाकडे चालताना आपण आज आमदार- सौ. सुलभाताई खोडकेंच्या नेतृत्वात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश घेतला आहे.या शब्दांत नवप्रवेशित हर्षदा हेमंत गडकरी यांनी आपल्या भावना व्यक्त केल्यात. याप्रसंगी यश सुलभा संजय खोडके यांच्यासमवेत ज्योती ठेले, स्वाती कहाळे,मंजित देशमुख, विनोद चिखलकर, संतोष कहाळे, अक्षित सावला, जितेंद्रसिंह ठाकूर, शक्ती तिडके, मनीष देशमुख, पंकज बहाळे आदिसह अन्य कार्यकर्ते व पदाधिकारी तसेच राष्ट्रवादी परिवार सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते.

## स्वीप उपक्रमांतर्गत मतदान जनजागृती

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्याच्या दृष्टीने महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली शहरात सर्वत्र प्रभावी मतदान जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकशाही बळकटीकरणासाठी प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावावा, या उद्देशाने स्वीप उपक्रमांतर्गत विविध नाविन्यपूर्ण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे.

या उपक्रमाचा एक भाग म्हणून अमरावती शहरातील विविध मैदानांवर



सकाळी व संध्याकाळी व्यायाम करणारे नागरिक, खेळाडू व तरुण यांना मतदानाबाबत जागरूक करण्यात येत आहे. यावेळी उपस्थितांना मतदानाची शपथ देण्यात येत असून मतदान का आवश्यक आहे, लोकशाही व्यवस्थेत मतदाराची भूमिका किती महत्त्वाची आहे, तसेच प्रत्येक पात्र नागरिकाने कोणत्याही दबावाशिवाय, निर्भयपणे मतदान केले पाहिजे, याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येत आहे.स्वीप उपक्रमांतर्गत पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर नुकताच विशेष मतदान जनजागृती कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमात उपस्थित खेळाडू व तरुणांना मतदानाची शपथ देण्यात आली. 'मी आगामी अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीत निश्चितपणे मतदान करीन व इतरांनाही मतदानासाठी प्रेरित करीन,' असा संकल्प यावेळी सहभागी नागरिकांनी केला.

# भीमा कोरेगाव शौर्य दिन: सामाजिक समतेच्या संघर्षाची प्रेरणागाथा

भारतीय समाजाच्या इतिहासात काही घटना केवळ लष्करी विजय किंवा पराभव म्हणून मर्यादित राहत नाहीत, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या, आत्मसन्मानाच्या आणि समानतेच्या संघर्षाचे प्रतीक बनतात. १ जानेवारी रोजी साजरा होणारा 'भीमा कोरेगाव शौर्यदिन' ही अशीच एक ऐतिहासिक घटना आहे. १८१८ साली भीमा नदीच्या काठावर घडलेली भीमा कोरेगावची लढाई ही केवळ इंग्रज आणि पेशवाई यांच्यातील संघर्ष नव्हता, तर तो तत्कालीन सामाजिक विषमतेविरुद्ध उभा राहिलेल्या शोषित, वंचित आणि उपेक्षित समाजघटकांच्या आत्मसन्मानाचा लढा होता. म्हणूनच हा दिवस केवळ इतिहासातील एक पान नसून, आजही सामाजिक समतेच्या संघर्षाला दिशा देणारा प्रेरणास्तंभ आहे.

पेशवाईच्या काळात भारतीय समाजावर कडव्या जातिव्यवस्थेचे जाचक ओझे होते. विशेषतः महार, मांग, चांभार यांसारख्या दलित समाजघटकांवर अमानवी निर्बंध लादले गेले होते. सार्वजनिक विहिरी, मंदिरे, शिक्षण, प्रतिष्ठा आणि मानवी हक्क यांपासून त्यांना दूर ठेवण्यात आले होते. अशा स्थितीत पेशवाईविरोधात उभे ठाकलेले महार समाजातील सैनिक इंग्रज सैन्यात सहभागी झाले आणि त्यांनी भीमा कोरेगावच्या रणांगणावर पराक्रम गाजवला. संख्येने कमी असूनही त्यांनी पेशव्यांच्या बलाढ्य सैन्याला रोखले. या विजयाने दलित समाजाला केवळ लष्करी यश मिळाले नाही, तर त्यांनी सामाजिक अपमानाच्या इतिहासाला छेद दिला.

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, भीमा कोरेगावची लढाई ही सत्ता, जात आणि प्रतिष्ठा यांच्यातील संघर्षाचे प्रतीक आहे. तत्कालीन सामाजिक रचना ही सत्ताधारी उच्चवर्णीयांच्या बाजूने झुकलेली होती. पेशवाई ही केवळ राजकीय सत्ता नव्हती, तर ती धार्मिक-सामाजिक वर्चस्वाचीही प्रातिनिधी होती. अशा व्यवस्थेविरुद्ध उभा राहणे म्हणजे केवळ युद्ध जिंकणे नव्हे, तर सामाजिक मानसिकतेला आव्हान देणे होते. महार सैनिकांनी हे आव्हान स्वीकारले आणि इतिहासात आपले नाव कोरले.

या घटनेचे महत्त्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ओळखले. त्यांनी १ जानेवारी १९२७ रोजी भीमा कोरेगाव येथील विजयस्तंभाला मानवंदना दिली. त्या दिवसापासून भीमा कोरेगाव शौर्यदिनाला सामाजिक चळवळीचे स्वरूप प्राप्त झाले. डॉ. आंबेडकरांसाठी हा विजय ब्रिटिशांच्या बाजूने मिळालेला लष्करी यश नव्हता, तर तो अस्पृश्यतेविरुद्ध उभ्या राहिलेल्या आत्मसन्मानाचा विजय होता. त्यांनी या घटनेचा उपयोग दलित समाजात स्वाभिमान, संघटन आणि संघर्षाची चेतना निर्माण करण्यासाठी केला.

भीमा कोरेगाव शौर्यदिनाचे समाजशास्त्रीय महत्त्व समजून घेताना स्मृती-राजकारण (Politics of Memory) या संकल्पनेचा विचार करणे आवश्यक आहे. कोणता इतिहास सांगितला जातो, कोणता दडपला जातो आणि कोणाच्या स्मृती जपल्या जातात, यावर समाजाची दिशा ठरते. पारंपरिक इतिहास लेखनात दलित, स्त्रिया आणि वंचित समाजघटकांचे योगदान दुर्लक्षित राहिले. भीमा कोरेगावची आठवण ही या दुर्लक्षित इतिहासाला केंद्रस्थानी आणणारी आहे. म्हणूनच हा दिवस केवळ भूतकाळाची आठवण नाही, तर इतिहास पुन्हा मांडण्याचा सामाजिक प्रयत्न आहे.



आज भीमा कोरेगाव शौर्यदिन मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो. देशभरातून लाखो लोक या ठिकाणी एकत्र येतात. ही केवळ श्रद्धांजली नसून, ती एक सामाजिक जाणीव आहे. या एकत्र येण्यामागे समानतेची आकांक्षा, संविधानिक मूल्यांची निष्ठा आणि अन्यायाविरुद्धचा आवाज दडलेला आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, हा मेळावा 'सामूहिक ओळख' (Collective Identity) निर्माण करतो. जात, वर्ग, प्रदेश यापलीकडे जाऊन लोक एकमेकांशी जोडले जातात.

मात्र, भीमा कोरेगाव शौर्यदिनाच्या संदर्भात उद्भवणारे वाद आणि संघर्षही समाजशास्त्रीय विश्लेषणाची मागणी करतात. काही घटकांना हा दिवस अस्वस्थ करतो, कारण तो पारंपरिक सत्तासंरचनांना प्रश्न विचारतो. इतिहासाचे वेगवेगळे अर्थ लावले जातात आणि स्मृतींवर अधिकार मिळवण्यासाठी संघर्ष होतो. या पार्श्वभूमीवर, समाजात संवाद, समज आणि सहअस्तित्वाची गरज अधोरेखित होते. भीमा कोरेगावची प्रेरणा संघर्षाची असली, तरी तो संघर्ष मानवी मूल्यांसाठी आहे, द्वेषासाठी नव्हे.

आजच्या काळात, जेव्हा संविधानिक मूल्ये, सामाजिक समता आणि लोकशाहीवर विविध प्रकारचे आव्हाने येत आहेत, तेव्हा भीमा कोरेगाव शौर्यदिन अधिकच महत्त्वाचा ठरतो. हा दिवस आपल्याला सांगतो की अधिकार सहज मिळत नाहीत; त्यासाठी संघटित संघर्ष करावा लागतो. दलित समाजाचा हा इतिहास केवळ एका समाजापुरता मर्यादित नाही, तर तो संपूर्ण भारतीय लोकशाहीच्या प्रवासाचा भाग आहे.

शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि सामाजिक प्रतिष्ठा या क्षेत्रांत आजही असमानता दिसून येते. भीमा कोरेगावची आठवण ही या असमानतेविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देते. समाजशास्त्रीय दृष्टीने, हा दिवस सामाजिक गतिशीलतेचा संदेश देतो. इतिहासात दडपल्या गेलेल्या समाजघटकांनी शिक्षण, चळवळ आणि संविधानाच्या माध्यमातून आपले स्थान बदलू शकते, हे भीमा कोरेगावचे प्रतीक आहे.

म्हणूनच, भीमा कोरेगाव शौर्यदिन साजरा करताना केवळ भूतकाळाचा गौरव न करता वर्तमान आणि भविष्याचा विचार करणे आवश्यक आहे. जातीय द्वेष, सामाजिक बहिष्कार आणि असमानता यांना नकार देत, समतेवर आधारित समाज उभारण्याचा संकल्प करण्याची ही वेळ आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेल्या संविधानिक मूल्यांच्या चौकटीत राहून, लोकशाही मार्गाने संघर्ष करण्याची प्रेरणा भीमा कोरेगाव आपल्याला देते.

अखेरीस असे म्हणता येईल की, भीमा कोरेगाव शौर्य दिन हा केवळ एका लढाईचा स्मृतिदिन नाही, तर तो सामाजिक न्यायाच्या दीर्घ संघर्षाचा प्रतीकात्मक उत्सव आहे. हा दिवस आपल्याला इतिहासातून शिकवतो की, अन्याय कितीही खोल रुजलेला असला, तरी संघटित इच्छाशक्ती, आत्मसन्मान आणि समानतेची जाणीव त्याला आव्हान देऊ शकते. म्हणूनच १ जानेवारी हा दिवस शौर्याचा, स्वाभिमानाचा आणि सामाजिक परिवर्तनाच्या अखंड प्रवासाचा साक्षीदार ठरतो.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# ऑपरेशन 'प्रहार' अंतर्गत जुगार अड्ड्यांवर धडक कारवाई

## बोरगाव मंजूत दोन ठिकाणी रेड; ११ आरोपी ताब्यात, १.११ लाखांचा मुद्देमाल जप्त

■ प्रतिनिधी | अकोला ■

*पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार राबविण्यात येत असलेल्या ऑपरेशन 'प्रहार' अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखा, अकोला यांनी बोरगाव मंजू पोलीस ठाणे हद्दीत दोन वेगवेगळ्या ठिकाणी जुगार अड्ड्यांवर छापे टाकून मोठी कारवाई केली. या कारवाईत एकूण ११ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून १ लाख ११ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.*



पहिली कारवाई ग्राम दहीगाव गावंडे येथे पुरुषोत्तम गावंडे यांच्या शेतालगत काट्याच्या झाडाखालील खुल्या सार्वजनिक ठिकाणी करण्यात आली. गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वरली मटक्यावर पैशांची हार-जीत लावून जुगार खेळणाऱ्या इसमांवर छापा टाकला. यामध्ये ९ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून एक आरोपी फरार आहे. या ठिकाणाहून रोख रक्कम ८,०५० रुपये, ५ मोबाईल फोन (अंदाजे ५० हजार), ९ कॅल्क्युलेटर, वरली मटक्याच्या चिठ्ठ्या व पुस्तके असा एकूण ५८,९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

दुसरी कारवाई बोरगाव मंजू बस स्टँड चौक येथे करण्यात आली. येथे 'फन एशिया' या वेबसाईटच्या माध्यमातून एलसीडी/एलईडी टीव्ही स्क्रीनवर ० ते ९ आकड्यांवर पैशांची हार-जीत लावून जुगार खेळविला जात असल्याची माहिती मिळाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने छापा टाकला. या प्रकरणात २ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून मुख्य मालक फरार आहे. या ठिकाणाहून ५,५३० रुपये रोख, मोठी एलसीडी/एलईडी टीव्ही स्क्रीन, सीपीयू, की-बोर्ड, माऊस व इतर साहित्य असा ५३,५३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील दोन्ही प्रकरणांमध्ये महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम कलम ४ व ५ अन्वये गुन्हे दाखल करण्यात आले असून पुढील कारवाई पोलीस ठाणे बोरगाव मंजू येथे सुरू आहे. ही संपूर्ण कारवाई अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, पोलीस निरीक्षक शंकर शेळके (स्थानिक गुन्हे शाखा) यांच्या मार्गदर्शनाखाली पीएसआय गोपाळ जाधव, जीपीएसआय दशरथ बोरकर, तसेच स्थानिक गुन्हे शाखेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी यशस्वीपणे पार पाडली.

# अंतर्गत गटबाजीचा घाव; शिंदेसेनेत शहरप्रमुखाचा बळी!

## मनपा निवडणुकीच्या तोंडावर शिवसेनेची घरची भांडणे उघडी

■ प्रतिनिधी | अकोला ■

मनपा निवडणुकीच्या रणधुमाळीत शिंदे गटातील शिवसेनेची घरातील आग आता चव्हाट्यावर आली आहे. अंतर्गत गटबाजीचा फटका थेट पक्षाच्या शहरप्रमुखांनाच बसला असून, रमेश गायकवाड यांचा राजकीय काटा काढण्यात आल्याने पक्षांतर्गत अस्वस्थता टोकाला पोहोचली आहे.



गेल्या अनेक महिन्यांपासून प्रभागनिहाय बांधणी, कार्यकर्त्यांचे जाळे आणि निवडणूक रणनीती आखणारे रमेश गायकवाड यांना अर्ज भरण्याच्या ऐन पूर्वसंध्येला डावलण्यात आले. विशेष म्हणजे कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांचे तिकीट कापून एका विशिष्ट गुजराती समाजाच्या व्यक्तीला संधी देण्यात आल्याने, 'जातीय समीकरण' हा फक्त दिखावा असून प्रत्यक्षात अंतर्गत सत्तासंघर्षच कारणीभूत असल्याची जोरदार चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे. पक्षासाठी रात्रंदिवस काम करणाऱ्या शहरप्रमुखालाच बाजूला सारले जात असेल, तर सामान्य कार्यकर्त्यांचे भवितव्य काय? असा सवाल आता उघडपणे विचारला जात आहे. एकीकडे शिंदेसेना शिस्त आणि संघटन यांची भाषा करत असताना, दुसरीकडे मात्र तिकीट वाटपात गटबाजी, लॉबी आणि व्यक्तिगत स्वार्थ वरचढ ठरत असल्याचे या घटनेतून स्पष्ट झाले आहे. या निर्णयामुळे पक्षातील मराठी कार्यकर्त्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, 'संघटना मजबूत करण्याऐवजी स्वकीयांचीच कत्तल' केल्याचा आरोप होत आहे. मनपा निवडणुकीच्या तोंडावर उघड झालेली ही फाटाफूट शिंदेसेनेला किती महागात पडणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# रस्त्याची चाळणी : दुरुस्तीकडे प्रशासनाचा कानाडोळा



## चान्नी–सुकळी फाटा मार्ग खड्डेमय; प्रवाशांचे हाल

**चान्नी परिसरातील सुमारे ४० गावांतील ग्रामस्थांसाठी अकोला, बाळापुर, पातूर आदी शहरांकडे जाण्यासाठी चान्नी–सुकळी फाटा हा मुख्य मार्ग आहे. मात्र या रस्त्याची अवस्था अत्यंत दयनीय झाल्याने दररोज अपघात घडत आहेत. शाळकरी मुलांसह प्रवाशांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असून, रस्त्याची तातडीने दुरुस्ती करण्याची जोरदार मागणी होत आहे.**

■ प्रतिनिधी | खेट्री ■

सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत पातूर तालुक्यातील चान्नी ते सुकळी फाटा हा अत्यंत महत्त्वाचा मुख्य रस्ता सध्या अक्षरशः खड्ड्यांची चाळणी बनला आहे. ठिकठिकाणी खोल खड्डे पडल्याने या मार्गावरून प्रवास करताना वाहनचालकांना जीव मुठीत घेऊन वाट काढावी लागत असून, अपघातांचा धोका कमालीचा वाढला आहे.

या रस्त्यावरून दररोज शाळकरी विद्यार्थी, शेतकरी, कामगार तसेच व्यापारी मोठ्या संख्येने ये-जा करतात. मात्र रस्त्याची दुरवस्था इतकी भीषण झाली आहे की, दुचाकीस्वारांसह चारचाकी वाहनचालकांचेही हाल होत आहेत. खड्डे चुकवताना अनेक वेळा किरकोळ अपघात घडत असून, गंभीर दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्थानिक नागरिकांनी याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वारंवार तक्रारी करूनही प्रत्यक्ष दुरुस्तीला अद्याप सुरुवात झालेली नाही. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. वेळेत रस्ता दुरुस्ती न झाल्यास मोठा अपघात होण्याची भीती ग्रामस्थांकडून व्यक्त केली जात आहे.

# शिर्ला ग्रामपंचायतीच्या विकासकामांवर भ्रष्टाचाराचे आरोप

## एक कोटींच्या खर्चाची चौकशीची मागणी ; बीडीओंकडे लेखी तक्रार

■ प्रतिनिधी | खेट्री ■



पातूर पंचायत समिती अंतर्गत शिर्ला ग्रामपंचायत हद्दीत करण्यात आलेल्या शासकीय विकासकामांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार व अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकरणी शेख शकील यांच्यासह ग्रामस्थांनी २९ डिसेंबर रोजी पातूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करून सखोल चौकशीची मागणी केली आहे.

तक्रारीनुसार, शिर्ला ग्रामपंचायत अंतर्गत बादशहा नगर येथे चांद अहमद मशिद समोरील सुमारे ७८ फूट रस्त्याच्या कामासाठी लाखो रुपयांचा खर्च दाखविण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात हा रस्ता निकृष्ट दर्जाचा असून काम अद्याप अपूर्ण अवस्थेत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

याचप्रमाणे रेणुका नगर व ज्येष्ठ नागरिक संघ परिसरात पाण्याच्या बोरिंगसाठी मोठ्या प्रमाणावर निधी खर्च करण्यात आल्याचे दाखविले असले, तरी बादशहा नगर, समी प्लॉट, दुल्हा प्लॉट व जमदार प्लॉट या मुस्लिम वस्तीच्या भागांना या योजनेतून वगळण्यात आल्याचा आरोप आहे. परिणामी या भागात तीव्र पाणीटंचाईला नागरिकांना सामोरे जावे लागत आहे.

स्वच्छता मोहिमेच्याही कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. स्वच्छता मोहीम केवळ कागदोपत्रीच सुरू असून नाल्यांची नियमित साफसफाई होत नसल्याने परिसरात अस्वच्छता पसरली असून ग्रामस्थांच्या आरोग्याला धोका निर्माण झाला आहे.

एप्रिल २०२४ ते मार्च २०२५ या कालावधीत जवळपास एक कोटी रुपयांचा खर्च झाल्याचा उल्लेख तक्रारीत करण्यात आला आहे. या सर्व कामांची प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून चौकशी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे.

# किड्स पॅराडाईजच्या विद्यार्थ्यांनी साकारला इको फ्रेंडली फ्रिज

■ प्रतिनिधी | पातूर ■

महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभाग व विज्ञान मंडळ यांच्या वतीने दोन दिवसीय तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शन नुकतेच पार पडले. यामध्ये पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल च्या विद्यार्थ्यांनी साकारलेली इको फ्रेंडली फ्रिज ची प्रतिकृती तालुक्यातून प्रथम आली आहे. प्रतिकृती सकरणारे शाफे खान शोएब खान आणि ओम जाधव हे विद्यार्थी पातूर तालुक्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

पातूर तालुक्यातील चोंढी येथिल महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालय येथे ही विज्ञान प्रदर्शनी पार पडली. या दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शनात तालुक्यातील प्राथमिक गटातील ३३ तर माध्यमिक गटातील ३० अशा एकूण ६३ प्रतिकृतींनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांनी दिलेल्या विषयांवर आधारित विविध वैज्ञानिक प्रयोग, मॉडेल्स व उपयुक्त संकल्पना प्रभावीपणे सादर केल्या. यामध्ये



## जिल्हास्तरावर करणार पातूर तालुक्याचे प्रतिनिधित्व

प्राथमिक गटातून पातूरच्या किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूल च्या शाफे खान शोएब खान व ओम जाधव या विद्यार्थ्यांनी बाजी मारत प्राथमिक गटातून प्रथम क्रमांक पटकवला आहे. या विद्यार्थ्यांचा विज्ञान अध्यापक मंडळाचे जिल्हा अध्यक्ष रवींद्र भास्कर, तालुका अध्यक्ष सुनील वावगे यांनी पारितोषिक देऊन सन्मान केला. विद्यार्थ्यांचा शाळेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे व कार्यकारी संचालिका सौ. ज्योत्स्ना गाडगे यांनी सत्कार केला. यावेळी विज्ञान शिक्षक हरिष सौंदळे व रेश्मा शेंडे उपस्थित होते.

# विकलांगता निर्मूलन मोहिमेचे प्रणेते मणियार यांचा सत्कार

**अकोला :** विकलांग व्यक्तींना आत्मनिर्भर बनविण्यासाठी आकि. रामेश्वर मणियार यांनी हाती घेतलेली मोहीम सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तीसाठी प्रेरणादायी आहे असे गौरवोद्गार विभागीय आयुक्त श्रीमती डॉ श्वेता सिंघल यांनी काढले. स्व. पंजाबराव देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्त पीडीएमएमसी, शिवाजी शिक्षण संस्था, रेडक्रॉस सोसायटी अकोला, आकि. रामेश्वर मणियार व अंबादास खोब्रागडे फाउंडेशन यांच्या माध्यमातून विक्रमी ११११ जयपूर फूट वितरणाचे लक्ष गाठल्याबद्दल विकलांगता निर्मूलन मोहिमेचे प्रणेते मणियार यांचा अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्रीमती डॉ श्वेता सिंघल यांनी अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयात सत्कार केला.

## जाहीर नोटीस

सर्वत्र लोकांना सूचित करण्यात येते की, आमचे पक्षकार निखील रविंद्र नाळे व अक्षय राजेंद्र नाळे यांनी मौजे देगांव ता. बाळापूर जि. अकोला येथील गट नं. ११४, एकुण क्षेत्रफळ १ हे. ७९ आर. पैकी ०.७० आर. श्री दिलीप ज्ञानदेव गावंडे यांच्या मालकीचे शेत ज्याच्या चर्तुः सिमा : पूर्वेस बाबुराव गुलाबराव पिंपळे यांचे शेत, पश्चिमेस - देगांव ते व्याळा रोड, उत्तरेस - अंबादास एकनाथ पोटे यांचे शेत, दक्षिणेस - गोपाळ माणिकराव शेगोकार व इतर यांचे शेत तसेच भानुदास रामदास शेगोकार व नारायण रामदास शेगोकार यांचे शेत. ह्या वर्णनाची शेती त्या वरील असलेले झाडा झुडपांसह विकत घेण्याचा सौदा कायम केलेला आहे. तरी कोणालही वरील मालमत्तेबाबत काहीही आक्षेप, कोणताही गहाणखत, बोजा, खरेदीखत अथवा कुठलाही उजर असेल तर त्यांनी ७ दिवसाच्या आत लेखी कागदपत्र व पुराव्यासह हरकत नोंदवावी अन्यथा कोणालाही काही आक्षेप नाही असे समजून आमचे पक्षकार खरेदी करुन घेतील. तद्नंतर आलेल्या कुठल्याही हरकतीला, आक्षेपाला व कसल्याही उजराला कायदेशीर अधिष्ठान राहणार नाही करिता प्रस्तुतची नोटीस दिली आहे. करिता ही जाहीर नोटीस.

अकोला
दि. ०१/०१/२०२६

पक्षकार तर्फे अधिवक्ता
ॲड. राजेश उर्फ विजयकुमार जाधव
न्यु. व्हि. एच. बी. कॉलनी, गौरक्षण रोड,
अकोला ता. जि. अकोला
मो. ९४२२१६३१८४

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक ३५**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# प्रामाणिकपणाचा आदर्श : पत्रकार स्वप्निल सरकटेंनी सापडलेला मोबाईल मालकाला केला परत



■ प्रतिनिधी | अकोट ■

शहरात आजही प्रामाणिकपणा जिवंत असल्याचा प्रत्यय देणारी घटना नुकतीच घडली. अकोट येथील पत्रकार स्वप्निल सरकटे यांनी रस्त्यावर सापडलेला मोबाईल फोन प्रामाणिकपणे त्याच्या मूळ मालकापर्यंत पोहोचवून समाजासमोर एक सकारात्मक आदर्श निर्माण केला आहे.

अकोट–अकोला रोडवरील उगवा फाट्यादरम्यान पत्रकार स्वप्निल सरकटे यांना एक महागडा मोबाईल फोन सापडला. या मोबाईलमध्ये महत्त्वाची वैयक्तिक माहिती, संपर्क क्रमांक, फोटो तसेच बँकिंग अ?प्स असण्याची शक्यता होती. आजच्या धावपळीच्या काळात अशा वेळी अनेक जण मोहाला बळी पडतात; मात्र स्वप्निल सरकटे यांनी तत्काळ प्रामाणिकपणाचा मार्ग स्वीकारला.

मोबाईल सुरू करून त्यातील संपर्क क्रमांकांच्या आधारे त्यांनी मालकाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला. काही वेळातच मोबाईलचा मूळ मालक शोधण्यात यश आले. योग्य खात्री करून ग्रामीण पोलिसांच्या माध्यमातून मोबाईल सुरक्षितपणे मालकाच्या ताब्यात देण्यात आला. हरवलेला मोबाईल परत मिळाल्याने संबंधित मालकाने पत्रकार स्वप्निल सरकटे यांचे मनापासून आभार मानले. पत्रकारिता ही केवळ बातम्या देण्यापुरती मर्यादित नसून समाजासाठी आदर्श निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहे, हे या घटनेतून पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. स्वप्निल सरकटे यांच्या या प्रामाणिक कृतीचे अकोट परिसरात सर्वत्र कौतुक होत असून युवकांसाठी हा प्रेरणादायी संदेश ठरत आहे.

# रब्बी हंगाम ई पीक पाहणी

**अकोला :** रब्बी हंगाम ई पीक पाहणीची सुरुवात झाली आहे. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी २४ जानेवारी २०२६ पूर्वी आपल्या पिकांची नोंदणी करून घेण्यात यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा निमा यांनी केले आहे. त्यासाठी ७/१२ वर पीक पेरा स्वतः शेतकरी यांनी अँड्रॉइड फोनव्दारे नोंदणी करायचा आहे. शेतकरी स्तरावर पिक पाहणी करण्यासाठीचा शेवटची तारीख २४ जानेवारी आहे.

**आतापर्यंत अत्यल्प नोंदणी :** रब्बी हंगाम २०२५ ई पिक पाहणी डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत एकूण ३ लक्ष ८१ हजार ७१४ पिक पाहणी करावयाच्या क्षेत्रापैकी पिक पाहणीत ३.३४ टक्के इतकीच नोंदणी झाली आहे. अकोला जिल्ह्यात डिजिटल क्रॉप सर्वे अंतर्गत ई पीक पाहणीची नोंदणी १५ हजार ७७६.४३ क्षेत्रावर झालेली आहे. क्षेत्रावर सर्व बांधवांना ई पीक पाहणी ॲपव्दारे पीकांची नोंदणी करण्याचे आवाहन करण्यात आले. नोंदणी ई पीक पाहणी व्हर्जन ४.०.५ या मोबाईल ॲपव्दारे करतांना अँड्रॉइड फोन आवश्यक आहे. सदर ॲप गुगल क्रोम अपडेट करून मोबाईल मध्ये इन्स्टॉल करून घ्यावे.

# झोपडपट्टीच्या विकासाकडे ४० वर्षांपासून दुर्लक्ष

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातूर तालुक्यातील ग्राम पंचायत चतारी अंतर्गत येणारी झोपडपट्टी गेल्या चार दशकांपासून शासनाच्या मूलभूत विकास योजनांपासून वंचित असल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. रस्ते, पाणीपुरवठा, स्वच्छता व पथदिवे यांसारख्या अत्यावश्यक सुविधा आजतागायत झोपडपट्टीपर्यंत पोहोचलेल्या नाहीत.

येथील रस्ते डांबरीकरण अथवा काँक्रिटीकरणाविना असून पावसाळ्यात चिखल व सांडपाण्यामुळे नागरिकांना प्रचंड त्रास सहन करावा लागतो. विद्यार्थ्यांना शाळेत जाणे कठीण होत आहे. उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाई भासते, मात्र ग्राम पंचायतीचे नळपाणी किंवा पर्यायी व्यवस्था उपलब्ध नाही.



पातूर तालुक्यातील चतारी येथील चित्र

दरवर्षी ग्राम पंचायतीला मोठ्या प्रमाणात निधी मिळत असतानाही झोपडपट्टीसाठी कोणताही ठोस विकास आराखडा राबविला जात नसल्याचा आरोप आहे. आरटीआय कार्यकर्ता मंगेश रमेश सदार यांनी प्रशासनावर टीका करत तात्काळ सुविधा न दिल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे.

# आरोग्य विभागातर्फे धूम्रपानविरोधी दिनाचा उपक्रम

**अकोला :** सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे १ जानेवारी रोजी धूम्रपानविरोधी दिन उपक्रम राबविण्यात येईल. नवीन वर्षाच्या सुरुवातीला नागरिकांनी तंबाखूमुक्त जीवनाचा संकल्प करावा, या उद्देशाने हा दिवस प्रतीकात्मक स्वरूपात पाळला जातो. तंबाखूच्या सेवनामुळे होणाऱ्या गंभीर धोक्यांबाबत जनजागृती करणे आणि लोकांना धूम्रपान व तंबाखूचे सेवन सोडण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम राबविण्यात येईल. धुम्रपान किंवा तंबाखूच्या सेवनामुळे तोंड, फुफ्फुसे, घसा, अन्ननलिका, स्वादुपिंड व मूत्राशयाचा कर्करोग, हृदयविकार, स्ट्रोक, सीओपीडी, दमा, मधुमेह, दंतविकार तसेच रोगप्रतिकारशक्ती कमी होण्याचा धोका वाढतो.

तंबाखूमध्ये असलेले निकोटीन, टार व कार्बन मोनोऑक्साइड हे घटक शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा कमी करून पेशींना नुकसान पोहोचवतात.



# आळंद्यात शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद; कोरडवाहू शेतीतील प्रयोगांना दिग्दर्शकांची दाद

■ प्रतिनिधी | अकोला ■

केंद्रीय कोरडवाहू कृषी अनुसंधान संस्थान, हैदराबादचे संचालक डॉ. व्ही. के. सिंघ यांच्या उपस्थितीत तालुका बार्शीटाकळीतील आळंदा येथे शेतकरी–शास्त्रज्ञ संवादात्मक चर्चा कार्यक्रम उत्साहात पार पडला. डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली कोरडवाहू शेती संशोधन व कृषी हवामानशास्त्र प्रकल्पांतर्गत हा उपक्रम राबविण्यात आला.

कोरडवाहू शेती संशोधनाचा आढावा घेण्यासाठी डॉ. सिंघ यांनी अकोला जिल्ह्याला भेट दिली होती. त्यांच्या समवेत डॉ. जे. व्ही. एन. एस. प्रसाद (प्रकल्प समन्वयक, हैदराबाद) तसेच डॉ. एस. एस. माने (संशोधन संचालक, डॉ. पं. दे. कृ. वि., अकोला) उपस्थित होते. यावेळी वरखेड (ता. बार्शीटाकळी) येथे राष्ट्रीय हवामान संवेदनक्षम शेतीवर आधारित 'राष्ट्रीय अभिनव प्रकल्प' (NICRA) अंतर्गत लाभार्थी शेतकऱ्यांच्या प्रक्षेत्रांना त्यांनी भेट दिली. बिबिएफ व शेततळे, आंतरपीक पद्धती, जल व मृद संधारण तंत्रज्ञानाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे शेतकऱ्यांना झालेल्या लाभाबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. आळंदा येथे कार्यान्वित असलेल्या कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धती (RIFS) प्रकल्पातील प्रात्यक्षिकांनाही संचालकांनी भेट दिली. या निमित्ताने आयोजित शेतकरी–शास्त्रज्ञ संवाद कार्यक्रमात डॉ. एस. एस. माने, डॉ. अनिता चोरे, डॉ. राजेश पातोडे, डॉ. अरविंद तुपे, डॉ. एम. एम. गणवीर, कु. संध्या करवा यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी, कर्मचारी तसेच आळंदा व परिसरातील शेतकरी व महिलांची मोठी उपस्थिती होती. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. अनिता चोरे यांनी केली. डॉ. व्ही. के. सिंघ यांनी कोरडवाहू एकात्मिक शेती पद्धतीचे महत्त्व विशद करत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी शेतकऱ्यांनी RIFS व कृषी हवामान सल्ल्यामुळे आर्थिक नुकसान कसे टळले, याबाबत अनुभव कथन केले. डॉ. एस. एस. माने यांनी कोरडवाहू शेती संशोधनातील उपक्रमांबाबत मार्गदर्शन करत आळंद्यातील प्रकल्प यशस्वीरीत्या राबविल्याबद्दल समाधान व्यक्त केले. डॉ. अरविंद तुपे यांनी NICRA प्रकल्पाची माहिती दिली.

दुसऱ्या दिवशी डॉ. सिंघ यांनी कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पातील विविध प्रयोग, आंतरपीक पद्धती, जल–मृद संधारण, आकस्मिक पीक व्यवस्थापन, कोरडवाहू फळपिके तसेच सोयाबीन, मूग, उडीद, तूर आदी पिकांवरील संशोधनाचे अवलोकन केले. तसेच 'अॅग्रोटेक–२०२५' राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात प्रमुख अतिथी म्हणून शेतकऱ्यांना संबोधित केले. कोरडवाहू शेतीतील संशोधन व प्रकल्प यशस्वीपणे राबविल्याबद्दल त्यांनी शास्त्रज्ञ, अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कोरडवाहू शेती संशोधन प्रकल्पातील कर्मचारी तसेच आळंदा–वरखेड येथील ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

# पक्षद्रोह्यांना राजरोस अभयदान

## भाजपमध्ये उघडी बंडखोरी, शिस्तीचा फज्जा; नेतृत्व गप्प, कार्यकर्त्यांचा संताप आगीसारखा भडकला

**वर्धा/ रवींद्र लाखे**

नगरपरिषद निवडणुकांनंतर वर्ध्यात राजकीय वातावरण चांगलेच तापले असून, पक्षाच्या विरोधात काम करणाऱ्या कार्यकर्त्यांवर अद्याप कोणतीही कारवाई न झाल्याने भाजपमध्ये प्रचंड असंतोष उसळला आहे.

शिस्त, निष्ठा आणि संघटनात्मक ताकदीचा गवगवा करणाऱ्या भारतीय जनता पार्टीमध्येच आज पक्षद्रोह्यांना मोकळे रान दिले जात असल्याचा आरोप होत आहे. पक्षविरोधात उघडपणे काम करूनही कुणाचं काहीच बिघडवत नाही, मग शिस्त फक्त भाषणांपुरतीच का, असा प्रश्न आता कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक विचारत आहेत.हल्ली झालेल्या नगरपरिषद निवडणुकीत भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या अधिकृत उमेदवाराचा पराभव घडवून आणण्यात स्वतः भाजपच्या सक्रिय कार्यकर्त्यांचीच निर्णायक भूमिका होती, हे कुणापासून लपलेले नाही. प्रचारापासून ते मतदानापर्यंत आणि निकालानंतरही या पक्षविरोधी कारवायांची चर्चा सर्वत्र रंगली. तरीही, एवढा गंभीर प्रकार घडूनही संबंधित कार्यकर्त्यांवर अद्याप एकही कठोर शिस्तभंगाची कारवाई न झाल्याने पक्षाची प्रतिमा धुळीस मिळाल्याचे चित्र आहे.



**वरिष्ठांचा दबाव की स्थानिक नेत्यांची कमजोरी**

आता पक्षांतर्गत कुजबुज थांबून थेट आरोप सुरू झाले आहेत.कारवाई होत नाही कारण वरिष्ठ नेत्यांचा दबाव आहे का?, स्थानिक नेते या बंडखोरांच्या दबावाखाली वावरत आहेत ?, की मग नेतृत्वाची इच्छाशक्तीच संपली आहे, असे अनेक प्रश्न उघडपणे विचारले जात आहेत.कमल कुलधरिया, हरीश टावरी, प्रशांत बुरले, वरून पाठक, पवन परियाल यांच्यासह अनेक भाजपच्या सक्रिय कार्यकर्त्यांनी पक्षाच्या विरोधात काम केल्याचे आरोप जगजाहीर असतानाही पक्षाने जणू डोळ्यांवर काळी पट्टी बांधली आहे. यामुळे वर्षानुवर्षे निष्ठेने काम करणारे कार्यकर्ते प्रचंड संतप्त झाले आहेत.

**आज कारवाई नाही, उद्या पुन्हा गद्दारी**

पक्षातील नाराज गटाचा इशारा स्पष्ट आणि थेट आहे. आज बंडखोरीवर कठोर पावले उचलली नाहीत, तर येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत हाच इतिहास पुन्हा घडणार. आमचं काहीच कोणी बिघडवत नाही, असे म्हणत २७-२८ सक्रिय कार्यकर्ते पुन्हा भाजपविरोधात काम करतील, अशी उघड चर्चा सुरू आहे. ही केवळ धमकी नाही, तर पक्षाच्या भवितव्याला दिलेली धोक्याची घंटा आहे.

**पराभवाचं बक्षीस?**

या सगळ्यावर कडी म्हणजे, भाजपचे नगराध्यक्ष पदाचे पराभूत उमेदवार निलेश किटे यांना को-ऑप्शन सदस्य म्हणून पुन्हा संधी मिळणार असल्याची जोरदार चर्चा आहे. पराभव, पक्षद्रोह आणि त्यावर पदाचं बक्षीस हा प्रकार पाहून सामान्य कार्यकर्त्यांचा संताप शिगेला पोहोचला आहे. मग निष्ठा, मेहनत आणि प्रामाणिकपणाला काहीच किंमत नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

**भाजपची विश्वासार्हता पणाला**

एकीकडे शिस्तीचे गोडवे गाणारा पक्ष, तर दुसरीकडे पक्षद्रोह्यांना संरक्षण या दुटप्पी भूमिकेमुळे भाजपची संघटनात्मक विश्वासार्हता गंभीर संकटात सापडली आहे.आता प्रश्न एकच आहे. नेतृत्व कठोर निर्णय घेऊन शिस्त प्रस्थापित करणार की बंडखोरीपुढे पुन्हा नतमस्तक होणार, वर्ध्यातील भाजपचं भवितव्य याच उत्तरावर ठरणार आहे.

# सेलू शहरात 'मोकाट' दुचाकींचा धुमाकूळ

## विना परवाना, भरधाव वेग, कर्कश सायलेंसर

### अपघात होईपर्यंत पोलीस झोपेतच राहणार का ?

**सेलू/ अभय बेदमोहता**

सेलू शहरात सध्या बेताल, बेदरकार आणि जीवघेण्या पद्धतीने वाहने चालविणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून, शहरातील रस्ते अक्षरशः मृत्यूचे सापळे बनत चालले आहेत. शाळा, महाविद्यालये व खासगी शिकवणीसाठी जाणारे अल्पवयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या वेगाने दुचाकी वाहने पळवित असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येत आहे. धक्कादायक बाब म्हणजे यातील बहुतांश जणांकडे वाहन चालविण्याचा परवाना नसूनही त्यांच्यावर कोणाचाच धाक उरलेला नाही.

पूर्वी केवळ तरुण मुलेच नव्हे तर आता मुली व महिलाही शहरातील मुख्य रस्त्यांवर भरधाव वेगाने दुचाकी चालविताना दिसत आहेत. बस स्थानक, मुख्य बाजारपेठ, मेडिकल चौक, को-ऑप. बँक परिसर या ठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी अतिक्रमण, दुकानदारांनी वाटेल तसे उभे केलेले वाहनांचे रांगेत रांगेत पार्किंग आणि त्यातच सुसाट धावणाऱ्या दुचाकी या सगळ्यामुळे वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे.को-ऑप. बँकेपर्यंत बंद नाल्यांवर पसरलेले अतिक्रमण आणि त्यावर उभी राहणारी वाहने यामुळे रस्ते अरुंद झाले आहेत. याच मार्गावरून राज्य परिवहनच्या बसेस, जड वाहने, चारचाकी व दुचाकी वाहनांची दिवसभर मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. परिणामी, पायी चालणारे नागरिक, लहान मुले, महिला व ज्येष्ठ नागरिक यांचे जीव कायम धोक्यात आहेत.भरधाव वेगात दुचाकी पळवत, सायलेंसरमध्ये बदल करून कर्कश 'बॉम्ब'सारखे कर्कस आवाज काढत काही तरुण शहरभर विनाकारण चकरा मारत आहेत. या 'शायनिंग'मुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, अपघातांची शक्यता दिवसेंदिवस वाढत चालली आहे. अनेक पालक अल्पवयीन मुलांच्या हाती दुचाकी देत असल्याने परिस्थिती अधिकच गंभीर बनली आहे. काही ठिकाणी तर अल्पवयीन मुलांकडे चारचाकी वाहनेही दिसून येत आहेत.इतक्या गंभीर स्थिती असूनही सेलू पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष नागरिकांमध्ये संताप निर्माण करत आहे. अपघात झाल्यावरच कारवाई करणार का असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. विना परवाना वाहनचालक, अल्पवयीन चालक, भरधाव वेग, ध्वनीप्रदूषण करणारे सायलेंसर आणि अतिक्रमणामुळे वाहतूक अडवणाऱ्यांवर तातडीने कडक कारवाई करावी, अशी जोरदार मागणी होत आहे.

वेळीच कठोर पावले उचलली नाहीत, तर भविष्यात मोठा अनर्थ घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. सेलू शहरातील वाहतूक शिस्त लावण्यासाठी पोलिसांनी विशेष मोहीम राबवावी आणि दोषींवर दंडात्मक कारवाई करावी, अशी स्पष्ट मागणी नागरिक करत आहेत.

# बाजार समितीचा काळा कारभार उघड

## शेतकऱ्यांच्या हक्कांवर घाला अधिकारी-व्यापारी संगनमताचा संशय

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांच्या हितासाठी असावी, अशी अपेक्षा असताना प्रत्यक्षात मात्र ती व्यापाऱ्यांची सोय आणि शेतकऱ्यांची गैरसोय ठरत असल्याचे विदारक चित्र समोर येत आहे. नियम, कायदे आणि शिस्त यांना केराची टोपली दाखवत बाजार समितीचा कारभार सुरू असून, याकडे प्रशासन जाणीवपूर्वक डोळेझाक करीत आहे का, असा प्रश्न शेतकरी वर्गातून उपस्थित होत आहे.



बाजार समितीच्या आवारात बिनधास्तपणे मोठमोठी होलसेल भाजी विक्रीची दुकाने थाटण्यात आली आहेत. अनेक दुकानदारांकडे अधिकृत लायसन्स नसतानाही ते राजरोसपणे होलसेल व्यवसाय करीत आहेत. कोणाच्या आशीर्वादाने हा धंदा? असा प्रश्न आता उघडपणे विचारला जात आहे. अतिक्रमण करून भाजीविक्रेत्यांना मोठ्या दुकाने लावून बसले असून, यामुळे बाजार समितीची मूळ रचना आणि उद्देशच धुळीस मिळाला आहे.कोरोना काळात तात्पुरत्या स्वरूपात स्थलांतरित करण्यात आलेली भाजी मंडी आजही तिथेच कायम आहे. परिणामी, धान्य घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. रस्त्यावर उभी वाहने, रस्त्यावरच दुकाने आणि बाजारात होणारी गर्दी यामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. आपलेच धान्य विकण्यासाठी आलेल्या शेतकऱ्यांना तासन्तास ताटकळत ठेवले जाते, ही बाब संतापजनक आहे. शेतकऱ्यांच्या धान्यासाठी उभारण्यात आलेल्या शेडमध्ये मात्र शेतकऱ्यांचा माल नाही, तर व्यापाऱ्यांचा साठा वर्षानुवर्षे पडून असल्याचा गंभीर आरोप आहे. धक्कादायक म्हणजे या व्यापाऱ्यांकडून कोणताही अधिकृत किराया घेतला जात नाही. मग हा साठा इतक्या वर्षांपासून कसा काय ठेवला जातो? यामागे हप्तेबाजी तर नाही ना, असा संशय बळावत आहे. जर हप्ते घेतले जात नसतील, तर प्रशासन गप्प का, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत.दुसरीकडे, बाजार समितीतील डेली व विशेष वेतनावर काम करणारे कर्मचारीही अन्यायाला बळी पडले आहेत. अनेक वर्षांपासून तुटपुंज्या वेतनावर काम करूनही पगारवाढ दिली जात नाही. आवाज उठविला तर कामावरून काढू अशी धमकी दिली जाते, असा गंभीर आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे.शेतकरी, कर्मचारी आणि छोटे विक्रेते भरडले जात असताना, काही व्यापाऱ्यांची मात्र चांदी सुरू असल्याचे चित्र आहे. हा बाजार समितीचा कारभार नेमका कोणासाठी, असा प्रश्न आता जनतेतून होत आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी लढा उभारला नाही, तर हा अन्याय अधिकच वाढणार, अशी तीव्र भावना वर्ध्यात व्यक्त होत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की शेतकऱ्यांचा आवाज पुन्हा दाबला जाणार, हाच खरा प्रश्न आहे.

# कोटंबा येथे रोगनिदान व आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला प्रतिसाद

**सेलू/ जनमाध्यम**

कोटंबा गावात ग्रामपंचायत कोटंबा, हेल्प सामाजिक संस्था आणि महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालय, सालोड यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोगनिदान व आयुर्वेदिक चिकित्सा शिबिराला ग्रामस्थांचा उस्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिराचा सुमारे २०० ते ३०० नागरिकांनी लाभ घेतला.

शिबिरामध्ये दमा, पोटाचे आजार, डोळ्यांचे विकार, दंतविकार, वातरोग यांसह सुमारे १५ प्रकारच्या आजारांवर तपासणी करून योग्य मार्गदर्शन करण्यात आले. तसेच अंगणवाडी व शाळेतील विद्यार्थ्यांचीही आरोग्य तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार आवश्यक औषधींचे वाटप करण्यात आले.या उपक्रमात हेल्प सामाजिक संस्थेचे श्रीकांत खंडारे,



अभिजित गडपाल, प्रशांत वागदे यांच्यासह महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालय, सालोड येथील डॉ. अनिरुद्ध उन्हाळे, डॉ. प्रज्वल पिपरवार, डॉ. कोमल नांदल, डॉ. निकिता बिटकुरवार, डॉ. रामकुमार वर्मा, डॉ. धनश्वरी सावे, डॉ. साहिल चौधरी व डॉ. पूजा सिंह यांनी रुग्णांची तपासणी केली. सामाजिक कार्यकर्त्या वंदना फटिंग व सिस्टर दामिनी यांनीही मोलाचे सहकार्य केले.शिबिरात नाव नोंदवलेल्या रुग्णांना महात्मा गांधी आयुर्वेद रुग्णालयात पुढील उपचारासाठी सवलत देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली. या निर्णया मुळे ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे.शिबिराच्या वेळी माजी सरपंच रेणुका कोटंबकार व ग्रामविकास अधिकारी भगवान कंठाळे यांनी डॉक्टर व सर्व सहकाऱ्यांचे स्वागत केले. सामुदायिक आरोग्य अधिकारी वैशाली तितरें, आरोग्य सेविका जयश्री मोहदुले, आशा कार्यकर्त्या वैशाली रघटांटे, राजू उमटे यांच्यासह कर्मचारी सूरज भोंगाडे, अशोक कांबळे, राहुल कोसळकर, राकेश कांबळे व शोभा चीडाम यांनी शिबिर यशस्वी करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले.या शिबिरामुळे ग्रामीण भागात आयुर्वेदिक उपचारांबाबत जनजागृती वाढली असून नागरिकांनी आयोजकांचे आभार मानले आहेत.

# देवळीकरांची आरक्षणासाठी भटकंती थांबणार

## देवळी रेल्वे स्थानकावर आरक्षण तिकीट काउंटर सुरू करा : खा. अमर काळें

**वर्धा/ जनमाध्यम**

वर्धा-नांदेड हा महत्त्वाचा रेल्वे मार्ग पूर्णत्वाच्या दिशेने वाटचाल करत असताना देवळी शहरातील प्रवाशांना मात्र आजही मूलभूत सुविधेसाठी संघर्ष करावा लागत आहे. या मार्गावरील देवळी रेल्वे स्थानकावर आरक्षण तिकीट काउंटरच उपलब्ध नसल्याने प्रवाशांची मोठी गैरसोय होत असून, ही सुविधा तातडीने सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

देवळी तालुका हे व्यापारी, शैक्षणिक व प्रशासकीयदृष्ट्या महत्त्वाचे केंद्र असतानाही येथे आरक्षण तिकीट काढण्यासाठी कोणतीही थेट सोय नाही.

यापूर्वी पोस्ट ऑफिसमार्फत रेल्वे आरक्षण तिकीट काढण्याची सुविधा उपलब्ध होती. मात्र, गेल्या दोन महिन्यांपासून ही सेवा अचानक बंद करण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.आरक्षण तिकीट मिळविण्यासाठी देवळीतील प्रवाशांना वर्धा, नागपूर किंवा यवतमाळसारख्या दूरच्या शहरात जावे लागत आहे.

यामुळे वेळ, पैसा व श्रम वाया जात असून सामान्य नागरिक, विद्यार्थी, नोकरदार आणि ज्येष्ठ नागरिक अक्षरशः त्रस्त झाले आहेत. तालुक्याच्या ठिकाणीच जर आरक्षण सुविधा नसेल, तर विकास कुठे आहे.

असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे.ही गंभीर बाब देवळी तालुक्यातील नागरिकांनी थेट खासदार अमर काळे यांच्या निदर्शनास आणून दिली.

जनतेच्या या तक्रारीची दखल घेत खासदार अमर काळे यांनी मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधत देवळी रेल्वे स्थानकावर तातडीने आरक्षण तिकीट काउंटर सुरू करण्याचे निर्देश दिले.

# इंडिया पोस्ट नवीन वर्षाची भेट २०२६




**साहूर/ जनमाध्यम**

डिजिटल युगात घरबसल्या ऑनलाइन व्यवहार व शॉपिंगची सुविधा वाढली असली, तरी त्याचबरोबर सायबर गुन्हेगारीचे प्रकारही मोठ्या प्रमाणात वाढताना दिसत आहेत. सायबर गुन्हेगार नवनवीन क्लुप्त्या शोधून नागरिकांची फसवणूक करत असून, सध्या इंडिया पोस्ट नवीन वर्षाची भेट २०२६ या नावाने फिरणारी फसवी लिंक नागरिकांच्या व्हॉट्सॲपवर व विविध ग्रुप्सवर पाठवली जात असल्याचे उघडकीस आले आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांनी अत्यंत सतर्क राहावे, असे आवाहन डाक विभागाने केले आहे.

डाक विभागाच्या माहितीनुसार, सदर लिंक अधिकृत नसून सायबर गुन्हेगारांकडून तयार करण्यात आली आहे. या लिंकद्वारे बक्षीस, भेटवस्तू किंवा रोख रक्कम मिळणार असल्याचे आमिष दाखवून नागरिकांना क्लिक करण्यास प्रवृत्त केले जात आहे.

मात्र, एकदा लिंकवर क्लिक केल्यास मोबाईल हॅक होणे, वैयक्तिक माहिती चोरीला जाणे किंवा बँक खात्यातील रक्कम गमावण्याचा धोका संभवतो.या संदर्भात घ्र्हेंइदूच्या वतीने अधिकारी विजय रोकडे यांनी स्पष्ट केले की, इंडिया पोस्टकडून अशा प्रकारची कोणतीही नवीन वर्षाची भेट योजना जाहीर करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांनी अशा प्रकारच्या कोणत्याही संदेशांवर किंवा लिंकवर विश्वास ठेवू नये.आज इंटरनेटमुळे व्यवहार सुलभ झाले असले, तरी सायबर गुन्हेगारांनी याच माध्यमाचा गैरवापर सुरू केला आहे. शहरी भागासह ग्रामीण भागातही ऑनलाइन व्यवहारांचे प्रमाण वाढल्याने नागरिकांचा निष्काळजीपणा सायबर गुन्हेगारांसाठी संधी ठरत आहे. कमी कष्टात जास्त पैसे मिळवण्याचे आमिष दाखवून फसवणूक केली जात असून, चोरीच्या पद्धतीही आता बदलत चालल्या आहेत.डाक विभागाने नागरिकांना आवाहन केले आहे की, अनोळखी लिंकवर क्लिक करू नये, कोणतीही वैयक्तिक माहिती, ओटीपी किंवा बँक तपशील शेअर करू नयेत. संशयास्पद संदेश तात्काळ दुर्लक्षित करावेत व गरज असल्यास सायबर हेल्पलाईन किंवा संबंधित अधिकृत कार्यालयाशी संपर्क साधावा. पैशाच्या हव्यासापोटी अशा फसव्या आमिषांना बळी न पडता, प्रत्येकाने सजग राहून ऑनलाइन व्यवहार करावेत, असे आवाहन डाक विभागाकडून करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## हनुमान मंदिरात धार्मिक महोत्सव

**कारंजा (घा.) -** येथील हनुमान मंदिरात नववर्षानिमित्त २ ते ३ जानेवारी या कालावधीत दोन दिवस धार्मिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. २ जानेवारीला संध्याकाळी श्री. गुरुदेव संस्कृती भजन मंडळाच्यावतीने भजनाचा कार्यक्रम होणार आहे. ३ जानेवारीला पहाटे हनुमानाच्या मूर्तीला अभिषेक व हवन व काल्याचे कीर्तन होणार आहे लटारे महाराज बँड पार्टी यांची रामधून व संगीतमय सुंदरकांड पाठ होईल. सायंकाळी महाप्रसादाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. नागरिकांनी या कार्यक्रमाचा लाभघेण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

## पवनार येथील उर्स कार्यक्रम उत्साहात

**पवनार -** येथे धाम नदीच्या तीरावरील टेकडीवर दर्गा असून, येथे दरवर्षी उर्सच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. या कार्यक्रमाला खासदार अमर काळे यांनी दर्शनाकरिता हजेरी लावली.खासदार काळे यांनी दर्यात दर्शन घेऊन चादर चढविली. नागरिकांशी चर्चा करुन महाप्रसादाचा आनंद घेतला. नंतर पवनार येथील मामा-भांजा दर्यालाही भेट देऊन दर्गा कमिटीचे प्रमुख प्रमोद राठी यांच्याशी चर्चा केली. हिंदू व मुस्लीम समाजातील नागरिकांची सकाळपासून दर्शनाकरिता गर्दी असते. यावेळी मुस्लीम समाजातील नेते नावेद शेख यांच्याशी खासदार काळे यांनी संवाद साधला.

## आठवडी बाजारातून दुचाकीची चोरी

**वर्धा -** समुद्रपूर येथील आठवडी बाजारात भाजी खरेदीकरिता गेलेल्या व्यक्तीची दुचाकी अज्ञात चोरट्याने चोरून नेली. ही घटना समुद्रपूर येथील आठवडी बाजार परिसरात घडली. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. समुद्रपूर तालुक्यातील पाईकमारी येथील मनोज दयाराम शेंडे यांनी एम. एच. ३२ ए. बी. २३६७ क्रमांकाची दुचाकी आवठडी बाजार परिसरात उभी केली. त्यानंतर ते भाजीपाला खरेदीसाठी गेले. परतल्यानंतर त्यांना दुचाकी दिसली नाही. परिसरात शोध घेऊनही दुचाकी न मिळाल्याने त्यांनी पोलिस स्टेशन गाठून तक्रार दाखल केली. तक्रारीवरून समुद्रपूर पोलिसांनी अज्ञात आरोपीविरोधात गुन्हा दाखल केला आहे.. पुढील तपास सुरु आहे.

## 'आप'ची कार्यकारिणी बरखास्त; नवीन जाहीर होणार

**वर्धा -** आम आदमी पार्टीची विद्यमान जिल्हा कार्यकारिणी तत्काळ प्रभावाने बरखास्त करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती आप जिल्हाध्यक्ष श्रीकांत दोड यांनी दिली. पक्ष संघटन अधिक मजबूत, शिस्तबद्ध व विश्वासार्ह ठेवण्यासाठी हा निर्णय अत्यंत आवश्यक होता, असे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नगर परिषद निवडणुकांच्या कालावधीत काही पदाधिकाऱ्यांकडून पक्षशिस्तीचा भंग झाल्याच्या तक्रारी पक्ष नेतृत्वाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर सखोल विचारविनिमयानंतर संबंधित पदाधिकाऱ्यांवर ६ वर्षांसाठी पक्षातून निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून पक्ष संघटन करण्यात येईल.

## डाबंरीकरण उखडले, खड्ड्यांतून मार्गक्रमण

**वर्धा -** शहरातमध्ये काही भागात सिमेंटचे रस्ते तयार झाले असून काही भागांमध्ये अजुनही नागरिकांना खड्डेमय रस्त्यातूनच आवागमन करावे लागत आहे. त्यामुळे या रस्त्यांचे भाग्य नवीन वर्षात तरी उजळणार का ? असा प्रश्न विचारल्या जात आहे.वर्धा शहरातील जुना आर्वी स्टॅन्ड ते पावडे चौकापर्यतच्या रस्त्यावर काही महिन्यांपूर्वीच डांबरीकरण करण्यात आले होते. त्यामुळे या मार्गावरुन वाहतूक सुसाट झाली होती. परंतु पहिल्याच पावसाळ्यात या रस्त्याच्या कामातील निकृष्ट दर्जा चव्हाट्यावर आला. आता तर डांबरच दिसेनासे झाले असून केवळ खड्डेच खड्डे आहे. यातून मार्गक्रमण करताना वाहनालकांना तारेवरची कसरत करावी लागते. हा मार्ग वर्दळीचा असून शाळकरी मुलांसह ज्येष्ठ नागरिकांचीही ये-जा सतत सुरु असते. त्यामुळे या मार्गावरील खड्डे अपघातास निमंत्रण देणारे ठरत आहे. विशेष म्हणजे, या मार्गावरुन वाहने गेल्यानंतर धूळ उडत असल्याने लगतच्या घरात राहणाऱ्यांना या धुळीपासून त्रास होत आहे. परिणामी आजारपणातही वाढ झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

## आज कोरेगाव भीमा शौर्य दिन

**वर्धा-** ऑल इंडिया समता सैनिक दल, वर्धाच्यावतीने सावंगी टी-पॉईट येथे आज १ जानेवारी रोजी सायंकाळी ४ ते १० वाजेपर्यंत भीमा कोरेगाव शौर्य दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे.सुरुवातीला संथ गार बुद्ध विहार मास्टर कॉलनी येथून समता सैनिक दलचा मार्च निघणार आहे. त्यानंतर भीमा कोरेगाव प्रतिकृती स्तंभाला शूरवीरांना मानवंदना देण्यात येणार आहे. या कार्यक्रमात उत्तर प्रदेश येथील आंबेडकरवादी गीत गायिका वंदना सिद्धार्थ व आंबेडकरी गझल गायिका मंजूषा शिंदे व संच पुणे यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे. भीमा कोरेगाव शौर्य दिनानिमित्त प्रबोधन होणार आहे.विचारांची मैफल गाजणार प्रा. विठ्ठल कांगणे, आंबेडकरी विचारवंत प्रशिक आनंद विचारांची मैफल गाजवणार आहे. अध्यक्षस्थानी स्मिता श्रीकांत चव्हाण व स्वागताध्यक्ष गौतम जुलमे राहील. कार्यक्रमासाठी आशिष लोखंडे, रमेश साटोणे, रमेश निमसडकर, अनिल खडतकर, सुनील बाभळे, प्रफुल्ल बनसोड, आम्रपाल कांबळे, संदीप थूल, जीवन निमसडकर, विनोद जवादे, मिलिंद मून, पद्माकर कांबळे, आनंद फुलमाळी, दिलीप प्रमोद चोरपगार, सचिन भोंगाडे, आनंद फुलमाळी, सरिता कुसळे, सुधीर मुरार परिश्रम घेत आहेत.

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.
संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
वर्धा आवृत्ती वर्ष - १४ अंक - ३७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३
मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल- atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# उमेद पंख विश्वासाचे पवित्र उपक्रम-ॲड.भैय्यासाहेब पाटील पुसदेकर

## -१११११ पंखांना मिळाले नवीन बळ -जयपूर फुट उपक्रमाचा थाटात समारोप

**अमरावती/प्रतिनिधीः-** उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमातून राबविण्यात आलेला निःशुल्क जयपूर फुट वितरणाचा उपक्रम हा पवित्र कार्य असल्याचे प्रतिपादन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड.भैय्यासाहेब पाटील पुसदेकर यांनी केले.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांचे नेतृत्वात व कार्यकारिणीचे सदस्य हेमंत काळमेघ यांच्या विशेष प्रयत्नाने १८ ते ३१ डिसेंबर या कालावधीत राबविण्यात आलेल्या या निःशुल्क कृत्रिम अंगरोपण कार्यक्रमाचा समारोप आज डॉ .पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे मोठ्या थाटात संपन्न झाला. यावेळी कार्यक्रमाला अध्यक्षस्थानी श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. भैय्यासाहेब पाटील पुसदेकर होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र आरोग्य विद्यापीठ नाशिक च्या होमिओपॅथी विभागाचे माजी अधिष्ठाता डॉ.अरुण भस्मे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य प्रा.सुभाषराव बनसोड, प्राचार्य केशवराव गावंडे, सचिव डॉ.वि.गो ठाकरे, अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोल्याचे डॉ.किशोर मालोकर, जयपूर फुट उपक्रमाचे प्रणेते आर्किटेक रामेश्वर मनियार, अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन पुणे च्या अध्यक्ष रजनी अंबादे, सचिव आकाश अंबादे ,समन्वयक संदीप पुंडकर, चंदूभाऊ खेडकर, डॉ.गजानन वाकोडे, इंडियन रेड क्रॉस सोसायटी अकोला येथील मानद सचिव प्रभजीत सिंह बछेर, श्रद्धा वासनिक, प्रकाश गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुढे बोलताना भैय्यासाहेब पुसदेकर यांनी हा उपक्रम म्हणजे कालपर्यंतच्या दुःखाचे अश्रू आज आनंदाचे झाले असा असून अतिशय छान उपक्रम राबविल्याबद्दल त्यांनी आयोजकांचे आभार मानले .यावेळी आर्किटेक रामेश्वर मणियार यांनी आपले मनोगत व्यक्त करून कार्यक्रमामागची भूमिका विशद केली.



डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्किटेक रामेश्वर मणियार व अंबादास खोब्रागडे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आलेल्या निःशुल्क जयपुर फुट उपक्रमामध्ये एकूण अकराशे अकरा दिव्यांगांना निःशुल्क कृत्रिम अंगरोपण वाटप करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी दिव्यांगांना कृत्रिम अवयव वाटप करून भावी नवीन आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. श्री शिवाजी शिक्षण संस्थेमध्ये ऐतिहासिक असा उपक्रम राबवून पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात कृत्रिम अवयव वाटप करून आयोजकांनी समाजासमोर मोठा आदर्श ठेवला आहे.

या उपक्रमासाठी विशेष सहकार्य केल्याबद्दल अक्षय पाथ्रीकर, राहुल लकडे, गौरव राऊत यांचा मान्यवरांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.ए.टी देशमुख यांनी केले. संचालन वैष्णवी धर्माळे तर आभार आकाश अंबादे यांनी मानले.

# अमरावती येथे अमृत संस्थेचा सहा दिवसांचा क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रम सुरू



**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने अमरावती येथे सहा दिवसांचा कॅपॅसिटी बिल्डिंग प्रोग्राम (क्षमता बांधणी प्रशिक्षण) आज सुरू करण्यात आला आहे . स्वयंरोजगार व उद्योजकतेच्या दृष्टीने लाभार्थ्यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने हा मोफत प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एमसीईडी), अमरावती यांच्या सहकार्याने राबविण्यात येत आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन अमृत संस्थेचे अमरावती विभाग व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर यांच्या हस्ते करण्यात आले. अमृतचे अमरावती जिल्हा व्यवस्थापक केदार गोगरकर, उपव्यवस्थापक ऋषिकेश कथलकर त्याचप्रमाणे एमसीईडी अमरावतीचे प्रकल्प अधिकारी राजेश सुने, कला खैरे विभागीय लेखापाल ,नेत्रदीप चौधरी जिल्हा प्रकल्प समन्वयक ,स्वप्नील इसळ कार्यक्रम आयोजक तसेच प्रशिक्षणार्थी लाभार्थी व अन्य मान्यवर उपस्थित होते.

यावेळी प्रत्येक प्रशिक्षणार्थीच्या माध्यमातून स्वयंरोजगार निर्माण झाला पाहिजे ही अमृतची भूमिका असून अमृतचा लाभार्थी हा रोजगार देणारा उद्योजक झाला पाहिजे ,हे अमृतचे ध्येय असल्याचे विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर यांनी सांगितले. त्याचप्रमाणे राबवण्यात येणाऱ्या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अद्ययावत प्रशिक्षण लाभार्थ्यांना दिले जाईल व त्यांचा स्वयंरोजगार वृद्धिंगत होण्यासाठी पूर्ण प्रयत्नशील राहणार असल्याचे एमसीडीचे प्रकल्प अधिकारी राजेश सुने यांनी सांगितले.

या सहा दिवसांच्या क्षमता बांधणी प्रशिक्षणात उद्योग वृद्धिंगत करण्याची संपूर्ण प्रक्रिया, उद्योजकतेसाठी व्यवसाय नियोजन, खर्च व नफा व्यवस्थापन, बाजारपेठेची ओळख, ग्राहक व्यवहार कौशल्य, तसेच शासकीय योजना व अर्थसहाय्याची माहिती याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात येणार आहे. सैद्धांतिक प्रशिक्षणासोबतच प्रात्यक्षिक सत्रांद्वारे सहभागींचा आत्मविश्वास वाढविण्यावर भर देण्यात येणार आहे.

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर सहभागी लाभार्थ्यांना अमृत व एमसीईडीच्या माध्यमातून आवश्यक मार्गदर्शन, समुपदेशन व सहकार्य करण्यात येईल, त्याचप्रमाणे योजनांचा लाभ देण्यात येईल असे यावेळी सांगण्यात आले.

या उपक्रमामुळे अमरावती जिल्ह्यातील खुल्या प्रवर्गातील लक्षित गटातील व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याची संधी मिळणार असून, स्वयंरोजगार निर्मितीच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. त्याचबरोबर अमृततर्फे ड्रोन रिमोट पायलट प्रशिक्षणपासून ते उद्योजकता विकास प्रशिक्षणपर्यंत असंख्य विषयांचे प्रशिक्षण सुरू करण्यात येत असून सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी अमृत विभागीय कार्यालय, आशीर्वाद बिल्डिंग, मालटेकडी समोर ,टोपे नगर येथे भेट देण्याचे आवाहन केले आहे. त्याचप्रमाणे अमरावती जिल्हा व्यवस्थापक केदार गोगरकर यांना ९११२२२९७६५ तसेच जिल्हा उपव्यवस्थापक ऋषिकेश कथलकर यांना ७२४९४५११५२ येथे देखील संपर्क करण्याचे आवाहन केले आहे.

# प्रतिबंधित चायना मांजा विक्रेता ताब्यात

## -अमरावती पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील पर्यावरणाच्या दृष्टीने प्रतिबंधित असलेली चायना मांजा बेकायदेशीर विक्री करणाऱ्यावर अमरावती शहर पोलिसांच्या गुन्हे शाखेने कडक कारवाई केली आहे. ३० डिसेंबर रोजी पेट्रोलिंग दरम्यान पोलिसांनी शिलांगण रोडवरील बाकडेवाडी येथे छापा टाकून भूषण उर्फ पिंटू मनोहरराव चांदेकर (वय ४०) यास प्रतिबंधित चायना मांज विकताना रंगेहात पकडण्यात आले.

या कारवाईमध्ये पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, शाम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली संदीप चव्हाण पोलीस निरीक्षक यांच्या नेतृत्वात अमरावती शहर गुन्हे शाखेचे पथक कार्यरत होते. पोलिसांनी १२,००० रुपये किमतीचा चायना मांजा जप्त केला आहे.

# बडनेरात तडिपाराला अटक



**अमरावती :** बडनेरा पोलिसांनी मिलचाळ परिसरातून एका तडिपार आरोपीला अटक केली. उमेश महादेवराव मेश्राम (वय ४९, मिलचाळ, बडनेरा) असे आरोपीचे नाव आहे. या आरोपीला दोन वर्षांकरिता तडिपार करण्यात आले होते. तरीसुध्दा तो शहरात दाखल झाला. त्याच्याविरुध्द कलम १४२ अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

# एमपीएससी संयुक्त पूर्व परीक्षेचे रविवारी आयोजन

## -१२ हजारहून अधिक उमेदवार देणार परीक्षा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत आयोजित करण्यात आलेली महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षा-२०२५ येत्या रविवारी, ४ जानेवारी २०२६ रोजी पार पडणार आहे. या परीक्षेसाठी प्रशासनाने तयारी केली आहे.

ही परीक्षा रविवार, दिनांक ४ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ ते दुपारी १२ या एकाच सत्रात पार पडेल. अमरावती शहरामध्ये परीक्षेसाठी एकूण ४१ परीक्षा उपकेंद्रांची व्यवस्था करण्यात आली आहे.

परीक्षेसाठी एकूण १२ हजार ८६४ उमेदवार प्रविष्ट होणार आहेत. परीक्षेचे कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी एकूण १ हजार २५० अधिकारी आणि कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. प्रशासनाकडून परीक्षेचे नियोजन पूर्ण झाले असून उमेदवारांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात येत आहे.

# वलगाव येथे ‘क्रिष्णदिप बार अँड रेस्टॉरेंट’ फोडले

## -शटरचे कुलूप तोडून ११,२१० रुपयांची रोकड लंपास

**अमरावती/प्रतिनिधीः-** वलगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत चांदूर बाजार फाटा परिसरातील ‘क्रिष्णदिप बार अँड रेस्टॉरेंट’ येथे अज्ञात चोरट्याने पहाटे दुकान फोडून गल्ल्यातील ११ हजार २१० रुपये रोख रक्कम चोरून नेली. ही घटना ३० डिसेंबर रोजी उघडकीस आली आहे. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी कृष्णाकुमार जयनारायण जयस्वाल (वय ४५, व्यवसाय – बार चालक/मालक, रा. भाजी बाजार, अमरावती) यांचे वलगाव रोडवरील चांदूर बाजार फाट्याजवळ ‘क्रिष्णदिप बार अँड रेस्टॉरेंट’नावाने व्यवसाय आहे. ते ३० डिसेंबर रोजी सकाळी बार ॲन्ड रेस्टारंट उघडण्यासाठी गेले असता, त्यांना चोरी झाल्याचे निदर्शनास आले.

पहाटे सुमारे ४ वाजताच्या दरम्यान अज्ञात चोरट्याने काउंटर रूमच्या शटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला आणि गल्ल्यातील ११ हजार २१० रुपये रोख रक्कम चोरून नेल्याचे आढळून आले. त्यानंतर त्यांनी वलगाव पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली. याप्रकरणात फिर्यादीच्या जबाबावरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. घटनेचा पुढील तपास वलगाव पोलीस करीत असून परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

# हनवतखेडा येथील युवा शेतकरी सुमित घोम यांचा अपघातात मृत्यू

## -एक गंभीर जखमी, अमरावती रेफर

**अचलपूर/प्रतिनिधीः-** अचलपूर तालुक्यातील हनवतखेडा येथील युवा शेतकरी व परतवाडा शहरातील श्री डिजीटल हबचे संचालक सुमित प्रकाश घोम या युवकाचा काल सायंकाळी झालेल्या दुचाकी अपघातात मृत्यू झाल्याने सर्वत्र शोकसंवेदना व्यक्त केल्या जात आहे.

परतवाडा -अंजनगांव मार्गावरील पेट्रोलपंपानजीक ३१ डिसेंबर रोजी सायंकाळी ८ वा. सुमारास दोन दुचाकीच्या धडकेत झालेल्या अपघातात सुमित घोम याचा मृत्यु झाला असुन एक युवक गंभीर जखमी आहे तर दुसऱ्याला किरकोळ दुखापत झाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार हे दोघेही अंजनगांव तालुक्यातील असल्याचे समजते मात्र त्यांची ओळख अद्याप होऊ शकली नाही. या अपघातात एमएच २७ बिएल ६२४६ व एमएच २७ डि ३६८१ या दोन दुचाकी अमोरासमोर धडकल्याने अपघात झाला.



जखमी सुमितला उपचारासाठी दवाखाण्यात नेत असतांना प्राणज्योत मालवली. दुसऱ्या दुचाकीवरील दोघांना अमरावती येथे रेफर करण्यात आले आहे.सुमित बहुतांश वेळी परतवाडा येथे असतांना आपल्या चारचाकी वाहनाचा वापर करत होता. आज मात्र सायंकाळी दुचाकीने परतवाड़ा जात असतांना त्याचे अपघातात निधन झाले. महानुभाव पंथ अनुयायी असणारा सुमित परिवारात व गावात प्रत्येकाच्या मदतीला धाऊन येणारा व युवकांसाठी प्रेरणा देणारा व्यवसायीक म्हणून ओळखला जायचा, त्याच्या निधनाने सर्वत्र शोकसंवेदना व्यक्त होत असुन हनवतखेडा गावावर शोककळा पसरली आहे.

# भरधाव बोलेरोची दुचाकीला धडक; एक जखमी

**अमरावती :** बडनेरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दाभा गावाजवळ भरधाव बोलेरो वाहनाने दुचाकीला धडक दिली. या अपघातात अरुण उपरीकर (वय ५६) गंभीर जखमी झाले. विरुद्ध दिशेने आलेल्या बोलेरो चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून धडक दिली व अपघातानंतर घटनास्थळावरून फरार झाला. याप्रकरणात महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी ३० डिसेंबर रोजी बडनेरा पोलिसांनी एमएच ३७ टी २७८८ वाहनाच्या चालकाविरुध्द गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.


## स्थानिक चौकशी व पडताळणी पंचनामा

दिनांक ०५.१२.२०२५

आज दि.०५.१२.२०२५ रोजी आम्ही खालील सह्या करणारे पंच राहणार **घाटलाडकी,** निबंधक, जन्म नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत **घाटलाडकी,** यांनी बोलाविल्यानुसार ग्रामपंचायत कार्यालय येथे हजर झालो. जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी ग्रामपंचायतीला प्राप्त अर्ज नांव **अ.सलीम अ.सलाम** अर्जात नमूद जन्म दिनांक **३०.०७.१९५७** च्या बाबतीत आम्ही खालील माहिती देत आहोत.

१) जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केलेला अर्जदार हे **घाटलाडकी** येथील स्थानिक रहिवासी आहेत.
२) सदरील अर्जदार व ज्यांच्या नावाने जन्म/मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्रासाठी अर्ज केला आहे, त्या दोघांनाही आम्ही व्यक्तिशः ओळखतो. तसेच त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती जसे आई, वडील, आजोबा इत्यादीबद्दल आम्हाला माहिती आहे.
३) सदरील जन्म नोंद निबंधकाकडे विहीत वेळेत न होण्याचे कारण **अज्ञानता व माहिती नसणे** हे आहे. (नोंदणीबाबत माहिती नसणे/अज्ञान/नोंदणी प्रमाणपत्राची आवश्यकता न पडणे, दिर्घकालीन आजारपण, इतर योग्य ते नमुद करा
४) आम्ही सदर चौकशी व पडताळणी पंचनामा आमच्या माहितीवरुन व स्थानिक चौकशीवरुन देत आहे.

करीता पंचनामा लिहून देत आहोत व वाचून सही करत आहोत.

| पंचाचे नांव | सही |
|---|---|
| १) शिवानंद उ.मदने (सरपंच) | १) शिवानंद उ.मदने (सरपंच) |
| २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) | २) अब्दुल हफिज शे.रसुल (उपसरपंच) |
| ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) | ३) सागर रविंद्र शिरभाते (त.मु.अ.) |
| ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) | ४) गजानन अरविंद देशमुख (पो.पा.) |
| ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) | ५) अब्दुल खालील अब्दुल मजीद (ग्रा.पं.) |

शिक्का

**निबंधक,**
**जन्म मृत्यू नोंदणी तथा**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत घाटलाडकी**



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **श्री अभिषेक गजाननराव जोंधळे** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन ः-मौजे-दर्यापूर,सर्वे क्र. ११०/१, प्लॉट क्र.५२,ता.दर्यापूर आणि जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री अभिषेक गजाननराव जोंधळे हे ललिता विनोद जोंधळे** यांच्या कडून विकत घेण्याचा सौदा झालेला आहे. तद्नंतर **श्री अभिषेक गजाननराव जोंधळे** यांनी ***VASTU HOUSEING FINANCE CORPORATION LTD.*** येथे गृह कर्जाकरिता अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मुळ खरेदी खत दि.२४/०६/२००९ रोजीचे दस्त क्र.१४२८ हे मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत /सहकारी अथवा खाजगी बॅक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय -निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणतीही हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.नं. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **३ (तिन)** दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही ही विनंती.

STAMP

-आपला-
***ADVOCATE***
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **श्री.रविंद्र चोखदेवराव मेश्राम** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन ः- मौजे-वरुड भाग-२,शेत सर्वे क्र.४९/४,प्लॉट क्र.१२-A (ऑनलाईन ७/१२ प्लॉट क्र.४९/४/१२A/९०) ता.वरुड,जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री.रविंद्र चोखदेवराव मेश्राम** यांच्या मालकीचे आहे. तद्नंतर, त्यांनी ***VASTU HOUSEING FINANCE CORPORATION LTD.*** येथे गृह कर्जाकरिता अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मुळ खरेदी खत दि.१३/०७/२०१२ रोजीचे दस्त क्र.२७६६ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत /सहकारी अथवा खाजगी बॅक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय -निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणतीही हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.नं. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **३ (तिन)** दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही ही विनंती.

STAMP

-आपला-
***ADVOCATE***
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**



## जाहीर नोटीस

सर्व सामान्य लोकांना सूचित करण्यात येते की, मी माझे पक्षकार नामे **श्री. गणेश कृष्णराव ढवळे** यांचे वतीने सदरची जाहीर नोटीस देतो ती येणेप्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन ः- मौजे-बेनोडा,शेत सर्वे क्र.४२,नझुल शीट क्र.१, प्लॉट क्र.३९,नझुल प्लॉट क्र.१३६,ता.आणि जिल्हा अमरावती.**

सदर मिळकत माझे पक्षकार नामे **श्री. गणेश कृष्णराव ढवळे** यांच्या मालकीचे आहे. तद्नंतर, त्यांनी ***PNB HOUSING FINANCE LIMITED.*** येथे गृह कर्जाकरिता अर्ज केला असता, **सदर मिळकतीचे पूर्वीचे मुळ खरेदी खत दि.१६/०९/१९८८ रोजीचे दस्त क्र.२४७४ सदर मुळ खरेदी खत गहाळ झालेले आहे.** तसेच सदर खरेदीखत कोणाला सापडल्यास किंवा कुठे गहाण, पतसंस्था/राष्ट्रीयकृत /सहकारी अथवा खाजगी बॅक, संस्था बोजा, या मालमत्तेविषयी शासकीय -निमशासकीय काही भानगड, कोणाचा मालकी किंवा वारस हक्क असल्यास, इतर कोणतीही हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मो.नं. वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **७ (सात)** दिवसाच्या आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी तद्नंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही ही विनंती.

STAMP

-आपला-
***ADVOCATE***
**रविंद्र रु.वाटाणे**
**स्नेहगंधा कॉलोनी, अमरावती**
**मो.नं. ९८२३६९८७४५**



## जाहीर नोटीस

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, यांचे न्यायालय**

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २८५/२०२५ — ने.ता.०४.०२.२०२६

**अर्जदार -** **मुश्ताक खान व ३**

-- वि --

**गैरअर्जदार-** **निरंक**

Application in the matter of adoption of the child female under section 60(1) of the Juvenile Justice (Care and Protection of Children) Act, 2015 (2 of 2016) read with regulations 53, 54 & 55 of the Adoption Regulations.

ज्याअर्थी वरील अर्जदार नं.१ व २ यांना **अलिया अहमद खान निसार अहमद खान** हिला अर्जदार नं.३ व ४ यांनी दत्तक देण्याकरीता जिल्हा व सत्र न्यायाधीश-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज सादर केला आहे.

सदर अर्जात अर्जदार नं.३ व ४ हे दोघेही पती-पत्नी मुलगी **अलिया अहमद खान निसार अहमद खान** हिचे नैसर्गिक आईवडील आहेत. मुलगी **आलिया** हिला अर्जदार नं.१ व २ हे दत्तक घेणार आहेत. तसेच आलिया हिचे नांव जन्म प्रमाणपत्रात बदलविण्याची परवानगी मिळण्याबाबत वरील अर्जदारांनी विद्यमान जिल्हा व सत्र न्यायालय-६, अमरावती यांच्या न्यायालयात रितसर अर्ज केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जाविरुध्द कारण दाखविण्यास अगर काही हरकती घ्यावयाचे असल्यास/अर्जदाराचे सर्व नातलग व हितसंबंधी आणि सर्वत्र लोकास जाहीर नोटीस देण्यात येते की, त्यांनी दि.०४.०२.२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता वि.जिल्हा न्यायाधीश-६, अमरावती यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हु अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक ३०.१२.२०२५ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले असे.

अमरावती
दिनांक ३०.१२.२०२५

शिक्का

आदेशान्वये,
सहायक अधीक्षक, (न्यायीक विभाग)
जिल्हा व सत्र न्यायालय,
अमरावती



## जाहीर सोडचिठ्ठी

**जाहीर सोडचिठ्ठी घेणार - पार्टी नं.१ - सौ.साक्षी धिरज कुयटे**
वय २२ वर्षे, रा.बबन हरिभाऊ बाळसकर यांच्या घरी (माहेरी) रहाटगांव, ता.जि.अमरावती

**जाहीर सोडचिठ्ठी देणार - पार्टी नं.२ - धिरज संतोष कुयटे**
वय २८ वर्षे, रा.तिवसा, करजगांव, ता.तिवसा जि.अमरावती

आम्ही दोघे पार्टी नं.१ आणि पार्टी नं.२ वरील पत्त्यावर राहतो. आम्ही नात्याने पती-पत्नी आहोत. कुणाच्याही दबावात न येता, चांगल्या मानसिक अवस्थेत सामाजिक जातमान्यतेनुसार मी स्वतः पार्टी नं.१ माझे पतीला दिनांक ०१ जानेवारी २०२६ ला जाहीर सोडचिठ्ठी देत आहे.

आमचा विवाह ६ फेब्रुवारी २०२३ ला नोंदणी पध्दतीने झालेला आहे. मागील दोन वर्षापासून पार्टी नं.१ माहेरी राहत आहे. यापुढे दोघाही पती-पत्नीचे पटणे शक्य नाही. सततच्या सांसासरिक कलहातून कुणाचीही जीवितहानी होऊ नये म्हणून याच क्षणी पार्टी नं.१ बिनशर्त घटस्फोट घेत आहे.

यापुढे दोघेही दुसरा विवाह करण्यास मोकळे झालो आहे. यापुढे दोघेही एक दुसऱ्याच्या आयुष्यात हस्तक्षेप करणार नाही. एक दुसऱ्याची सामाजिक बदनामी करणार नाही. हे पती-पत्नीचे वैवाहिक संबंधाचे नाते येथेच संपुष्टात येत आहे.

**स्थळ -** अमरावती जिल्हा (महाराष्ट्र राज्य)
**दिनांक -** ०१ जानेवारी २०२६

शिक्का

**जाहीर सोडचिठ्ठी देणार**
**पत्नी - सौ.साक्षी धिरज कुयटे**



## जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेकरीता अर्जाचा नमुना

**प्रति,**
निबंधक, जन्म मृत्यू नोंदणी तथा ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत घाटलाडकी,
ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

**विषय - जन्म-मृत्यू नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र मिळणेबाबत.**
**अर्जदाराचे नांव** - शहजाद खॉ सईद खॉ, रा.घाटलाडकी
मोबाईल नंबर - ९०९६९२०४३८

मा.महोदय,

वरील विषयान्वचये सविनय अर्ज सादर करतो/करते की, माझ्या पत्नीचा नामे **नांव शहजाद खॉ सईद खॉ** यांचा जन्म ग्रामपंचायत **घाटलाडकी** कार्यक्षेत्रातील **घाटलाडकी** या गावी दिनांक **१९.०७.२००१** रोजी झालेला आहे.

सदरील जन्म घटनेची नोंद आपल्या ग्रामपंचायतीला झालेली नाही. तसेच इतर कुठल्याही निबंधकाकडे केलेली नाही. सदरील जन्म विलंब नोंदणी करण्यासाठीचे आदेश वरिष्ठ कार्यालयाकडून आणण्यासाठी मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णय दि.१२ मार्च २०२५ नुसार आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत सादर जोडलेले आहेत. जोडण्यात आलेले कागदपत्रे व माहिती सत्य असल्याबाबत मी खात्री देत असून चुकीचे आढळून आल्यास माझ्यावर कायदेशीर कार्यवाही होण्यास मी पात्र राहील, याची मला जाणीव आहे.

करीता मला जन्म नोंद अनुपलब्धता प्रमाणपत्र देण्यात यावे, ही विनंती.

शिक्का

अर्जदाराची स्वाक्षरी/अंगठ्याचा ठसा
(**शहजाद खॉ सईद खॉ**)



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक ११४**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025


**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### पीडीएमसी येथे ख्रिसमस डे साजरा

**अमरावती**-प्रभु येशू ख्रिस्ताचा जन्मदिवस जगभर साजरा केला जातो. त्याच अनुषंगाने श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचालित डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथे नाताळ (ख्रिसमस) हा एक प्रमुख ख्रिस्ती सण महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांचे अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी सर्वांना नाताळ सणाच्या शुभेच्छा दिल्यात. सुरुवातीला शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर नाताळ सण साजरा करण्यात आला. यावेळी गिटार सांता क्लॉज जेम्स दामले व कॅसिओ प्रथमेश नितनवरे यांनी वाजविली. स्तुती अल्मडा, निलांश हिरोळे, जेम्स दामले हया मुलींनी डान्स सादर केला. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सिस्टर मंदा नितनवरे तर पल्लवी दामले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता सिस्टर हेमा घाडगे, निशांत धांदे, कविता इंगळे, वैशाली हिरोळे, प्रिया घाडगे, सुमित सेर, श्वेता प्रसाद, प्रिती थोरात, आशिष मकेश्वर, स्नेहल खरात, शांता घाडगे यांनी परिश्रम घेतले.



### तक्षशिला महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची वसा संस्थेला भेट

**अमरावती**-श्री दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट संचालित तक्षशिला महाविद्यालय येथील वाणिज्य व व्यवस्थापन विभागाची वसा पशु संवर्धन संस्था, मंगलधाम कॉलनी येथे पर्यावरण विषयक भेट दिली.यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ माधुरी फुले यांच्या मार्गदर्शनात विभागाचे प्रा. स्वप्नील मानकर, प्रा. आचल साबळे, प्रा. मिनल दाभाडे, प्रा. मनिषा वैद्य, प्रा. मीनाक्षी सर्वटकर, प्रा. अनिल मनवर, प्रा. शुभम तायडे यांच्यासह ४० विद्यार्थ्यांचा समावेश होता. यावेळी विद्यार्थ्यांच्या हस्ते पशूंना एक दिवसाचे अन्नदान देण्यात आले. या भेटीदरम्यान प्राण्यांविषयी आपुलकी, प्रेम, सद्भावना निर्माण झाली. तसेच विद्यार्थ्यांनी संस्थेची सविस्तर माहिती जाणून घेतली.



### तक्षशिला महाविद्यालयात गणित दिन

**अमरावती**-दादासाहेब गवई चॅरिटेबल ट्रस्ट संचालित तक्षशिला महाविद्यालय येथे राष्ट्रीय गणित दिन साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम महान भारतीय गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन यांच्या जयंतीनिमित्त पार पडला.या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे तथा वक्ते म्हणून श्री ब्रिजलाल बियाणी गणित विभाग सहाय्यक प्राध्यापक डॉ.हर्षल परळीकर, अध्यक्ष म्हणून मराठी विभाग प्रमुख डॉ. पंडित राठोड, डॉ. प्रवीण वानखडे, प्रा. सचिन कुमरे, डॉ. प्रणाली पेटे, प्रा. पीयूष ठाकरे, प्रा.कुणाल मेंडके आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.यावेळी व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले. आजच्या डिजिटल व तांत्रिक युगात दैनंदिन जीवनापासून ते आधुनिक संशोधनांपर्यंत प्रत्येक क्षेत्रात गणिताचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे विद्यार्थ्यांनी गणित विषयात प्राविण्य मिळवून संशोधन नवोक्रम स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून उज्वल भवितव्य घडवावे. असे आवाहनही डॉ.राठोड यांनी केले.यावेळी कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्रा. राजेश गजभिये, रोहिणी इंगळे, प्रा.कोमल मनोहरे, प्रा. स्वाती गवई, प्रा. राखी बोंद्रे, आचल जाधव, प्रियंका पवळे यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालक आदित्य वाहणे, प्रगती लांजेवार यांनी केले. तसेच आभार सायली रहांगडाले या विद्यार्थ्यांनी मानले.

## नीट, जेईई परीक्षेसाठी आता परीक्षार्थीना बायोमेट्रिक हजेरीचे बंधन

### अर्ज भरताना द्यावा लागेल फोटो, एनटीएचा निर्णय

**अमरावती**-जेईई आणि नीट परीक्षांसाठी आता बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक केली आहे. विद्यार्थ्यांना आपले अर्ज भरतानाचा फोटो अपलोड करावा लागणार आहे. नॅशनल टेस्टिंग एजन्सीने त्यादृष्टीने तयारी सुरू केली आहे. इंजिनीअरिंग ह प्रवेशांसाठी जेईई आणि मेडिकल प्रवेशांसाठी नीट परीक्षा दरवर्षी घेण्यात येते. एनटीएच्या वतीने या परीक्षेचे आयोजन केले जाते. यंदापासून जेईई, नीट यासारख्या प्रवेश परीक्षांमध्ये बायोमेट्रिक हजेरीचा वापर केला जाणार आहे. या प्रवेश परीक्षांमध्ये चेहरा ओळख तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे नियोजन 'एनटीए' मार्फत सुरू आहे. परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता वाढविण्यासाठी फसवणुक, गैरप्रकार थांबवण्यासाठी ही प्रणाली अवलंबली जाणार आहे. नव्या नियमानुसार उमेदवारांना अर्ज भरताना लाइव्ह फोटो अपलोड करावा लागणार आहे. यामुळे अर्ज करणारी व्यक्ती खरी उमेदवार आहे की नाही, याची खात्री करता येणार आहे. अर्ज भरण्याबाबत होणाऱ्या फसवणुकींना त्यातून आळा बसेल. हा निर्णय लागू करण्यापूर्वी एनटीएमार्फत याची प्रायोगिक तत्त्वावर चाचणी घेतली आहे. दिल्लीतील काही परीक्षा केंद्रांवर आधार आधारित 'फेशियल रेकग्निशन ऑथेंटिकेशन' म्हणजेच चेहरा ओळख चाचणी घेण्यात आली. हा प्रयोग यूआयडीएआय, एनआयसी आणि एनटीए यांच्या संयुक्त प्रयत्नातून केला होता. हा प्रयोग यशस्वी झाल्यामुळे एनटीएने २०२६ पासून देशात इतर प्रमुख प्रवेश परीक्षांमध्ये ही प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. या बायोमेट्रिक तंत्रज्ञानामध्ये, उमेदवाराच्या वैशिष्ट्यांचा चेहऱ्याचा अभ्यास कृत्रिम बुद्धिमत्ता वापरून केला जाईल आणि तो डेटा एकत्रित केला जाईल. परीक्षा केंद्रात प्रवेश करण्यापूर्वी, उमेदवाराची ओळख थेट चेहरा स्कॅन करून तपासली जाईल. गेल्या काही वर्षांत नीट, जेईई यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षांमध्येही गैरप्रकार समोर येत आहेत. अशा वेळी उमेदवाराची ओळख पटविण्याच्या दृष्टीने हा प्रयोग आहे.

# मनपातर्फे मतदान जनजागृतीसाठी रील स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

अमरावती महानगरपालिका व मा.राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांमध्ये मतदानाबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशाने 'मतदान जनजागृती रील स्पर्धा' आयोजित करण्यात आली आहे. लोकशाही अधिक बळकट व्हावी, मतदारांनी निर्भय व उत्स्फूर्तपणे मतदान करावे तसेच विशेषतः युवकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण व्हावा, या हेतूने हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे.

ही रील स्पर्धा १ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आली असून शहरातील सर्व नागरिकांना या स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. स्पर्धेचा विषय फक्त 'मतदान जनजागृती' हाच राहणार असून कोणत्याही प्रकारचा राजकीय पक्ष, निवडणूक चिन्ह, उमेदवार किंवा प्रचारात्मक मजकूर वापरण्यास सक्त मनाई करण्यात आली आहे.स्पर्धेत सहभागी होणाऱ्या नागरिकांनी सादर करणारी रील ही पूर्णतः मौलिक (Original) असणे बंधनकारक आहे. यापूर्वी सोशल मीडियावर प्रसिद्ध केलेली किंवा इतरांकडून कॉपी केलेली रील स्पर्धेसाठी ग्राह्य धरली जाणार नाही. अटी व शर्तींचे उल्लंघन झाल्यास संबंधित सहभाग

### नागरिकांना प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन




कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.रीलचे मूल्यमापन संदेशाची स्पष्टता, सर्जनशील मांडणी, नावीन्यपूर्ण कल्पना तसेच मतदान जनजागृतीवर होणारा प्रभाव या निकषांच्या आधारे करण्यात येणार असून परीक्षक समितीचा निर्णय अंतिम राहील.

मतदान जनजागृती या विषयावर एक मौलिक (Original) Instagram Reel तयार करावी. सदर रील १ जानेवारी ते १३ जानेवारी २०२६ या कालावधीत Instagram kej पोस्ट करावी. रील पोस्ट करताना अमरावती महानगरपालिका चे अधिकृत Instagram hespe @amcamravti Tag keâjCes ke Collab (Invite Collaborator) जोडणे अनिवार्य राहील.रीलमध्ये मतदानाचे महत्त्व, नागरिकांचा सहभाग व लोकशाहीचा संदेश स्पष्टपणे दिसणे आवश्यक आहे.विजेत्यांची घोषणा स्पर्धा संपल्यानंतर अमरावती महानगरपालिका अधिकृत सोशल मीडिया पेजवरून करण्यात येईल.

प्रथम क्रमांक : १०,०००, द्वितीय क्रमांक : ७,०००, तृतीय क्रमांक ५,००० अमरावती महानगरपालिकेने या उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांना 'तुमचे मत – तुमचे भविष्य' या संदेशाशी जोडण्याचा प्रयत्न केला आहे. मतदान हा केवळ अधिकार नसून लोकशाहीतील एक महत्त्वाचे कर्तव्य आहे, याची जाणीव प्रत्येक नागरिकापर्यंत पोहोचवणे हे या उपक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट आहे.याशिवाय १५ जानेवारी रोजी होणाऱ्या मतदान प्रक्रियेत सर्व पात्र नागरिकांनी अभिमानाने मतदान करून लोकशाही बळकट करावी, असे आवाहन अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.नागरिकांनी या रील स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद देत मतदान जनजागृतीसाठी आपल्या सर्जनशीलतेचा उपयोग करावा, असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी केले आहे.

# एमआयडीसी परिसरात प्लॅस्टिकविरोधात कारवाई

### ३९४ पोती प्रतिबंधात्मक प्लॅस्टिक जप्त; सुमारे २५ लाखांचा साठा उध्वस्त

**अमरावती/का.प्र.**

शहर प्लॅस्टिकमुक्त करण्याच्या दृष्टीने आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या ठोस व कठोर निर्देशांनुसार अमरावती महानगरपालिकेच्या वतीने श्छ्अ परिसरात प्रतिबंधात्मक प्लॅस्टिकविरोधात मोठी कारवाई करण्यात आली.


या कारवाईदरम्यान एका गोडाऊनमधून ३९४ पोती प्रतिबंधात्मक प्लॅस्टिक जप्त करण्यात आले असून त्याचे एकूण वजन ११,८२० किलो आहे. जप्त करण्यात आलेल्या प्लॅस्टिकची अंदाजे किंमत रु.



२५,००,०००/- (पंचवीस लाख रुपये) इतकी आहे.सदर ठिकाणी पंचनामा करून प्लॅस्टिक बंदी नियमांनुसार संबंधितावर रु. ५,०००/- दंड आकारण्यात आला. मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या कारवाईमुळे शहरात प्रतिबंधात्मक प्लॅस्टिक साठवणूक व वापर करणाऱ्यांमध्ये मोठा इशारा मिळाला असून, भविष्यातही अशाच प्रकारच्या कठोर कारवाया सातत्याने राबविण्यात येणार असल्याचे प्रशासनाच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या कारवाईवेळी प्लॅस्टिक कारवाई नोडल अधिकारी विनोद टांक, स्वच्छ भारत अभियान शहर समन्वयक श्वेता बोके, स्वास्थ निरीक्षव सचिन सैनी, अतिक्रमण प्रमुख योगेश कोल्हे, बिटप्युन नरेंद्र दुगलज तसेच अतिक्रमण विभागाची संपूर्ण टीम उपस्थित होती.

शहर स्वच्छ, सुंदर व पर्यावरणपूरक ठेवण्यासाठी अमरावती महानगरपालिका प्रशासन मा. आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांच्या नेतृत्वाखाली कटिबद्ध असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

## जनता विद्यालयात आरोग्यासंदर्भात विविध विषयावर मार्गदर्शन



**अंजनगाव बारी**-जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक विनोद मुगल तर प्रमुख उपस्थिती सुरेशराव आकोटकर, देव संस्कृती विश्वविद्यालयातील विद्यार्थिनी विदुषी राठोड, प्राची राठोड, योगिनी पाटीदार उपस्थित होत्या. उपस्थित सर्वांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. त्यानंतर विदुषी राठोड हिने आपल्या भारतीय संस्कृती विषयी तसेच लाईफ मॅनेजमेंट, डिजिटल डिसिप्लिन अशा विविध विषयासंबंधी विद्यार्थ्यांना माहिती दिली. प्राची राठोड हिने नियमित वाचन केल्यास आपल्या शब्द संपत्ती मध्ये वाढ होण्यास मदत होते तसेच प्राणायाम आणि योग हे सुद्धा आरोग्यासाठी आवश्यक आहे यासंबंधी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन विनोद चिंचोळकर यांनी केले.

# टाकरखेडा संभू-आष्टी मार्गावर पुन्हा थातूरमातूर दुरुस्ती

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

आष्टी वरून जाणाऱ्या सुमारे पाच किलोमीटर लांबीच्या टाकरखेडा–आष्टी मार्गाची दुरावस्था पुन्हा एकदा ऐरणीवर आली आहे. गेल्या १५ ते २० वर्षांपासून या रस्त्याचे पक्के बांधकाम न करता केवळ दरवर्षी थातूरमातूर दुरुस्ती केली जात असल्याने वाहनधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. दरवर्षी लाखो रुपयांचा खर्च करून खड्डे बुजवले जातात; मात्र पुढील पावसाळ्यात रस्ता पुन्हा उघडतो, असा दुष्टचक्राचा अनुभव नागरिक घेत आहेत.

यंदाही वृत्तपत्रांत बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाने घाईघाईने खड्डे बुजवले, मात्र रस्त्यावर गिट्टी आणि धूळ तशीच पसरलेली राहिल्याने परिस्थिती अधिकच धोकादायक बनली आहे. परिणामी या मार्गावर किरकोळ अपघातांच्या



### वाहनधारकांमध्ये संताप, अपघात वाढले

घटनांत वाढ झाली असून दुचाकी व चारचाकी वाहनधारकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. वाहन चालवताना अक्षरशः तारेवरची कसरत करावी लागत असल्याची प्रतिक्रिया वाहनधारकांकडून व्यक्त होत आहे.या मार्गासाठी ग्रामपंचायतीचे उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी यापूर्वी आंदोलनही केले होते. आंदोलनानंतर तात्पुरती दुरुस्ती करण्यात आली; मात्र ती दिर्घकाळ टिकणारी ठरली नाही, असे चित्र पुन्हा दिसून येत आहे. सध्या रस्त्यावर विखुरलेली गिट्टी, खड्डे व उखडलेले डांबर यामुळे प्रवास अधिक धोकादायक झाला आहे.

दरवर्षीची उधळपट्टी थांबवून या रस्त्याचे पक्के डांबरीकरण/सिमेंट काँक्रीटचे बांधकाम तातडीने करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा नागरिक व वाहनधारकांकडून दिला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने तात्पुरत्या उपाययोजनांऐवजी कायमस्वरूपी उपाय करावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

## महावितरण दैनंदिनीचे उत्साहात प्रकाशन

**अमरावती/का.प्र.**

महावितरणच्या २०२६ या वर्षाच्या दैनंदिनीचे मंगळवारी मुंबईतील फोर्ट येथील एचएसबीसी कार्यालयात उत्साहात प्रकाशन करण्यात आले. अपर मुख्य सचिव (ऊर्जा) आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक. लोकेश चंद्र यांच्या शुभहस्ते ही दैनंदिनी प्रकाशित करण्यात आली.

याप्रसंगी संचालक (संचालन/प्रकल्प) सचिन तालेवार, संचालक (वित्त) अनुदीप दिघे, संचालक (वाणिज्य. योगेश गडकरी, संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार, स्वतंत्र संचालक विश्वास



पाठक आणि संचालिका श्रीमती ज्योती चिमटे यांची प्रमुख उपस्थिती होती. केवळ तारखा आणि वार पाहण्यासाठीच नव्हे, तर प्रशासकीय कामात सुसूत्रता आणण्यासाठीही दैनंदिनी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावते. या दैनंदिनीमध्ये महावितरणच्या राज्यभरातील क्षेत्रीय कार्यालये व अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक, महावितरणची वाटचाल व कामगिरी यांच्या माहितीचा समावेश आहे. या दैनंदिनीमुळे कामकाजात समन्वय राखणे सोपे होणार आहे. प्रकाशनानंतर,लोकेश चंद्र यांनी उपस्थित सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या आणि ही दैनंदिनी महावितरणच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासाठी उपयुक्त ठरेल, असा विश्वास व्यक्त केला. दैनंदिनी वेळेत व सुबकपणे प्रकाशित केल्याबद्दल आभा शुक्ला, लोकेश चंद्र यांनी जनसंपर्क विभागाचे अभिनंदन केले.

## पीडीएमसी येथील इमर्जन्सी मेडिसिन विभागाकडून सीपीआर मॅनिकिन्सचे दान

**अमरावती**-श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय येथे इमर्जन्सी मेडिसिन विभागाने कमी खर्चात अनेक ण्ई कार्यक्रम आयोजित करून तयार झालेल्या निधीतून दोन प्रौढ आणि दोन बाल सीपीआर मॅनिकिन्सची खरेदी केली. सीपीआर मॅनिकिन ही एक वास्तववादी, मानवी आकाराची प्रशिक्षण डमी आहे जी सुरक्षित, नियंत्रित वातावरणात कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) आणि इतर जीवनरक्षक कौशल्ये जसे की वायुमार्ग व्यवस्थापन



शिकवण्यासाठी आणि सराव करण्यासाठी वापरली जाते, ज्यामुळे विद्यार्थ्यांना जिवंत व्यक्तीला धोका न देता योग्य कॉम्प्रेशन खोली, गती आणि बचाव श्वासांसाठी स्नायू स्मृती विकसित करण्यास अनुमती मिळते, आधुनिक आवृत्त्या कामगिरीवर त्वरित अभिप्राय देतात. हे मॅनिकिन्स प्रशिक्षणासाठी पीडीएमसीला दान करण्यात आली.या उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धनजी देशमुख व अधिष्ठाता डॉ. अनिल देशमुख यांनी या टीमचे अभिनंदन केले आहे. डॉ. पी. आर. सोमवंशी व डॉ. स्वप्नील पाटील यांनी जीव वाचवण्यासाठी CPR प्रशिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले.

# विद्यार्थ्यांनो! आपल्या नवकल्पानांना प्रत्यक्षात उतरवा-डॉ.विनायक देशपांडे

**अमरावती/का.प्र.**

संशोधनासाठी अनेक क्षेत्रे खुली आहेत. विद्यार्थ्यांनी आपल्या मनातील नवकल्पनांना केवळ विचारांपुरते मर्यादित न ठेवता, त्यांना प्रत्यक्षात उतरवण्यासाठी प्रयत्नशील राहावे. 'अविष्कार' स्पर्धा हे अशा सर्जनशील विचारांसाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी आपले संशोधन समाजासाठी उपयुक्त कसे ठरेल, याकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असे प्रतिपादन जी. एच. रायसोनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील अविष्कार सेल तर्फे आयोजित विद्यापीठ स्तरीय 'आविष्कार' स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड, आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अविष्कार स्पर्धेचे उद्घाटन झाल्याची घोषणा करुन डॉ. विनायक देशपांडे पुढे म्हणाले, तत्कालीन कुलपती कृष्णा यांनी ही स्पर्धा महाराष्ट्रात सुरू केली आणि त्यानंतर या उपक्रमाला मिळालेली गती यामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला मोठी चालना मिळाली आहे. आजच्या तरुणांकडे संशोधनात्मक कल्पनांची कमतरता नाही, गरज आहे ती कठोर परिश्रमांची आणि सातत्याची. संशोधन हे केवळ पीएच.डी. मिळवण्यापुरते मर्यादित नसावे, तर त्यातून



### विद्यापीठात 'आविष्कार' स्पर्धेचे उत्साहात उद्घाटन

दर्जेदार जीवन जगण्यासाठी मार्ग सुकर व्हावा, असेही ते म्हणाले. त्यांनी पीपीटी प्रेझेंटेशनद्वारे 'संशोधन विषयाची निवड' यावर सविस्तर मार्गदर्शन केले. कोअर नॉलेज आणि लॅब स्किल्स : संशोधनासाठी मूलभूत ज्ञान आणि प्रयोगशाळेतील कौशल्ये किती महत्त्वाची आहेत, हे त्यांनी पटवून दिले. विद्यार्थ्यांनी स्वतःमधील कौशल्ये ओळखून, समाजाला फायदेशीर ठरेल अशा विषयांत करिअर करावे, असा सल्ला त्यांनी दिला. केवळ संशोधन करून चालणार नाही, तर ते जगासमोर मांडण्यासाठी उत्तम संवाद कौशल्य विकसित करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.संशोधन व नवोपक्रम हा अर्थव्यवस्थेचा कणा-कुलगुरू अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते म्हणाले, शेतकरी आत्महत्येसंदर्भात विद्यापीठाने संशोधन प्रकल्प हाती घेतला आहे व या प्रकल्पाच्या माध्यमातून शेतकरी आत्महत्येच्या घटनांना कमी करण्याचे प्रयत्न होतील. भारततही आता संशोधन आणि नवोपक्रमाला मोठया प्रमाणात वाव मिळत असून भारताची प्रगतीपथाकडे वाटचाल सुरू आहे व यात विद्यार्थ्यांची जबाबदारी सुध्दा अधिक वाढली आहे. उद्याचे भविष्य हे विद्यार्थीच असल्याने ही जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वीकारावी. परंतु असे करित असतांना कोणतेही संशोधन हे समाज, राष्ट्राच्या हिताचे असावे, त्याशिवाय ते शुन्य आहे, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी सर्व विद्यार्थ्यांना केले. यावेळी कुलगुरू डॉ. विनायक देशपांडे, माजी प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. अजय लाड आदींनी विद्यार्थ्यांच्या मॉडेल्सची पाहणी करुन त्यांच्याशी संवाद साधत नवसंशोधक विद्यार्थ्यांची प्रशंसा केली. तसेच विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या मॉडेल्सच्या उपयोगिततेबाबत माहिती घेतली. सूत्रसंचालन प्रा. मेघा कोटक, स्वागतपर भाषण व पाहुण्यांचा परिचय डॉ. नीरज घनवटे यांनी करुन दिला. प्रास्ताविकामधून आविष्कार सेलच्या समन्वयक डॉ. मनिषा कोडापे यांनी स्पर्धेच्या आयोजनामागील हेतू स्पष्ट केला. आभार डॉ. सुजाता काळे यांनी मानले. उद्घाटन कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, संशोधक, पाचही जिल्ह्यांमधील विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठया संख्येने उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# तिकीट न मिळाल्याने नाराज भाजप कार्यकर्त्यांचा उद्रेक

## कुळकर्णी, डेहनकर यांना रस्त्यावर घेराव, -राजापेठ झोन कार्यालय परिसरात हंगामा

**अमरावती/प्रतिनिधीः-** महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी न मिळाल्याने आता राजकीय पक्षांमध्ये इच्छुकांच्या नाराजीचा स्फोट होऊ लागला आहे. इच्छुकांची मोठी गर्दी भाजपमध्ये होती. उमेदवारी न मिळाल्याने काल सायंकाळी अनेक कार्यकर्त्यांनी संताप व्यक्त केला. दरम्यान, आज बुधवार ३१ डिसेंबरच्या दिवशी कार्यकर्त्यांनी भाजपचे पदाधिकारी जयंत डेहनकर आणि प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांना घेराव घालून जाब विचारला. भररस्त्यावर हे नाट्य घडले.

पंतप्रधान नरेंद मोदी यांना शिव्या देणाऱ्यांना तिकीट दिले जाते, असा रोष भाजपा कार्यकर्ता संगम गुप्ता यांनी व्यक्त केला. संगम गुप्ता यांच्या पत्नी ने प्रभाग क्रमांक १२ विवेकानंद कॉलनी येथून नामांकन दाखल केले होते, पण त्यांचे नामांकन रद्द झाले आणि पार्टीच्या वतीने त्यांना उमेदवारी पण देण्यात आली नाही. यामुळे ते पदाधिकाऱ्यांवर भडकले. आज दुपारी जयंत डेहनकर आणि शिवराय कुळकर्णी हे भाजपच्या कार्यालयात जात असताना नाराज झालेल्या संगम गुप्ता यांनी त्यांना रस्त्यातच गाठले. भाजपमध्ये नेत्यांच्या नातेवाईकांना, नव्याने प्रवेश झालेल्यांना उमेदवारी दिली जाते. आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे भक्त आहोत. भाजपसाठी आम्ही रक्ताचे पाणी केले आहे. कारागृहात गेलो आहो. वर्षानुवर्षे सतरंज्या उचलल्या आहेत.आम्ही कोणता असा गुन्हा केला, की आम्हाला उमेदवारी नाकारण्यात आली, असा सवाल ☞(पान २ वर)





### रस्त्यावरच विचारला जाब

शिवराय कुळकर्णी यांनी नाराज कार्यकर्त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण, हे कार्यकर्ते काहीही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हते. मी आपल्यासोबत रस्त्यावर गर्दीत बोलणार नाही, आपण कार्यालयात पोहचून चर्चा करू, असे शिवराय कुळकर्णी सांगत असताना भाजपच्या कार्यालयात आता पाय ठेवण्याचीही इच्छा होत नाही, अशा शब्दात कार्यकर्त्यांनी रोष व्यक्त केला.

# पैशाचे आमिष देऊन धर्मांतर

### वरूड तालुक्यातील शिंगोरी येथील घटना
### -आठ जणांना अटक

**अमरावती/प्रतिनिधीः-** पैशाचे प्रलोभन देऊन एका परिवाराचे धर्मांतर करण्याच्या आरोपाखाली अमरावती ग्रामीण पोलीसांनी आठ जणांना अटक केली आहे. जिल्ह्यातील वरूड तालुक्यातील बेनोडा पोलीस स्टेशन अंतर्गत ही घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे अमरावतीत मोठ्या प्रमाणावर धर्मांतर होत असल्याचे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे. बेनोडा पोलीस स्टेशनच्या हद्दीत ग्राम शिंगोरी येथे घडलेल्या या घटनेचे अनुषंगाने पोलीसांनी लगेचच कारवाई केली. तक्रारदार लक्ष्मण देविदास शेडे, (रा.शिंगोरी,ता.वरूड,जि.अमरावती) यांच२या तक्रारीवरून पोलीसांनी आठ जणांना अटक केली आहे. शिंगोरी गावातीलच राहणारे रितेश शंकरराव बोंन्द्रे यांचेकडे अनोळखी ५-६ इसम आले होते. तसेच रितेश बोन्द्रे यांचे घरासमोर मंडप सुध्दा टाकण्यात आला होता.



तक्रारदार हे रितेश बोन्द्रे यांचे घरा समोरील मंडपात गेले असता तेथे एक अनोळखी व्यक्ती पांढरा ड्रेस परिधान करून ख्रिश्चन धर्माबाबत गावातील इतर लोकांना सांगत होता तसेच पैश्यांचे आमीष देवुन लोकांना त्यांचा धर्म परिवर्तन करण्याबाबत प्रलोभन देत होता. या तक्रारीचे अनुषंगाने पो.स्टे.बेनोडा येथे अप.क्रं. २४१/२५ कलम २९९,३०२ बी. एन. एस. अन्वये नोंद करण्यात आला आहे. तक्रारदार ☞(पान २ वर)

# कॅनलमध्ये आढळला वाघिणीचा संशयास्पद मृतदेह

### -त्रि-सदस्यीय पशुवैद्यकीय चमूने केले शवविच्छेदन



**वर्धा/प्रतिनिधीः-** हिंगणघाट तालुक्यातील सेलू-मुरपाड परिसरातील पोथरा प्रकल्पाच्या कॅनलमध्ये वाघिणीचा मृतदेह संशयास्पद परिस्थितीत आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना सरत्या वर्षाचा अखेरचा दिवस, ३१ डिसेंबर रोजी सकाळी समोर आली. प्रादेशिक वनविभागाने घटनेची गंभीर दखल घेत तातडीने घटनास्थळी टीम पाठवून सखोल तपास सुरू केला आहे. मृत वाघिणीचे वय अंदाजे ३ ते ४ वर्ष असून ती पूर्ण वाढलेली व सुदृढ होती. प्राथमिक तपासानुसार शेतातील बेकायदेशीर विद्युत ☞(पान २ वर)



### आरओचा गाफिलपणा?

हिंगणघाट तालुक्यातील काही भागात मागील वर्षभर वाघांचा मुक्त संचार सुरू आहे. नोव्हेंबरमध्ये आजंती परिसरात वाघाचे दर्शन झाल्यानंतर वनविभाग ॲक्शन मोडवर आला होता. मात्र, नंतर हा पट्टेदार वाघ गोजी परिसरातून बेपत्ता झाला. मृत वाघिणीचा मृतदेह त्याच क्षेत्रात आढळल्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी पुरेशी खबरदारी घेतली गेली होती का, असा गंभीर प्रश्न उपस्थित झाला आहे. वनकर्मचाऱ्यांमध्ये आरओ गाफिल होता का, ही चर्चा सध्या रंगत आहे.

### उपोषणाच्या मागण्यांची पूर्तता 'न ' झाल्याने आक्रमक

# वंचित बहुजन आघाडी तालुका अध्यक्षाचा आत्मदहनाचा इशारा?

**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर तालुक्यातील विविध समस्या बाबत तसेच मानवी हक्काशी निगडित प्रश्नांवर प्रशासनाची उदासिनता कळसाला पोचली असून न्याय मागण्यासाठी उपोषणास बसलेल्या आंदोलकाच्या मागण्या अद्याप पर्यत पूर्ण न झाल्याने आत्मदहनाच्या इशारा देण्याची वेळ आली आहे. ही बाब अत्यंत दुर्दैवी व चिंताजनक आहे. वंचित बहुजन आघाडी तालुकाध्यक्ष चंदू रायबोले यांनी सर्वसामान्य हक्कासाठी आणि प्रशासनाच्या दिव्यांग विरोधात शांततामय मार्गाने उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. मात्र अनेक दिवस उलटूनही तहसिल प्रशासनाकडून ठोस निर्णय लेखी आश्वासन किंवा सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने आंदोलकाची मानसिक अवस्था अत्यंत तणावपूर्ण झाली आहे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळेच आज आत्मदहनसारखी टोकाची भूमिका घ्यावी लागत आहे. प्रशासनाचा उद्देश जनतेच्या समस्या ऐकून त्यावेळेत सोडवणे हाच असतो परंतु १५ महिने उलटूनही प्रशासनाने उपोषणकर्त्यांची एकाही मागण्यांची पूर्णतः केली नाही. फक्त वेळ ☞(पान २ वर)



# फ्रेजरपुरा परिसरात शस्त्र घेऊन फिरणारा युवक ताब्यात

### -दोन घातक शस्त्रे जप्त



**अमरावती/प्रतिनिधीः-** गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एका युवकाला गुन्हे शाखेच्या पथकाने फ्रेजरपुरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेत, त्याच्याकडून दोन घातक चाकू जप्त केले. ही कारवाई ३० डिसेंबर रोजी करण्यात आली.

गुन्हे शाखेचे अधिकारी पेट्रोलिंग करीत असताना त्यांना महादेव खोरी परिसरात गुप्त माहिती मिळाली की, गजानन नगर-महादेव खोरी परिसरात एक इसम चाकूसारखे ☞(पान २ वर)

# भरधाव दुचाकीची बैलगाडीला धडक; दोन ठार, तिघे गंभीर

### दर्यापूर-अमरावती मार्गावरील लखापूरजवळ भीषण अपघात

**खल्लार/प्रतिनिधीः-** बैलगाडी व दुचाकीच्या झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला आहे. दुचाकीवरील एकासह बैलगाडीमधील एक जणाचा मृतकांमध्ये समावेश असून अन्यं तीघे जण जखमी झाले आहेत. सदर घटना बुधवार (दि.३१) सायंकाळी ७ ते ८ वाजताच्या दरम्यान अमरावती ते दर्यापूर येथील लखापूर फाट्यानजीक मुख्य रस्त्यावरील पुलावर घडली आहे. आर्यन जाधव (वय १९,रा.खापर्डे बगीचा अमरावती) व बैलगाडी ☞(पान २ वर)



## १२ तासात जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस

# ३ विधी संघर्षीत बालक ताब्यात ४० हजारांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती शहरात वाढत्या जबरी चोरीच्या घटनांना आळा घालण्याच्या दृष्टीने अमरावती शहर गुन्हे शाखेने अवघ्या १२ तासांत जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणत तीन विधी संघर्षीत बालकांना ताब्यात घेतले आहे. या कारवाईत गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल व रोख रक्कम असा एकूण ४०,४७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बडनेरा पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, ३० डिसेंबर २०२५ ☞(पान २

# शेतकऱ्यांनी आमदारांच्या कार्यालयासमोर वाजवली डफडी

### अतिवृष्टीचा निधी रखडल्याने आक्रोश



**चांदूरबाजार/प्रतिनिधीः-** तालुक्यातील अतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही शासनाचा मंजूर निधी न मिळाल्याने शेतकऱ्यांचा संयम संपलेला आहे. यामुळे संतापलेल्या शेतकऱ्यांनी आज बुधवार ३१ डिसेंबर रोजी लोकविकास संघटनेच्या नेतृत्वाखाली आमदार प्रवीण तायडे यांच्या जनसंपर्क कार्यालयासमोर डफडी वाजून शासन, प्रशासनाचे लक्ष वेधले. यानंतरही शासन जागे नाही झाले तर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला.

जून ते सप्टेंबर दरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. शासनाने मदत जाहीर करूनही अनेक ☞(पान २ वर)

# अवैध दारू वाहतुक करणाऱ्यावर मोर्शी पोलीसांची कारवाई

### २ लाख ४ हजाराचा मुद्देमाल जप्त!

**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी शहरासह तालुक्यात अवैध देशी दारूची तस्करी करून विक्रीसाठी जात असल्याचा गोरखधंदा सुरू आहे. आज दि. ३१ डिसेंबर रोजी वर्षाच्या सरते शेवटी अवैध देशी दारू विक्रीसाठी जात असतांना डीबी स्कॉड पथकाने धाड टाकून देशी दारूसह एकूण २ लाख ४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात यश प्राप्त ☞(पान २ वर)



